नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ८६ * * नागपूर * मंगळवार, दिनांक २४ जून २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## माजी सीएम जगन मोहन रेड्डीविरुद्ध एफआयआर

■ वृत्तसंस्था, हैदराबाद, दि. २३ :
आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्याविरुद्ध हिट अँड रनचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ जून रोजी गुंटूर येथे त्यांच्या दौऱ्यादरम्यान ही घटना घडली. या प्रकरणात जिल्हा पोलिस अधीक्षक (एसपी) एस सतीश कुमार यांनी सांगितले की, माजी मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील एका कारने ६५ वर्षीय वृद्धाला चिरडले.

रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. चिली सिंघय्या असे या व्यक्तीचे नाव आहे. ते रेड्डी यांच्या पक्षाचे कार्यकर्ते होते आणि अनुसूचित जातीचे होते. मृताच्या पत्नीने बीएनएसच्या कलम १०६ (१) (निष्काळजीपणामुळे मृत्यू होणे) अंतर्गत गुन्हा दाखल केला.

अग्रग्रलेख

## खरीखरी...

## वारी, वारीच आणि वारी

अबू असीम आझमी समाजवादी पार्टीचे हमखास निवडून येणारे आमदार आहेत. त्यांनी काल जे विधान केलेले आहे. ते महाराष्ट्राच्या यच्चयावत अस्मितेला दुखावणारे आहे. ते म्हणाले की, वारीमुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होते. ट्रॅफिक जाम होत असतो. मग मुसलमानांच्या दहा मिनिटांच्या नमाजासाठी शासन परवानगी का देत नाही. मात्र वारीसाठी परवानगी कशी काय, असा त्यांचा प्रश्न आहे. आझमी साहेब आपण महाराष्ट्राचा इतिहास वाचलेला नसावा किंवा त्याचा तुम्हाला अजिबात अभ्यास नसावा. या महाराष्ट्रात जी विधानसभा आहे. त्या विधानसभेचे तुम्ही सदस्य आहात. त्या महाराष्ट्राच्या इतिहासात वारी ही काय चीज आहे. हे जरा अनुभव घेऊन समजून घ्या. त्यासोबतच असेही अत्यंत नम्रपणे नमूद करावेसे वाटते, 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' या संत वचनाप्रमाणे पंढरीच्या विठ्ठला प्रति आपला भक्तिभाव प्रकट करण्यासाठी शेकडो वर्षांपासून हजारो, लाखोंच्या वर वारकरी आपले सर्व पाश तोडून वारीत रममाण होत असतात. या वारीचे वैशिष्ट्य म्हणजे यात जात-पात, पंथ नाही. कोणताही धर्म नाही. अखिल महाराष्ट्राच्या भक्तीभावाची ही उज्ज्वल निशाणी आहे. या वारीच्या भक्ती यात्रेमध्ये मुस्लिम कीर्तनकार आणि मुस्लिम महिलाही सामील होतात. वारीमध्ये चालताना पूर्णतः शिस्तीचे पालन होते. ही वारी तुमच्या डोळ्यात कशी काय खुपते आहे. हे आम्हाला कळतच नाही. सर्व वारकरी अत्यंत भक्तीभावाने दर्शनाची आशा घेऊन विठ्ठलाच्या चरणी पंढरपुरात येत असतात. केवळ महाराष्ट्रच नाही, तर कर्नाटक पासून वारकरी येतात. परदेशातून ही वारी पाहण्यासाठी अनेक परदेशी पर्यटक वारकरी बनून येत असतात. कारण हा वैष्णवांचा मेळा महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे. या सर्व निघणाऱ्या वाऱ्या भिन्नभिन्न ठिकाणाहून निघतात. पंढरपुराच्या वाळवंटी सर्व वारकऱ्यांचे मनोमिलन होते. आमदार आझमी यांना वारीचा अर्थ समजला असता. तर त्यांनी असे विधान केलेच नसते. आजच्या घडीला केवळ महाराष्ट्रातच नाही. तर संपूर्ण देशात भक्तीभावाचा, भक्तिरसाचा असा काही अपूर्व सोहळा साजरा होतोय. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र भक्तीरसात न्हाहून निघत असतो. राहिला प्रश्न तो आझमी साहेब म्हणतात, त्याप्रमाणे नमाजाचा. तर मुस्लिम समाजासाठी मशिर्दीची व्यवस्था आहे. एखाद्या ठिकाणी पोलिसांनी आवरले असेल. तर पोलिसांना सहकार्य करणे. हे आपले कर्तव्य समजले पाहिजे. ती शिस्त वारकरी पाळतात. ते कधीही सरकारी सूचनेचे आणि आदेशाचा अनादर करीत नाहीत. वारी म्हणजे विठुरायाच्या भक्तीसाठी चालणारा जनसागर असतो. या वारीचा महिमा मराठीतील सर्वच सच्च्या संतांनी मुक्तकंठाने गौरविलेला आहे. वारीवर आक्षेप घेत असताना आझमी यांनी नको त्या वादाचे तोंड उघडलेले आहे. आता जी क्रूर शब्दांची उधळण अबू आझमी याने केलेली आहे. ती पाहता आमच्या वारक?यांना तर अधिक उत्साहाचे भरते येईल. हे वारकरी 100% निरुपद्रवी असतात. मानसिक, शारीरिक किंवा बौद्धिक रीतीनेही वारकरी कधीही बेशिस्त वर्तन करीत नाहीत. आमदार आझमी यांनी एकदा दीड-दोन दिवसांकरिता का होईना. या वारीचा आणि वारकऱ्यांचा अनुभव घ्यावा. ही पांडुरंगाची वारी त्यांच्या मनातील संभ्रम घालवून देईल. यात कोणाच्याही मनात कोणतीच कोणती शंका नाही. अबू असीम आझमी यांनी वारी आणि पांडुरंगाची वारी आणि खरीखरी वारीच करावी. म्हणजे एकदा तरी वारी करावी. तीच आमची मनीषा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

राजकीय आणि सामाजिक चळवळींशी संबंधित

## फौजदारी खटले मागे घेणार

# सरकारचा मोठा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :
महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राजकीय आणि सामाजिक आंदोलनांशी संबंधित प्रलंबित गुन्ह्यातील आरोपपत्र दाखल केलेले सर्व खटले मागे घेण्याचे निर्देश दिले आहेत. गृह विभागाने यासंदभार्तील शासकीय निर्णय (जीआर) 20 जून रोजी जारी केला आहे.

या निर्णयानुसार, फक्त तेच खटले मागे घेतले जातील ज्यात 31 मार्च 2025 पूर्वी आरोपपत्र दाखल केले गेले होते. अशा सर्व खटल्यांचा सरकारकडून मागोवा घेऊन ते मागे घेण्यात येणार आहेत.

दरम्यान, राज्य सरकारने याआधी जारी केलेल्या आदेशात 31 ऑगस्ट 2024 पर्यंत ज्या प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल केले गेले आहे ते मागे घेतले जातील, असे म्हटले होते.

मात्र, आता सरकारने ही मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला असून 31 मार्च 2025 पर्यंत वाढवण्यात आली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय झाल्याने निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांना दिलासा मिळाला आहे.

राजकीय पक्ष व सामाजिक संघटना यांच्याकडून, सार्वजनिक हिताच्या व वेगवेगळ्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी घेराव घालणे, मोर्चे काढणे, निदर्शने करणे इ. स्वरुपाचे आंदोलनाचे मार्ग स्वीकारले जातात. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल गुन्हे दाखल होऊन, तपासानंतर न्यायालयात दोषारोपपत्रे दाखल केली जातात. निवडणुकीनंतर नव्याने सत्तेवर आलेले सरकार अशा खटल्यांचा आढावा घेऊन राजकीय आणि सामाजिक आंदोलनात दाखल झालेले खटले मागे घेते.



**सरकारच्या आदेशात काय?**
राज्य गृह विभागाने एका आदेशात म्हटले होते की, 31 ऑगस्ट 2024 पर्यंत आरोपपत्र दाखल करण्यात आलेले सर्व खटले मागे घेण्यात येतील. अधिकाऱ्याने सांगितले की, तथापि काही प्रकरणे अशी होती, ज्यात या तारखेनंतर आरोपपत्र दाखल करण्यात आले. त्यांनी सांगितले की, शुक्रवारी जारी केलेल्या 'सरकारी प्रस्ताव' किंवा आदेशानुसार, सामान्य जनतेच्या हितासाठी आंदोलन करणाऱ्या राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि सामाजिक कार्यकर्त्यांविरुद्ध दाखल केलेले गुन्हे, ज्यात या वर्षी 31 मार्चपर्यंत आरोपपत्र दाखल करण्यात आले होते, ते मागे घेण्यात येतील.

**मराठा-ओबीसी आंदोलकांना दिलासा**
दरम्यान, मराठा आरक्षणप्रश्नी मराठा समाज आणि ओबीसींच्या प्रश्नावर ओबीसी समाजाने विविध आंदोलने केले होते. तसेच काही ठिकाणी रास्ता रोको करण्यात आला होता. यामुळे अनेक आंदोलकांवर कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले होते. या गुन्ह्यांचा फटका राज्य सरकारला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बसण्याची शक्यता निर्माण झाल्याने सरकारने हा निर्णय तातडीने घेत त्यासंदर्भात शासन आदेशही जारी केला. या निर्णयामुळे मराठा आणि ओबीसी आंदोलकांना दिलासा मिळणार आहे.

वारीसंदर्भातील वक्तव्याबाबत

## आझमींना नोटीस बजावणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :



अल्पसंख्यांक आयोगाने समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांचे वक्तव्य गांभीयार्ने घेतले असून वारी निघाली असताना, असे वक्तव्य करणे म्हणजे समाजात दुफळी निर्माण करणे होय. हिंदू आणि मुस्लिम समाजात दंगल उसळवण्यासाठी अशाप्रकारे प्रक्षोभक वक्तव्य करणे गैर आहे, असे राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान म्हटले आहे. ते आज नागपुरात माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी वारीसंदर्भात वादग्रस्त वक्तव्य केले आहे. दरम्यान याच मुद्द्यावर बोट ठेवेत महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी आक्रमक पवित्रा घेत अबू आझमींना सेक्शन १० प्रमाणे नोटीस बजावत कारवाईचा इशारा दिला आहे. अबू आझमी यांचे वारी संदर्भातला वक्तव्य अवाजवी असून दोन समाजामध्ये तेढ निर्माण करणारे आहे. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग त्यांच्या या वक्तव्याचा निषेध करत असून आयोग अबू आझमी यांच्या वक्तव्यासंदर्भात त्यांना सेक्शन दहा प्रमाणे नोटीस ही बजावणार आहे.

शिवाय गरज भासली तर त्यांना आयोगासमक्ष उपस्थित राहून उत्तर देण्यासही सांगू, असेही अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान म्हणाले. जर अबू आजमी यांच्या वारी संदर्भातल्या वक्तव्यामुळे महाराष्ट्रात कुठे दंगल झाली, तर जवळच्या संबंधित पोलीस स्टेशनमध्ये अबू आजमी यांच्या विरोधात गुन्हाही दाखल केला जाईल, असेही अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान म्हणाले.

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी वारीसंदर्भात वादग्रस्त वक्तव्य केले होते.

भर चौकात युवकाची

## निर्घृण हत्या

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. २३ :
जिल्ह्यातील ग्रामीण भागात एका युवकाची कोयत्याने वार करून भर चौकात निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे.

चिखली तालुक्यातील मेरा खुर्द फाटा येथे ही थरारक घटना घडली. या प्राथमिक माहितीनुसार खून झालेल्या तरुणाचे अंदाजे वय २५ वर्षे असून त्याची ओळख अजून पटली नाही. २३ जूनच्या दुपारी हा धक्कादायक प्रकार घडला. ज्या तरुणाचा खून झाला तो तरुण चिखली वरून काळी पिवळीने मेरा खुर्द चौकी येथे पोहोचला. त्याचवेळी काही येथे त्याची वाट पाहत होते.

गाडीतून उतरल्यावर त्याच्यावर कोयत्याने वार करण्यात आले. या हल्ल्यात तो जागीच ठार झाला. घटनेची माहिती मिळताच अंढेरा पोलीस घटनास्थळी पोहोचले. वरिष्ठ अधिकारी, विविध पथके देखील गावात दाखल झाली.

पोलिसांनी एका मारेकऱ्याला ताब्यात घेतल्याची माहिती आहे. त्याचा सहकारी मात्र फरार असल्याचे सांगण्यात आले. मृत तरुण कोण? खून करण्याचे नेमके कारण काय? याची अद्याप माहिती मिळू शकली नाही . मृत युवक हा बुलढाणा तालुक्यातील एका गावातील तर आरोपी मराठवाडा मधील जालना जिल्ह्यातील रहिवासी आहे.

इस्त्रायलचा इराणमध्ये

# टारगेट अटॅक



इराणवरील हल्ल्याच्या विरोधात रविवारी अमेरिकेतील न्यूयॉर्कमध्येही एक रॅली काढण्यात आली. काही निदर्शकांनी ट्रम्प यांना युद्ध गुन्हेगार म्हटले.

■ वृत्तसंस्था
तेहरान/तेल अवीव, दि. २३ :
सोमवारी दुपारी इस्त्रायलने इराणची राजधानी तेहरानमधील इराणी लष्करी युनिट इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सच्या तळांवर हल्ला केला. यामध्ये शेकडो सैनिक ठार झाल्याचा दावा केला जात आहे.

इस्त्रायली सैन्याने सांगितले की त्यांनी एविन जेल, इस्त्रायल डिस्ट्रक्शन क्लॉक, आयआरजीसीचे बासीज फोर्स मुख्यालय आणि तेहरानमधील अंतर्गत सुरक्षा मुख्यालयांना लक्ष्य केले.

यापूर्वी इस्त्रायलने इराणच्या फोर्डो अणुस्थळावर हल्ला केला होता. इराणच्या तस्निम न्यूज एजन्सीने म्हटले आहे की हा हल्ला त्याच ठिकाणी करण्यात आला जिथे रविवारी अमेरिकेने बस्टर बॉम्ब टाकले होते. इस्त्रायलने इराणच्या 6 विमानतळांवर ड्रोन हल्ले देखील केले - मशहद, तेहरान, हमादान, देझफुल, शाहिद बख्तियारी आणि तबरीझ. यामध्ये इराणची 15 लढाऊ विमाने आणि हेलिकॉप्टर नष्ट झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

दरम्यान, इराणचे उपपरराष्ट्रमंत्री माजिद तख्त रवंची म्हणाले की इराण आपला अणुकार्यक्रम थांबवणार नाही. इराणच्या मिलिटरी सेंट्रल कमांडचे प्रवक्ते इब्राहिम झोल्फाघारी म्हणाले, 'जुगारी ट्रम्प, तुम्ही युद्ध सुरू केले असेल, पण आम्ही ते संपवू.'

**सत्तापालटाचे संकेत**
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधील सत्तापालटाच्या मुद्द्यावर भाष्य केले. ते सोशल मीडियावर म्हणाले- जर सध्याचे इराणी सरकार 'इराणला पुन्हा महान' बनवू शकत नसेल, तर सत्ता परिवर्तन का होऊ नये? मेक इराण ग्रेट अगेन.

अमेरिकेने काल इराणमधील ३ अणु तळांवर हल्ला करून युद्धात प्रवेश केला. हे तळ फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान होते. या कारवाईत ७ बी-२ स्टेल्थ बॉम्बर्सनी भाग घेतला, ज्यांनी इराणच्या फोर्डो आणि नतान्झ अणु तळांवर १३,६०८ किलो वजनाचे बंकर बस्टर बॉम्ब टाकले.

**इराणची पुतिनकडून अधिक मदतीची मागणी**
इराण-इस्त्रायल युद्धात अमेरिकेने इस्त्रायलला पाठिंबा दिल्यानंतर, इराणला आता रशियाकडून अधिक मदतीची अपेक्षा आहे. रविवारी अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांनी त्यांचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराक्ची यांना अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची मदत घेण्यासाठी सोमवारी मॉस्कोला पाठवले आहे.

इराणी सूत्रांनी रॉयटर्सला सांगितले की इराणी परराष्ट्र मंत्री अब्बास अराक्ची पुतिन यांना खमेनी यांचे पत्र देणार आहेत, ज्यामध्ये पुतिन यांना पाठिंबा मागितला आहे. पण रशियाने अद्याप उत्तर दिले नाही.


इराणची राजधानी तेहरानमध्ये अमेरिकन हल्ल्याच्या विरोधात एक रॅली काढण्यात आली. या रॅलीदरम्यान, एक मुलगा त्याच्या वडिलांच्या खांद्यावर बसून निषेधात सामील झाला.




**एका कसोटीच्या दोन्ही डावात शतक करणारा पहिला भारतीय विकेटकीपर**

■ वृत्तसंस्था, लीड्स, दि. २३ :
अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारताने इंग्लंडविरुद्ध ३३९ धावांची आघाडी घेतली आहे. सोमवारी हेडिंग्ले स्टेडियमवर सामन्याचा चौथा दिवस आहे.

भारतीय संघाने दुसऱ्या डावात ४ बाद ३३३ धावा केल्या आहेत. केएल राहुल क्रीजवर आहे. राहुल शतक झळकावल्यानंतर फलंदाजी करत आहे. ऋषभ पंत ११८ धावा करून बाद झाला. त्याला शोएब बशीरने जॅक क्रॉलीच्या हाती झेलबाद केला. यासोबतच शोएबने १९५ धावांची भागीदारी मोडली.

कर्णधार शुभमन गिल (८ धावा) ब्रायडन कार्सने त्रिफळाचित झाला. तिसऱ्या दिवशी, साई सुदर्शन ३० धावा करून बाद झाला आणि यशस्वी जैस्वाल ४ धावा करून बाद झाला.

लीड्समधील हेडिंग्ले क्रिकेट स्टेडियमवर भारताने आपला डाव ९०/२ या धावसंख्येवरून पुन्हा सुरू केला. पहिल्या डावात इंग्लंड ४६५ आणि भारत ४७१ धावांवर बाद झाला. पहिल्या डावात भारताला ६ धावांची आघाडी मिळाली.

दरम्यान, या कसोटीच्या दुसऱ्या डावात भारत मोठी धावसंख्या उभारेल असा अंदाज आहे.

## दरवर्षी पाच हजार नवीन बसेस

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :
राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषद घेत एसटी महामंडळाच्या श्वेतपत्रिकेबद्दल माहिती दिली आहे. तसेच एसटी महामंडळाला आर्थिक संकटातून वाचवणार असल्याचे आश्वासन देखील सरनाईक यांनी दिले आहे.

दर वर्षाला किमान 10 हजार बसेसची मागणी देखील त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सरनाईक म्हणाले, दर वषार्ला 10 हजार बसेस एसटी महामंडळाच्या ताब्यात आल्या तर जुन्या झालेल्या बसेस पुढल्या 5 वर्षात बाहेर काढता येतील आणि 25-30 हजार बसेसच्या जोरावर आपण चांगल्या प्रकारचे काम पुढे करू शकू.

## स्वागतापूर्वी विद्यार्थ्यांकडून सफाईची कामे, मंत्री म्हणाले, कारवाई करू

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २३ :
शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत बुलढाणा जिल्ह्यात आयोजित शाळा प्रवेश उत्सव कार्यक्रम वादग्रस्त ठरला.

विदर्भातील शाळा सोमवारी, २३ जून रोजी सुरु झाल्या. या निमित्त प्रवेशोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यातील सिनगाव जहांगीर (ता. देऊळगाव राजा) येथे प्रवेश उत्सव अर्थात विद्यार्थ्यांच्या स्वागताचे आयोजन करण्यात आले होते. सिनगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत या कार्यक्रमासाठी थेट शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना निमंत्रित करण्यात आले होते. मात्र मंत्र्यांच्या आगमनपूर्वी आणि विध्यार्थ्यांच्या स्वागतापूर्वी जिल्हा परिषद शाळेत वेगळाच प्रकार घडला.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांकडून स्वच्छता करून घेतली. झाडणे, कचरा गोळा करणे, माती उचलणे, वस्तूंची ने आण करणे आदी कामे लहान विध्यार्थ्यांकडून करून घेण्यात आल्याचा प्रकार येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये घडला.

६० वर्षांपासून प्राणघातक विषाणूवर फेविपिरावीर औषध प्रभावी

# चांदीपुरा व्हायरसवर शोधला उपचार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
भारताच्या ग्रामीण भागात गेल्या 60 वर्षांपासून उच्छाद मांडणाऱ्या चांदीपुरा विषाणुवर अखेर उपचार सापडला आहे. चांदीपुरा व्हायरस नावाने ओळखल्या जाणाऱ्या या आजारामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागात आतापर्यंत शेकडो मुलांचा मृत्यू झालाय.

भारतीय शास्त्रज्ञांनी चांदीपुरा विषाणूसाठी एक औषध शोधले आहे. ज्याद्वारे रुग्णाच्या जीवाला धोका कमी करता येतो. चांदीपुरा विषाणू हा एक रॅबडोव्हायरस आहे, जो पहिल्यांदा 1965 मध्ये



महाराष्ट्रातील चांदीपुरा गावात सापडला होता. म्हणूनच त्याचे नाव चांदीपुरा ठेवण्यात आले. हा विषाणू वाळू माशीच्या चाव्याव्दारे पसरतो आणि मुलांमध्ये एन्सेफलायटीस होतो जो मेंदूवर वेगाने परिणाम करतो. याला सामान्यांच्या भाषेत मेंदू ताप म्हणतात. हा आजार 5 ते 15 वर्षे वयोगटातील मुलांना सर्वात जास्त लक्ष्य करतो.

चांदीपुरा व्हायरसचा प्रादुर्भाव झालेल्या रुग्णाला ताप, उलट्या, बेशुद्धी यासारखी लक्षणे दिसून येतात. याचा प्रादुर्भाव झालेला रुग्ण 24 ते 48 तासांच्या आत मरतो.

पुणे येथील आयसीएमआरच्या राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेने (एनआयव्ही) त्यांच्या पेशी आणि प्राण्यांच्या मॉडेल प्रयोगांमध्ये या प्राणघातक विषाणूची वाढ थांबवण्यास सक्षम असलेले फेविपिरावीर नावाचे औषध शोधले आहे. भारतात या प्राणघातक विषाणूसाठी औषधाची प्रभावीता वैज्ञानिकदृष्ट्या पुष्टी होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

यापूर्वी 2024 मध्ये, गुजरातमध्ये चांदीपुर विषाणूचा गेल्या 20 वर्षातील सर्वात मोठा प्रादुर्भाव नोंदवला गेला होता.

# औरंगजेब हा एक पवित्र व्यक्ती होता

## काँग्रेसच्या माजी आमदाराचे वादग्रस्त विधान



**मालेगाव :** औरंगजेब हे एक पवित्र व्यक्ती होते. त्यांनी टोपी शिवून दोन वेळचे जेवण कमावले आणि प्रामाणिक जीवन जगले, असे वादग्रस्त विधान मालेगावचे माजी आमदार आसिफ शेख यांनी केले आहे. त्यांनी केलेल्या या विधानामुळे राज्यात पुन्हा एकदा औरंगजेब या विषयावरून गदारोळ उठण्याची शक्यता आहे. मालेगावात मायनॉरिटी डिफेन्स कमिटीच्या वतीने आयोजित केलेल्या उत्तर महाराष्ट्र चिंतन शिबिरात आसिफ शेख यांनी हे वक्तव्य केले आहे. यावेळी बोलताना आसिफ शेख म्हणाले, औरंगजेब हे एक पवित्र व्यक्ती होते. त्यांनी टोपी शिवून दोन वेळचे जेवण कमावले आणि प्रामाणिक जीवन जगले. ते सर्वधर्म समभाव ठेवणारे आणि तसेच वागणारे होते. मात्र केवळ राजकारणासाठी त्यांना बदनाम केले जात आहे. आज त्यांच्या नावावर मतदान मिळवण्याचे आणि समाजात ध्रुवीकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच हे योग्य नसल्याचे आसिफ शेख म्हणाले. त्यांनी केलेल्या विधानावर ठाम असल्याचे सांगत पुढे आसिफ शेख म्हणाले, जे आहे ते आहे, आम्ही संविधानाला मानणारे आहोत आणि या देशावर प्रेम करणारे आहोत, असे त्यांनी म्हटले आहे. परंतु आता त्यांनी केलेल्या या विधानामुळे राज्यात पुन्हा एकदा नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# विकासाचा प्रत्येक रुपया सर्वसामान्यांपर्यंत पोहचला पाहिजे : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :

विकासासाठी खर्च होणारा प्रत्येक रुपया सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. जनतेच्या कल्याणासाठी दिलेल्या घोषणा, योजना आणि तरतुदी प्रत्यक्षात उतरल्या जात आहेत की नाही, याची खात्री करून घेण्याचे काम अंदाज समित्यांमार्फत होत असते. त्यामुळेच या समित्यांना लोकशाहीचा आत्मा म्हणणे वावगे ठरणार नाही, असे स्पष्ट मत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.

आज संसद तसेच विविध राज्यांच्या प्राक्कलन (अंदाज) समित्यांच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते विधानभवनातील सभागृहात बोलत होते. या दोन दिवसीय परिषदेची सुरुवात आज झाली असून या वेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती



हरिवंश सिंह, विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, लोकसभा अंदाज समितीचे प्रमुख डॉ. संजय जयस्वाल, राज्य अंदाज समिती प्रमुख अर्जुन खोतकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा विकास दुप्पट वेगाने होत आहे. या अमृतकाळात आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि जबाबदारी या निकषांवर आधारित कारभाराचे महत्त्व अधिक वाढले आहे. या पार्श्वभूमीवर अंदाज समित्यांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरते." "अंदाज समित्या म्हणजे छोटी संसद किंवा लघु विधिमंडळे आहेत. त्या शासनाच्या आर्थिक कामकाजावर बारीक नजर ठेवतात. अंदाजपत्रकातील तरतुदी योग्य वेळेत आणि योग्य पद्धतीने वापरल्या जात आहेत का, हे पाहणे त्यांचे मुख्य काम असते," असे शिंदे यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू करताना आम्ही आरबीआय, एफआरबीएम कायदा आणि अर्थसंकल्पीय मार्गदर्शक तत्वांचा सखोल अभ्यास केला होता. अशा योजनांमधून सरकारची सामाजिक बांधिलकी आणि आर्थिक शिस्त दोन्ही सिद्ध होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात केंद्र शासनाने जे पारदर्शकतेचे निकष प्रस्थापित केले आहेत, त्यामुळे अंदाज समित्यांचे कार्य काही अंशी अधिक सुलभ झाले आहे,असे मत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केले. "सरकार हे जनतेचे प्रतिनिधी असते. त्याने जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करताना आर्थिक सुबुद्धता, खर्चावर नियंत्रण आणि कार्यक्षमतेचे भान ठेवले पाहिजे," असे सांगत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी अंदाज समित्यांच्या भूमिकेला अधिक सशक्त आणि अर्थपूर्ण करण्याचा पुनरुच्चार केला.

# एमपीएससी परीक्षार्थ्यांसाठी 'केवायसी' प्रक्रिया बंधनकारक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आयोगाच्या ऑनलाइन अर्ज प्रणालीत कोणताही अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांना 'केवायसी' प्रक्रिया पूर्ण करणे सक्तीचे करण्यात आले आहे, अशी माहिती एमपीएससीने दिली आहे.

एमपीएससीने दिलेल्या माहितीनुसार, उमेदवारांना पुढील चारपैकी कोणत्याही एका पद्धतीने ओळख पडताळणी (केवायसी) करावी लागणार आहेः 1. आधार ऑनलाइन ई-केवायसी, 2. आधार ऑफलाइन पेपरलेस डिजिटल केवायसी, 3. आधार ऑफलाइन पेपर आधारित केवायसी, 4. नॉन-आधार ऑफलाइन केवायसी या चार पद्धतीने ओळख पडताळणी (केवायसी) करता येणार आहे. अर्ज करण्याआधीच ही केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक असेल. याशिवाय, एकदाच नोंदणी करताना उमेदवाराने आपला मोबाईल नंबर आणि ई-मेल आयडी प्रणालीत नोंदवणेही आवश्यक आहे. जर उमेदवाराने आधार आधारित पडताळणी निवडली, तर आधार क्रमांकाशी संलग्न मोबाईल नंबर असणे आवश्यक आहे. संदभार्ने, एमपीएससीने मार्च 2017 पासून ऑनलाइन प्रणालीत आधार क्रमांक नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली होती. ही प्रणाली लागू केल्यामुळे उमेदवारांची ओळख अचूकरीत्या प्रमाणिकरण करता येणार असून, फसवणूक आणि चुकीच्या माहितीला आळा बसेल.

### आम्ही उद्या हज यात्रेवर प्रश्न उपस्थित केला तर...

# नितेश राणेंची अबू आझमींवर टीका



**मुंबई :** पालख्यांमुळे वाहतूक कोंडी होते, पण आम्ही तक्रार करत नाही असे म्हणत अबू आझमी यांनी पंढरीच्या वारीतील पालखीचा आणि रस्त्यावरील नमाज पठणाचा संबंध जोडला होता. यावरून त्यांच्यावर टीकेची झोड उठवण्यात आली आहे. त्यात आता भाजप नेते व मंत्री नितेश राणे यांनी देखील अबू आझमी यांच्यावर निशाणा साधला आहे. आम्ही हज यात्रेवर प्रश्न उपस्थित केले तर? असा सवाल नितेश राणे यांनी उपस्थित केला आहे. अबू आझमी यांनी केलेल्या विधानावर पलटवार करताना नितेश राणे म्हणाले, दर शुक्रवारी जे गॅस सिलेंडर वरती येतात त्यावर आझमी सारखे कारटे काहीच बोलताना दिसत नाही. आमच्या महाकुंभवर, आमची वारी सुरू झाली तर त्यावर आक्षेप घ्यायचा. आमची वारी वर्षभर असत नाही पण तुमच्या दररोज वर येणाऱ्या गॅस सिलेंडरवर बोला, त्यावर अबू आझमीने आपले थोबाड उघडावे, अशी टीका राणेंनी केली आहे.

# पुण्यात ट्रकची दुचाकीला धडक

## सहप्रवासी तरुणाचा मृत्यू; दोन मोटारींचे नुकसान

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २३ :

सिंहगड रस्ता भागातील वडगाव उड्डाणपुलावर भरधाव ट्रकने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने सहप्रवासी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याचवेळी भरधाव ट्रकने उड्डाणपुलावरुन जात असलेल्या दोन मोटारींना धडक दिली. अपघातात दोन मोटारींचे मोठे नुकसान झाले,असून दुचाकीस्वार तरुण जखमी झाला. अपघातानंतर पसार झालेल्या ट्रकचालकाला सिंहगड रस्ता पोलिसांनी शोध घेऊन अटक केली.

किरण पवार (वय २५, रा. श्रमसाफल्य कॉलनी, कर्वेनगर,पुणे) असे मयत झालेल्या सहप्रवासी तरुणाचे नाव आहे. अपघातात दुचाकीस्वार यश जयप्रकाश किरदत्त (वय २५, रा. श्रमसाफल्य कॉलनी, कर्वेनगर) गंभीर जखमी झाला. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी ट्रकचालक महंतेश श्रीकांत अंदोडगी (वय ३७, रा. गोलसर, ता. इंडी, जि. विजयपुर, कर्नाटक) याला अटक करण्यात आली. याबाबत यश किरदत्त याने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार यश किरदत्त आणि त्याचा मित्र किरण पवार हे मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरील वडगाव उड्डाणपुलावरुन २२ जून रोजी पहाटे सव्वापाचच्या सुमारास जात होते.

त्यावेळी भरधाव वेगात ट्रकने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. अपघातानंतर भरधाव वेगात ट्रकचालक पसार झाला. त्या वेळी उड्डाणपुलावरुन निघालेल्या दोन मोटारींना धडक दिली.

अपघाताची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे, गुन्हे शाखेचे निरीक्षक उत्तम भजनावळे यांनी घटनास्थळी भेट दिली. अपघातात गंभीर जखमी झालेला दुचाकीस्वार यश अणि त्याचा मित्र किरण यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच किरण याचा मृत्यू झाला होता.

पसार झालेला ट्रकचालक अंदोडगी याला ताब्यात घेण्यात आले. रात्री उशीरा त्याला अटक करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक एन मालुसरे पुढील तपास करत आहेत.

# पशुसंवर्धन विभागाच्या कर्मचाऱ्याने स्वतःच्या नावे उचलली ६५ लाखांची रक्कम

■ महासागर प्रतिनिधी, हिंगोली, दि. २३ :

हिंगोली जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागातील कनिष्ठ सहाय्यक (लेखा) कर्मचाऱ्याने सन २०१८ पासून ते सन २०२५ पर्यंत स्वतःच्या नावे तब्बल ६५ लाख रुपयांची रक्कम उचलल्याचा प्रकार तपासणीमध्ये उघडकीस आला आहे. आता तपासणी पथकाकडून कॅशबुकची पडताळणी केली जाणार असून सदर रक्कमेमध्ये वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हिंगोली जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागातील कनिष्ठ सहाय्यक (लेखा), एस. सी. जावळे यांनी तत्कालीन मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांची धनादेशावर बनावट स्वाक्षरी करून १.५५ लाख रुपये बँकेतून उचल करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र स्वाक्षरीमध्ये तफावत आल्यामुळे बँकेच्या अधिकाऱ्यांनी सदर प्रकार पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या कानावर घातला.

त्यानंतर मुख्यकार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी तातडीने चौकशी पथक स्थापन करून मागील दहा वषार्तील व्यवहाराची चौकशी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यावरून मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे यांनी पथक स्थापन करून चौकशी सुरु केली आहे. या

**धनादेशाची चौकशी सुरु**

**कॅशबुकची पडताळणी लवकरच**

पथकाने बँकेकडे पत्र देऊन सन २०१८ पासून आता पर्यंतच्या धनादेशाची माहिती घेतली होती. यामध्ये जावळे यांनी ६५ लाख रुपयांचे धनादेश त्यांच्या नावे देऊन सदर रक्कम उचलण्यात आल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे आता या धनादेशाचा कसून तपासणी केली जात आहे.

या शिवाय पशुसंवर्धन विभागातील कॅशबुकची पडताळणी केली जाणार आहे. मात्र मागील चार ते पाच महिन्यापासून कॅशबुकच लिहीण्यात आलेले नसल्यामुळे या पथकाने देयक व इतर कागदपत्रांवरून कॅशबुक पूर्ण करण्याची तयारीही चालवली आहे. त्यासाठी जावळे यांनी कपाटाची चाबी न दिल्यास पंचनामा करून कपाटाचे कुलुप तोडून कॅशबुक व कागदपत्रे ताब्यात घेतली जाणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.

पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्याच्या नावे बँकेत खाते काढले जाते. त्या खात्यावर झालेल्या व्यवहाराची माहिती बँकेकडून एसएमएस द्वारे मोबाईवर दिली जाते. मात्र अधिकाऱ्यांच्या नावे खाते असले तरी त्याला जावळे यांचा मोबाईल नंबर जोडलेला दिसून आल्याचेही सुत्रांनी सांगितले.

# महाराष्ट्रात भ्रष्टाचारामुळे पक्ष फुटले

## संजय राऊत यांचा गुलाबराव पाटलांवर पलटवार



**मुंबई :** भय आणि भ्रष्टाचार या दोन गोष्टींमुळे शरद पवार आणि शिवसेनेचे आमदार आणि खासदार सोडून गेले आहेत. तसेच भय आणि भ्रष्टाचार निर्माण करण्याचे काम नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी केले आहे. असा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या माध्यमातून त्यांनी गुलाबराव पाटील यांना प्रत्युत्तर दिले आहे. शिवसेना पक्षाच्या फुटीच्या मुद्यावरून गुलाबराव पाटील यांनी संजय राऊत यांच्यावर केलेल्या आरोपाला त्यांनी फेटाळले आहे. 'इम्पॉसिबल' या एकाच शब्दात राऊत यांनी उत्तर दिले. इतकेच नाही तर पळून गेलेल्या डरपोक माणसाचे आरोप कुठे मनावर घेता? असा प्रतिप्रश्न त्यांनी विचारला. शिवसेना नक्कीच हायजॅक केलेली आहे. आता उद्धव ठाकरे यांची शिवसेना ही निष्ठावंतांची शिवसेना आहे. ती आजही उद्धव ठाकरे यांच्या ताब्यात आहे. हे गद्दार लोक शिवसेना हायजॅक करणार होते. त्यांना शेवटी पळून जावे लागले, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. भय आणि भ्रष्टाचारामुळे ते पळून गेले असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे.

# पंढरपूरच्या चंद्रभागा नदीच्या पाणी पातळीत वाढ

## बुडणारे सहा भाविक थोडक्यात बचावले

■ महासागर प्रतिनिधी
पंढरपूर, दि. २३ :

आषाढी वारीसाठी वारकऱ्यांनी पंढरपूरची वाट धरली आहे. लाखो भाविक व वारकरी पालखी सोहळ्यासह पांडुरंगाच्या दर्शनासाठी निघाले आहेत. विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने पंढरपुरात येत असतानाच येथील चंद्रभागा नदीला पूर आला आहे. पाण्याचा अंदाज येत नसल्याने भाविकांच्या बुडण्याच्या घटना समोर येत आहेत.

रविवारी 22 जून रोजी सहा भाविक चंद्रभागेत बुडत होते, परंतु वेळीच लक्ष दिल्याने त्यांचा जीव वाचवण्यात यश आले आहे.



प्रशासनाने नेमलेल्या कोळी बांधवांनी या सहा जणांचे प्राण वाचवले आहेत. स्नान करण्यासाठी भाविक चांदरभेच्या पाण्यात उतरले होते. परंतु पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्याच्या प्रवाहात ते वाहत जात होते. यावेळी तिथे कोळी बांधव कर्तव्यवर असताना त्यांचे लक्ष गेले व त्यांनी तातडीने बचावकार्य करत या भाविकांचे प्राण वाचवले आहेत. सध्या आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर चंद्रभागा नदीला पूरस्थिती येऊ नये यासाठी उजनी धरणातून सुमारे 26,600 क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यात्रा काळात पाऊस झाल्यास धरणात साठवणूक होण्यासाठी प्रशासनाने हे नियोजन केले असून पुढील पाच ते सहा दिवस हे विसर्ग सुरू राहणार आहे. बुडणाऱ्या भाविकांचे प्राण वाचवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने 40 स्थानिक कोळी बांधवांची नियुक्ती केली आहे. याच कोळी बांधवांनी काल सहा भाविकांना सुरक्षित बाहेर काढले. मात्र, चंद्रभागेच्या तीरावर योग्य त्या सुरक्षारक्षकांची नेमणूक झाल्यास अशा बुडण्याच्या घटना टाळता येतील, अशी भाविकांचे म्हणणे आहे. आषाढीच्या काळात भाविकांना महापुराचा त्रास होऊ नये, यासाठी उजनी धरणातून सोडण्यात येणारे पाणी चंद्रभागा नदीत पोहोचू लागले आहे. त्यामुळे चंद्रभागा आणि वाळवंटातील काही मंदिरांमध्ये पाणी शिरण्यास सुरुवात झाली आहे. आषाढीला भाविकांना स्नानासाठी आवश्यक तेवढेच पाणी ठेवण्याच्या उद्देशाने 28 ते 29 जूनपर्यंत पाणी विसर्ग सुरू राहणार आहे. त्यानंतर पाऊस झाल्यास उजनी धरणात वरून येणारे पाणी साठवता येईल, अशी खबरदारी घेतली जात असल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले आहे.

# त्वचेचा कॅन्सर असलेल्या आजीला नातवाने कचऱ्यात फेकले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :

मुंबईतील एका नातवाने आपल्या आजीला कचऱ्यात फेकल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. त्वचेचा कॅन्सर असल्याने नातवाने आजीला कचऱ्यात फेकल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेने माणुसकीला काळिमा फासला गेला आहे. सध्या या वृद्ध महिलेवर कूपर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेबद्दल अधिकची माहिती अशी की, मुंबईतील आरे परिसरात असलेल्या काचऱ्याच्या ढिगाऱ्यात एका वृद्ध महिलेला टाकून गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीच्या आधारे पोलिस घटनास्थळी दाखल झाले. येथील वृद्ध महिलेची चौकशी केली असता घडलेला संपूर्ण प्रकार समजला. यशोदा गायकवाड असे या वृद्ध महिलेचे नाव असून त्यांना त्वचेचा कॅन्सर आहे. याच कारणामुळे नातवाने आजीला कचऱ्याच्या ढिगाऱ्यात फेकून तो निघून गेला होता. आजीच्या कॅन्सरवर उपचार करण्यासाठी पुरेसे पैसे नसल्याने नातवाने आपल्या आजीला फेकून दिल्याचे समजते.

# पुणे रेल्वे स्थानकाला थोरले बाजीराव पेशवेंचे नाव द्या : मेधा कुलकर्णी



**पुणे :** भाजपच्या राज्यसभेच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी पुणे रेल्वे स्थानकाच्या नामांतराची मागणी केली आहे. पुणे रेल्वे स्थानकाला थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव देण्यात यावे, असे त्या म्हणाल्यात. तसेच पुणे रेल्वे स्थानकात शहराचा इतिहास कुठेच नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. सध्या ही मागणी राजकीय आणि सामाजिक वतुर्ळात चचेर्चा विषय ठरली आहे. मेधा कुलकर्णी या काही दिवसांपूर्वी फलटण येथील यशवंत सहकारी बँकेत मोठा आर्थिक घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप करून चर्चेत आल्या होत्या. अनेक ठेवीदारांच्या नावावर खोट्या कर्जांची नोंद करून, त्यांना फसवण्यात आले आहे. काहींच्या 20 ते 25 वर्षांहूनही जास्त जुन्या ठेवी आहेत, पण पैसे मिळवण्यासाठी त्यांना चकरा माराव्या लागत आहेत, असा आरोप त्यांनी केला होता. त्यांनी आता पुणे रेल्वे स्थानकाच्या नामांतराची मागणी पुढे करून पुन्हा एकदा लक्ष वेधले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा विस्तार हा थोरले बाजीराव पेशवे यांनी केला आहे आहे. थोरले बाजीराव पेशवे यांनी त्यांच्या कारकिर्दीत अटकपर्यंत मराठा साम्राज्य नेले. याचे प्रतिक हे शनिवारवाडा आहे. त्यामुळे या दृष्टीकोनातून पुणे रेल्वे स्थानकाला थोरले बाजीराव पेशवे यांचे नाव द्यावे, असे मेधा कुलकर्णी म्हणाल्या.

# एमआयएम नेते इम्तियाज जलील यांच्या विरोधात आंबेडकरी संघटना आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी,
छत्रपती संभाजीनगर, दि. २३ :

एमआयएमचे नेते व माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या विरोधात छत्रपती संभाजीनगर येथे आंबेडकरी संघटनांनी मोर्चा काढला. इम्तियाज जलील यांनी 'हरिजन' शब्द उच्चारल्याने आंबेडकरी संघटना आक्रमक झाल्याचे समजते. या मोचार्वेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा शहरात ठिकठिकाणी तैनात करण्यात आला. दरम्यान, या मोर्चाविषयी एका वृत्तवाहिनीशी बोलताना इम्तियाज जलील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

इम्तियाज जलील म्हणाले, मी सर्व डॉक्युमेंट्स दाखवले होते, पत्रकार परिषदेत देखील बोललो होतो आणि जेव्हा त्यांना समजले की आपण याचे उत्तर देऊ शकत नाही कारण एवढे ठोस पुरावे माझ्याकडे आहेत. तर यांनी काय केले जे एससी समाजाचे जे नेते आहेत जे स्वयंघोषित आहेत यांनी समाजात असे वातावरण निर्माण केले की इम्तियाज जलील जातीवादी आहे, त्याने अशा शब्दाचा वापर केला म्हणून आमची भावना दुखावली गेली.

पुढे बोलताना इम्तियाज जलील म्हणाले, मी 10 वर्ष या शहराचा लोकप्रतिनिधी होतो. आमदार होतो, जिल्ह्याचा खासदार आहे. कोणीही माझ्यावर बोट ठेऊन हे सांगू शकत नाही की मी जातीवाद करतो. कारण मी सर्व धमार्चा आदर करतो. मी आणि आमच्या पक्षाचे अध्यक्ष आम्ही विधानसभा आणि लोकसभेत



सांगितले आहे की या देशात सर्वात मोठा माणूस कोणी जन्माला आला असेल तर ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आहेत, महात्मा गांधी नाही.

इम्तियाज जलील म्हणाले, माझ्यावर फक्त आरोप करून विषयाला कसे बाजूला करता येईल आणि संजय शिरसाट यांना मदत कशी होईल यासाठी हे सगळे नाटक सुरू आहेत. तीन दिवसापूर्वी त्यांची पत्रकार परिषद होती. त्यावेळी संजय शिरसाट म्हणाले होते की इम्तियाज जलील यांनी जे बोलले आहे ते नाही विचारले तरच मी बसणार इथे. तेव्हा पत्रकारांनी म्हटले हो आम्ही नाही विचारात. तुम्ही तिथे पत्रकारिता दाखवा, त्यांना प्रश्न विचारून दाखवा. प्रश्न विचारला असता तर ते उठून जातानाचे रेकॉर्ड करायला पाहिजे होते. माझे नाव ऐकून ते रात्री पण उठतात आता. स्वप्नात येतो मी, इम्तियाज जलील आता उद्या कोणती पत्रकार परिषद घेणार आहे. घेणार आहे एक दोन दिवसात. खूप मोठी पत्रकार परिषद असणार आहे.

# कोकण किनारपट्टीला २५ जून रोजी उंच लाटांचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :

कोकण किनारपट्टीला आज सायंकाळी ५-३० पासून दिनांक २५ जून २०२५ रोजीचे रात्री ८-३० वाजेपर्यंत भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्र (आय.एन.सी.ओ.आय.एस.) तर्फे उंच लाटांचा इशारा देण्यात आला आहे. लहान होड्यांना समुद्रात न जाण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. राज्यात पुढील २४ तासात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह पुणे घाट आणि सातारा घाट परिसरात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. राज्यातील पूर परिस्थिती नियंत्रणात असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने कळविले आहे.

राज्यात मागील २४ तासांमध्ये (२३ जून २०२५ रोजी सकाळपर्यंत) पालघर जिल्ह्यात ७३.३ मिमी पाऊस झाला आहे. तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात ३६.४, रत्नागिरी जिल्ह्यात २५.८ मिमी, ठाणे जिल्ह्यात १४.३ आणि कोल्हापूर जिल्ह्यात १३.९ मिमी सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे.

राज्यात कालपासून आज २३ जून रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमीटरमध्ये) :- ठाणे १४.३, रायगड १०.७, रत्नागिरी २५.८, सिंधुदुर्ग ३६.४, पालघर ७३.३, नाशिक ६.२, धुळे ०.५, नंदुरबार २.९, जळगाव ०.९, अहिल्यानगर ०.२, पुणे ४.३, सोलापूर ०.१, सातारा ४.७, सांगली २.८, कोल्हापूर १३.९, छत्रपती संभाजीनगर १, जालना १.१, धाराशिव ०.२, नांदेड ०.३, हिंगोली ०.४, बुलढाणा १.१, अकोला ३.४, वाशिम ०.४ अमरावती ०.५, यवतमाळ ०.६, वर्धा ०.२, नागपूर १.५, भंडारा ०.६, गोंदिया १.७, चंद्रपूर २.५ आणि गडचिरोली जिल्ह्यात ६.७ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

ठाणे जिल्ह्यात पुरात वाहून एक व खड्यामध्ये बुडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. पुणे जिह्यात नदीत वाहून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

# आमदार अबू आझमी यांच्या विरोधात उद्धव ठाकरे गट आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २३ :

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी पंढरपूरच्या वारी संदर्भात केलेल्या वक्तव्यानंतर आता उद्धव ठाकरे यांचा गट चांगलाच आक्रमक झाला आहे. ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळी यांनी आझमी यांना थेट इशाराच दिला आहे. कोल्हापूरच्या कातड्याची चप्पल हाणून त्यांचे तोंड फोडल्या शिवाय शिवसैनिक शांत बसणार नसल्याचे कोळी यांनी म्हटले आहे.

या संदर्भात बोलताना कोळी म्हणाले की, आझमी हे जर राजकीय विषयावर बोलले असते, तर त्याची दखल देखील घेतली नसती. मात्र, पांडुरंगाच्या वारीवर केलेली टीका खपवून घेणार नाही, असा इशारा कोळी यांनी दिला आहे. आझमी हे ज्या पद्धतीने बोलले आहेत, त्याच पद्धतीने कोल्हापूरच्या कातड्याची चप्पल हाणून त्यांचे तोंड फोडल्या शिवाय शिवसैनिक शांत बसणार नाही, असा इशारा कोळी यांनी दिला आहे. ती संदर्भात बोलताना कोळी म्हणाले की, आझमी यांच्या वक्तव्याने संपूर्ण महाराष्ट्रातल्या मराठी समाज आणि हिंदू यांच्या भावना दुखावल्या आहेत. त्याला शिवसैनिक कधीच माफ करणार नाही. ते ज्या ठिकाणी दिसतील त्या ठिकाणी त्यांना चपलांचा हार घालण्यात येईल. कोल्हापूरच्या चपलेने त्यांचे तोंड फोडले जाईल, असे देखील कोळी यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता या प्रकरणाकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी सोलापुरात माध्यमांशी बोलताना वारीसंदर्भात वादग्रस्त वक्तव्य केले होते. आजपर्यंत कोणत्याही मुस्लिम व्यक्तीने रस्त्यावर उत्सव का साजरे होतात याची तक्रार केली नाही. पण ज्यावेळी मशीद पूर्ण भरते तेव्हा काही मशिदीतील लोकं 5 ते 10 मिनिटे रस्त्यावर नमाज पठण करतात, त्यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणतात रस्त्यावर नमाज पठण केले, तर पासपोर्ट रद्द करु. मी पुण्यातून येताना मला लोकांनी सांगितले लवकर जाऊ अन्यथा पालख्यामुळे रस्ता जाम होईल. रस्ता जाम होतोय, पण आम्ही कधी तक्रार केली नाही. पण नमाजसाठी तक्रार होते, असे अबू आझमी म्हणाले. याचा अर्थ जाणीवपूर्वक काही लोक मुस्लिम बाबतीत हे करत आहेत, असेही त्यांनी म्हटले आहे.

# गॅस सिलिंडर दरवाढीची शक्यता

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :

इराण आणि इस्त्रायलमधील सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. अमेरिकेने इराणच्या अणुस्थळांवर केलेल्या हल्ल्यांमुळे एलपीजीसह इंधन पुरवठ्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. परिणामी, भारतासारख्या आयातदार देशांमध्ये गॅस सिलिंडरच्या दरात लवकरच मोठी वाढ होऊ शकते. अहवालानुसार, भारतात वापरल्या जाणाऱ्या एलपीजीपैकी सुमारे ६६% गॅस हा आयात केला जातो. यातील ९५% गॅस सौदी अरेबिया, युएई आणि कतारसारख्या पश्चिम आशियातील देशांतून येतो. या भागातील युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होण्याचा धोका वाढला आहे. १६ दिवसांचा एलपीजी साठा शिल्लक पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, सध्या भारतातील आयात टर्मिनल्स, रिफायनरीज आणि बॉटलिंग प्लांट्समध्ये केवळ १६ दिवसांचा एलपीजी साठा शिल्लक आहे. जर युद्धामुळे आयात ठप्प झाली, तर देशात एलपीजीचा मोठा तुटवडा निर्माण होऊ शकतो.गेल्या काही वर्षांत एलपीजीची मागणी दुप्पट झाली आहे. सध्या देशातील ३३ कोटी कुटुंबे एलपीजीवर अवलंबून आहेत. त्यामुळे साठवणुकीवरील मयार्दा आणि आयातीवरील वाढलेले अवलंबित्व भारतासाठी गंभीर आव्हान ठरू शकते.

# विदेशी दारूसाठ्यासह ३.१६लाखांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. २३ :



अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या एकाला गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या पथकाने व्हीएमव्ही कॉलेजसमोर पकडले. त्याच्याकडून विदेशी दारूसाठा व वाहन असा एकूण ३ लाख १६ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई रविवारी (दि. २२) केली.

शेगाव नाका ते कठोरा मार्गाच्या दिशेने एक जण वाहनातून विदेशी दारूची अवैधरीत्या वाहतूक करत असल्याची माहिती गस्तीवर असलेल्या गुन्हे शाखेच्या युनिट दोनला मिळाली. या माहितीच्या आधारावर व्हीएमव्ही कॉलेजसमोर नाकाबंदी करून संशयित वाहन थांबवून पाहणी करण्यात आली. त्यावेळी वाहनात ६६ हजार ८१० रुपयांची विदेशी दारू आढळून आली. वाहनातील व्यक्तीची चौकशी केल्यावर त्याने त्याची ओळख मनोहर उर्फ मनोज दगडू चौधरी (३८, रा. हनुमान नगर, खोलापुरी गेट, अमरावती) अशी सांगितली. हा दारू साठा गोपीचंद भांबोरे (रा. दीपार्चन लॉन मागे, अमरावती) याचा असल्याचे सांगितले.

त्यानुसार दोघांविरुद्ध गाडगेनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई गुन्हे शाखेच्या युनिट दोनचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगोले व पथकाने केली आहे.

## फांद्या छाटल्या; खत देऊन फवारणीही केली



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. २३ :
अकोला गार्डन क्लबतर्फे रविवारी वृक्ष संवर्धनासाठी मोहिम राबवण्यात आली. रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांच्या अनावश्यक फांद्या छाटण्यात आल्या. ३०० पेक्षा जास्तझाडांची व्यवस्थित कटाई करण्यात आली. या झाडांना खत देत फवारणीही करण्यात आली.

सध्या पर्यावरणाचे संतुलन बिघडले असून, वृक्षांची कत्तल दिवसेंदिवस वाढतच आहे. अनेक सामाजिक संघटना,पर्यावरण प्रेमींकडून वृक्षारोपण, संगोपनासाठी वर्षभर उपक्रमही राबवण्यात येतात. मात्र या वृक्षांचे व्यवस्थित संगोपन होत आहे. परिणामी वृ?क्षारोपण मोहिमेचा फायदाच होत नाही. त्यामुळे यंदा अकोला गार्डन क्लबने वृक्षसंगोपनासाठी पुढाकार घेतला असून संवर्धनाची मोहिम ठिकठिकाणी राबवण्यात येत आहे. २२ जून रोजी गौरक्षण रोडवर मोहिम राबवण्यात आली. या मोहिमेकरिता सामाजिक कार्यकर्ते निशिकांत बडगे व वृक्षप्रेमी शरद कोकाटे यांनी पुढाकार घेतला असून त्यांच्या मार्गदर्शनात संस्थेचे पदाधिकारी व सदस्य ही मोहीम राबवत आहेत. मोहिमेत क्लबचे अध्यक्ष संजय शर्मा, माजी अध्यक्ष अजय सेंगर, सचिव श्याम गोटफफोडे, शरद कोकाटे, जयप्रकाश पाटील, कोकिळ पाटील ,नीरज आवंडेकर , निशिकांत बडगे, भूषण ताजने इंद्राणी देशमुख आदी सहभागी झाल्या. तसेच खदान पोलीस स्टेशनचे ठाणेदार मनोज केदारे हेही उपस्थित होते.

वृक्षप्रेमींनी सहभागी होणे आवश्यक : झाडाची योग्य वाढ व्हावी, महानगर हिरवेगार व्हावे, या उद्देशाने मोहीम यापुढेही राबवण्यात येणार आहे, असे क्लबचे माजी अध्यक्ष अजय सेंगरयांनी सांगितले. वृक्षारोपण झालेल्या वृक्षांची निगा राखली जात नाही.

नेमकी हीच बाब हेरून अकोला गार्डन क्लबने या वर्षीपासून वृक्ष संवर्धन व वृक्ष संगोपन मोहीम हाती घेतली आहे. दर रविवारी मोहिम राबवण्यात येते.

## शासकीय गावठाण जमिनीवर घरे बांधलेल्या ग्रामस्थांच्या पाठीशी

### रिपाइंचे जिल्हाध्यक्ष सुनील अवचार यांचा निर्धार



**अकोला , दि. २३ :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) जिल्हा बैठक रविवारी पार पडली. जिल्ह्यातील ज्या अतिक्रमणधारकांनी १४ एप्रिल १९९० पूर्वी शासकीय गायरान जमिनीवर अतिक्रमण केलेले, गावठाण जमिनीवर रहिवाशी घरे बांधलेल्या आहेत, त्या ग्रामस्थांच्या रिपाइं खंबीरपणे पाठीशी उभी राहणार आहे. असा ठराव बैठकीत घेण्यात आला.जिल्हाध्यक्ष सुनील अवचार यांच्या अध्यक्षतेत शासकीय विश्रामगृह येथे बैठक पार पडली. यावेळी युवा नेते आशिष सिरसाट, युवक जिल्हाध्यक्ष बुद्धभूषण गोपनारायण,अजय गवई, आशिष सिरसाट, गणेश थोरात, अनिल वाकोडे, संघदीप शेगांवकर, पंडित सदार, दयानंद तेलगोटे, दिनेश पेटकर, किशोर नीलकंठ, प्रकाश तायडे, समाधान वानखडे, विशाल सराटे, सागर तायडे, देविदास डोंगरे आदी उपस्थित होते.

## शिवाजी महाविद्यालयात योग दिन उत्साहात साजरा

**अकोट :** श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), ११ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी., राष्ट्रीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. एस. एच. पांडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक प्रा. प्रफुल्ल देशमुख यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व सांगत विविध योगासने आणि प्राणायाम यांची प्रात्यक्षिके सादर केली. त्यांनी नियमित योगाभ्यासाचे फायदे स्पष्ट करत, शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योग कसा उपयुक्त आहे हे सांगितले. कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख डॉ. एस. एच. निमकर व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. भरत नागरे यांनी केले.

## ल. रा. तो. महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**अकोला :** बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिशन तोष्णीवाल वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथील प्रांगणामध्ये राष्ट्रीय छात्र सेना विभागामार्फत ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाने यांच्या मार्गदर्शनाखाली व एनसीसी ऑफिसर कॅप्टन डॉ. अनिल तिरकर यांच्या नियोजनांतर्गत या योग दिनाचे आयोजन केले होते. यावर्षी योगासनाचे प्रशिक्षण देण्यासाठी योगा शिक्षक प्रा. डॉ. मोनिका तापडिया यांचे सहकार्य लाभले. या योग दिनाच्या कार्यक्रमासाठी डॉ. वंदना मिश्रा, डॉ. महेश डाबरे, डॉ. ज्योती माहेश्वरी, डॉ. स्वाती दामोदरे, डॉ. निलेश चोटिया, डॉ. नागनाथ गुट्टे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. योग ही एक प्राचीन भारतीय पद्धत आहे, जी असंख्य शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक फायदे देते. ती शारीरिक आसने , श्वास घेण्याच्या तंत्रे आणि ध्यान यांचे संयोजन करून एकूण कल्याण आणि सुसंवादाची भावना निर्माण करते, असे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील ७२ एन. सी. सी. कॅडेटनी सहभाग घेतला होता.

## काँग्रेसच्या उभारीसाठी पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

■ महासागर प्रतिनिधी,
खामगाव , दि. २० :
खामगाव विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतल्यानंतर मतदार संघात चांगलीच उलथापालथ झाली आहे. या मतदारसंघात काँग्रेसचे अनेक वर्षे वर्चस्व राहिले आहे. प्रदेश काँग्रेसकडून पक्षाला उभारी देण्याचा प्रयत्न सुरू आहे. याच अनुषंगाने मागील काही दिवसांत नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आल्या आहेत. काँग्रेसचा मोठा जनाधार असल्यामुळे तो टिकून ठेवण्याचे आव्हान नव्या शिलादारासमोर उभे आहे. खामगाव मतदार संघाचे सलग तीन वेळा आमदार राहिलेले काँग्रेसचे माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा राजीनामा देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यामुळे या मतदार संघातील राजकीय वातावरण ढवळून निघालेले आहे. सानंदा यांचा प्रवेश सोहळा होण्यापूर्वीच बाजार समितीचे सभापती सुभाष पेसोडे व काही संचालक यांनी मुंबई येथे अजित पवार यांच्या उपस्थितीत प्रवेश केला होता. सानंदा यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष



प्रवेशावेळी त्यांच्यासोबत काँग्रेसचे तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही प्रवेश घेतला. मात्र काँग्रेसचा मोठा जनाधार असलेल्या या मतदारसंघात काँग्रेसला गळती लागत असतानाच काँग्रेसच्या निष्ठावंत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपण काँग्रेसमध्येच राहण्याचा निर्णय घेतलेला आहे.

या राजकीय घडामोडी दरम्यान प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी खामगाव विधानसभा मतदार संघाकडे विशेष लक्ष दिले आहे. प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी तात्काळ खामगाव विधानसभा समन्वयक, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष यासोबत जिल्हा कार्यकारणीमध्ये मतदारसंघातील जुन्या जाणत्या पदाधिकाऱ्यासोबत नव तरुणांनाही संधी दिल्याचे केलेल्या नियुक्त्या वरून दिसून येत आहे.खामगाव मतदार संघात सद्यस्थितीत काँग्रेसला खिळिखळी करण्याचा प्रयत्न इतर पक्षाचा सुरू असला तरीही या मतदारसंघात काँग्रेसचा मोठा जनाधार आहे. आतापर्यंत माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनीच काँग्रेस पक्षाची एकहाती कमान सांभाळली होती. गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवार दिलीपकुमार सानंदा यांना पराभूत होऊनही ८५ हजार मतदान मिळालेले आहे. त्यामुळे काँग्रेसच्या वरिष्ठांनी विशेष लक्ष देत उभारी देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. नव्या पदाधिकाऱ्याकडे धुरा सोपवली आहे.

# महाविकास आघाडीचा एकत्र लढण्याचा निर्धार:माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा , दि. २३ :
लाडकी बहीण योजना असो किंवा अन्य योजना या केवळ प्रलोभनांसाठीच होत्या. शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिलं. मात्र ते पूर्ण केलेलं नाही. आज शेतकऱ्यांची परिस्थिती दयनीय आहे.त्यामुळे महाविकास आघाडीकडूनच राज्यातील जनतेला मोठ्या अपेक्षा आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका महाविकास आघाडी एक दिलाने लढणार, असे



प्रतिपादन माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी केले.

नर्मदा हॉलिडेज, येळगाव येथे महाविकास आघाडीपदाधिकाऱ्यांची समन्वय बैठक २२ जून रोजी पार पडली. यावेळी डॉ. शिंगणे बोलत होते. प्रमुख म्हणून आ. सिद्धार्थ खरात, राहुल बोंद्रे, माजी आमदार राजेश एकडे, शाम उमाळकर, जयश्री शेळके, जालिंदर बुधवत,वसंतराव भोजने, नरेश शेळके, प्रसेनजीत पाटील, नाना कोकरे यांच्यासहित मान्यवर उपस्थित होते.

आघाडीच्या नेत्यांनी त्यागाची भूमिका स्वीकारावी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना जास्तीत जास्त सत्ता पदे मिळावी यासाठी नेत्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी प्रसंगी त्यागाची भूमिका ठेवून एक दिलाने काम करायचे आहे असे आवाहन डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी याप्रसंगी केले.राहुल बोंद्रे यांनी महाविकास आघाडी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ताकतीने लढणार असल्याचे सांगितले.



## आठवडी बाजारातील व्यावसायिक गाळ्यांना उतरती कळा

**मलकापूर पांग्रा:** जवळपास सत्तर ते ऐंशी वर्षांपूर्वी येथील आठवडी बाजारात व्यावसायिकांसाठी गाळ्यांची निर्मिती करण्यात आली होती. परंतु, प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे या गाळ्यांना उतरती कळा लागली आहे. बहुतांश गाळे जीर्ण झाले असून, ते कधीही कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे व्यावसायिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. जिल्ह्यात सर्वांत मोठी बाजारपेठ म्हणून मलकापूर पांग्रा गावाची ओळख आहे. या बाजारात जिल्ह्यातील खामगाव, मेहकर, लोणार, सिंदखेडराजा, चिखली देऊळगावराजासह परजिल्ह्यातील व्यावसायिक येत असतात. जवळपास सत्तर ते ऐंशी वर्षांपूर्वी येथील आठवडी बाजारात व्यावसायिकांसाठी गाळ्यांची निर्मिती करण्यात आली होती. परंतु दरम्यानच्या काळात प्रशासनाने या गाळ्यांची कोणतीही दुरुस्ती न केल्यामुळे बहुतांश गाळे मोडकळीस आले आहेत. जीर्ण झालेले हे गाळे कधीही कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे व्यावसायिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. गाळ्यांच्या दुरुस्तीबाबत शासकीय व राजकीय अनास्था दिसून येत आहे. आठवडी बाजारात सर्वत्र घाणही पसरली असून, घाण पाण्याच्या नाल्या भरून वाहत आहेत. थोडाही पाऊस पडला की बाजारात चालणे कठीण होत आहे. परिणामी अनेक व्यावसायिक या नाल्यांवरच आपली दुकाने थाटत आहेत. खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांना घाण पाण्याचा सामना करावा लागत आहे. आठवडी बाजाराची भयावह परिस्थिती झाली असतानाही प्रशासन कोणत्याही उपाययोजना न करता केवळ वसुली करण्यात व्यस्त आहे.

## जिल्ह्यातील ८२ हजार हेक्टर क्षेत्र येणार ओलिताखाली

### वैनगंगा-नळगंगानदीजोड प्रकल्प



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. २३ :
महत्त्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे जिल्ह्यातील ८२ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. प्राथमिक सर्वेक्षणानुसार या प्रकल्पांतर्गत ४ तालुक्यातील ४७ गावांमधून मुख्य कालवा जाणार आहे. जिल्ह्यात २५१ एमएम क्युब (१ एमएम क्युब म्हणजे १० कोटी लिटर पाणी) क्षमतेचे चार मोठे साठवण तलाव तयार करण्यात येणार आहेत. शेतीला नवसंजीवनी देणाऱ्या प्रकल्पाबाबत शेतकरी जागर मंचाकडून बैठकांच्या माध्यमातून सकारात्मक जनजागृती करण्यात येत आहे. या प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांमध्ये उत्सुकता असून, ते सर्वोतोपरी मदत करण्यास तयार असल्याचे बैठकांमधून दिसून येत आहे. जिल्ह्यात खरीप हंगामासाठी ४ लाख ३२ तर रब्बीचे क्षेत्र १ लाख २७ हजार ७२० हेक्टर आहे. उन्हाळी पिके ९ हजार २२३ हेक्टर क्षेत्रावर घेण्यात येतात.

**येथे होणार तलाव–**

बार्शीटाकळी व अकोला तालुक्यात प्रत्येकी दोन तलाव तयार करण्यात येणार आहेत. बार्शीटाकाळी तालुक्यात लोअर काटेपूर्णा (६५ एमएम क्युब ), येळवण (३६ एमएम क्युब) येथे होणार आहे. अकोला तालुक्यातील शिसा उदेगाव (७५ एमएम क्युब), चिखलगाव (७५ एमएम क्युब) येथे तलाव होणार आहे.



# कार्यालय नगर पंचायत भिवापुर

## मालमत्ता फेरफार जाहीरनामा

जा.क्र. कवि/जाहीरनामा/कावी/२०२५/५२२ दि. : २८/०६/२०२५

सर्व नागरीकांना या व्दारे सूचित करण्यात येते की, न.पं. भिवापुर मालमत्ता दस्ताऐवज नोंद नुसार रकाना क्र. ५ मध्ये दाखविण्यात आलेली मालमत्ता खरेदी/बक्षिस/वाटणी/मृत्युपत्रा व्दारे खालील अर्जदारांनी सदरहू मालमत्ता स्वतःचे नावे करण्याबाबत कर विभाग न.पं.भिवापुर कार्यालयात म.न.प.न. पं.व. औ. न. अधिनियम १९६५ चे कलम १३० अन्वये अर्ज दाखल केले आहे.

याबाबत कोणाला आक्षेप घ्यावयाचा असेल तर त्यांनी जाहीरनामा प्रसिध्दी पासुन ७ दिवसांचे आंत पुराव्यानिशी लेखी आक्षेप मुख्याधिकारी न.पं. भिवापुर यांचे कार्यालयात सादर करावा. मुदंतीच्या आंत पुराव्यानिशी लेखी आक्षेप सादर न झाल्यास आक्षेप नाही असं गृहीत धरुन नियमा नुसार सर्व प्रकारचे आवश्यक शुल्क वसुल करुन अर्जदाराचे नावाने नोंद घेण्यात येईल, मुदंती नंतर प्राप्त आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही. याची सर्वानी नोंद घ्यावी.

| अ.क्र | सद्या ज्या नांवावर मालमत्ता आहे ते नांव | ज्या नावावर मालमत्ता हस्तांतर करावयाचे आहे ते नांव | वार्ड क्रमाक | मालमत्ता क्रमांक | लाखाचे प्रकार | मालमात्तेचे प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शासकीय भूखंड | श्री संतोष अभिमन चौधरी | १ | नवीन | मा. तहसील कार्यालय यांचे आदेश | भू. मा. क्र १५०/B |
| २ | गुणाबाई महागू मानकर | श्री शंकर महागू मानकर | ५ | २९८२ | आखीत्रपत्रीका अन्वये | न.भु.मा.क्र. १५६० |
| ३ | श्री अंताराम भा. ज्ञानेश्वर जंगलू जनबंधू | श्री ज्ञानेश्वर जंगलू जनबंधू व इतरं २ | १ | ४११ | आखीवपत्रीका अन्वये | न.भु.मा.क्र. ११५० |
| ४ | श्री महादेव राघो लूचे | श्री मंगेश सीताराम लूचे | २ | ४५१७ | विक्रीपत्र व सातबारा | भू. मा. क्र ४७३/२ /४७३/१४४ |
| ५ | रमन श्रीहरी चिमूरकर व इतर २ | गीता मन्साराम चौधरी | २ | नवीन | मा. तहसील कार्यालय यांचे आदेश | भू. मा. क्र ३८४/ १/१ |
| ६ | श्री राजकुमार बबन गुप्ता व इतर २ | नरसिंग बबनप्रसाद गुप्ता | २ | ८५५ | आखीवपत्रीका व विक्री पत्रा अन्वये | न.भु.मा.क. १६८० /८३ |
| ७ | श्री रमेश वासुदेव भुसारी | श्री गुरुप्रसाद प्रकाश काकडे | १ | ६२३/१ | विक्रीपत्र व सातबारा | भू. मा. क्र २९९/ ९/७२ |
| ८ | श्री खुशाल सत्तूजी सहारे | सत्त्वशीला प्रमोद टेंभुर्ण | १ | १६५ | आखीवपत्रीका अन्वये | नभुमान १०५० |
| ९ | श्री रामकृष्ण गोमा खडे | श्री लीलाधर रामकृष्ण खडे व इतर ४ | ३ | १७५३ | आखीवपत्रीका अन्वये | न.भु.मा.क्र. ८०९ |
| १० | श्री सोमा अंतु गायकी, पार्वता सोमा गायकी | छाया चंद्रशेखर गायकी इतर ०१ | ३ | १८२२ | आखीवपत्रीका अन्वये | न.भु.मा.क्र ३२ |
| ११ | देवनाथ कारू गजभीये | भानुमती देवनाथ गजभीये इतर ३ | १ | ३१७ | वारसान शपथपत्र व मृत्यूपत्र | |
| १२ | सिद्धार्थ भदबा वानखेडे | सुशीला सिद्धार्थ वानखेडे | ४ | २७१२ | वारसान शपथपत्र व मृत्यूपत्र | |
| १३ | रामदास रामाजी श्रीरामे | राजू रामदास श्रीरामे व इतर ३ | ३ | २०३२ | वारसान शपथपत्र व आखीत्रपत्रीका अन्वये | न.भु.मा.क्र. ५८१ |
| १४ | शासकीय भूखंड | त्रिवेणी कालीचरण चौधरी | २ | नवीन | मा. तहसील कार्यालय यांचे आदेश | भू. मा. क्र ११७/B |
| १५ | तुळशिराम जैराम धनविजय | नरेश तुळशिराम धनविजय व इतर ४ | ४ | २७५० | वारसान शपथपत्र व मृत्यूपत्र | |
| १६ | चितामण सुकरू मांढरे | राजू चितामण मांढरे व इतर | ५ | ३०९८ | आखीवपत्रीका अन्वये | न.भू.मा क्र १४४२ |
| १७ | जनार्दन रामचंद्र वानखडे | लीलाधर रामाजी दिघोरे | २ | ४२२९ | विक्रीपत्र व सातबारा | भू. मा. क्र ४७३/२ /४७३/४/४६ |

(मिलिंद साटोणे)
मुख्याधिकारी
नगर पंचायत भिवापूर

# अरण्य योगी दादा चितमपल्ली

**कोणतीही साहित्यिक विधा असो, कोणत्याही प्रकारची विद्या असो, कसल्याही प्रकारचे संशोधन असो, त्याच्या प्रारंभापासूनच एका परंपरेची निर्मिती होत असते. साधारणतः ती परंपरा निर्बंधित, स्वतःच स्वतःला जोपसणारी असते. युगा-युगापासून ज्ञानाच्या परंपरेची ही अटूट श्रृंखला आपापल्या विधेत, समाजहितकारी कार्य करीत असते. फक्त परंपरा जोपासणा?याचे नाव बदलत असते, जसे आमचे दादा चितमपल्ली !**

---

■ कौशल मिश्र
वर्धा.

---

अरण्य ऋषी दादा मारुती चितमपल्ली, वैदिक काळातील वने, वन्य प्राणी व प्राचीन काळात त्यांचे रीतसर वैज्ञानिक अध्ययन करण्याकरिता वनातच राहणारे ऋषी मुनी यांच्या परंपरेचा या आधुनिक युगात, प्रतिनिधित्व करीत आहेत.

पालकाप्य मुनि शातकर्णी ऋषी, वराहमिहीर, हँसदेव जैन मुनी, डल्हनाचार्य या विभूतीचा वारसा त्यांना लाभला आहे व त्यांच्या संपूर्ण लेखनात, वाणीत, स्वभावात, आहारात, कोणीही भावनाशील व्यक्ती प्राचीन ऋषी मुनींशी त्यांची तुलना आपोआपच करायला लागत असे, हे मी स्वतः कित्येक वेळा पाहिले आहे.

वन्य जीवनाशी समरस होऊन मृदुल भावना जोपासणे व सातत्याने पन्नास वर्ष समाजहिताकरीता निसगार्शी नवीन पीढी जोडण्याकरीता लेखन करीत राहणे या काळात अशक्यच आहे. परंतु दादांच्या तपस्वी व निसर्ग अर्पित स्वभावामुळे दुश्वार कार्य शक्य झाले.

दादांचे संपूर्ण साहित्य वन आत्मा व आत्मियतेचे प्रतीक आहे आणि मराठी भाषेला गौरवान्वित करणारी आहे. जंगलाशी त्यांचे नाते, स्नेहबंध अभूतपूर्व स्वरुपात त्यांच्या प्रत्येक कथेत झळकते.

पाच भाषा बोलणा?या दादांचे शहर सोलापूर ही जन्मस्थळी. परंतु वनविभागात नोकरीच्या निमित्ताने 50 वर्षे विदर्भातच त्यांचा निवास राहिला. यात दुमत असायला नकोच की इंग्रजी वन्य साहित्य क्षेत्रात काही उत्कृष्ट वन साहित्य उपलब्धआहे. प्रकृती संवर्धन क्षेत्रात, साहित्य निर्मितीद्वारे आपले योगदान देणारे ते लेखक गण वारंवार अभिनंदनाचे पात्र आहेत.

परंतु दादांसारख्या जीवनातील प्रदीर्घ कालखंड वने, वृक्ष, वन्यजीवन यांच्या सानिध्यात व त्यांच्या वैज्ञानिक विवेचनेत समर्पक भाव ठेवून कार्य करणारे संपूर्ण देशात क्वचितच मिळतील.

वनविभागाच्या सेवेत राहून दादांद्वारे भावूक, प्रेमळ व प्रेरणास्पद साहित्याची रचना करणे अद्वितीय कार्याच्या श्रेणीत ठेवण्यात येईल. जन्मापासून व समज आल्यानंतर वनाशी मी स्वतः संबंधित आहे व मला स्वेच्छापूर्वक जाणीव आहे की, साहित्य रचना, कोमल भावनांची जोपासना करण्याकरीता येथे वाट फारच अरुंद आहे.

दादा चितमपल्ली यांनी आपल्या साहित्यात, गोंदिया, भंडारा, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली भागातील मराठी भाषेतील प्रयुक्त बोलीभाषेतील अभूतपूर्व 1,00,00 शब्दांचा प्रयोग केला आहे. त्यांची सर्व पुस्तके मिळून एक अत्यंत उपयोगी मराठी बोलीभाषेचा शब्दकोष उदयास आला आहे. त्यांचे संपूर्ण साहित्याचे पठन केल्यानंतर कोणत्याही रसिक पाठकाच्या या विलक्षण शब्दांचा संसार लक्षात येणारच.

पुणे संस्कृत महाविद्यालय व कवि कालीदास संस्कृत विद्यापीठाचे विद्यार्थी राहिलेले दादा, संस्कृत भाषेचे अध्येता व पाली भाषा, हिंदी, इंग्रजी वन्य साहित्याच्या सर्व पुस्तकाचे अध्ययेता होते. अरण्य ऋषि यांनी लिहीलेले संपूर्ण साहित्य अरण्य अंतरंगतेचा दीर्घ प्रवास आहे व त्यांचा संत स्वभाव, अपरिग्रह हे जंगलांच देणं त्यांना आहे.

आषाढ सरीचा सागवान वृक्षाच्या मोठ्या सळसळीत पानावर पडणाऱ्या पावसाच्या थेंबाची अभूतपूर्व संगीत



रचना मानव विरहीत अरण्यात असणाऱ्या देवालयाची भग्नावस्था, गणित पणाचें रुदन व नवपल्लवित पानांची सुकुमार भाषा देवांनीच माणसाला दिलेल्या करुणा व उल्हास व त्यातून अंकुरीत अरण्याचा साक्षात्कार पाहण्याकरीता अख्खे जीवन अरण्य अंतरंग राहावे लागते, दादांसारखी तपस्या करावी लागते. त्यांच्या तपाचे परिणाम, त्यांच्या संपूर्ण साहित्यात उकेरलेले आहे.

नवेगाव अभयारण्याच्या प्रारंभिक अवस्थेत अभयारण्य विकसित करण्यात दादांचा अमोल वाटा आहे. तसे पाहिले तर तो त्यांच्या मेहनत, कार्यक्षमता, शिस्तबद्ध आकलनाचा परिणाम आहे की आज हजारोंच्या संख्येत स्थलांतरीत पक्षी तेथे येतात.

दादांच्या रानवाटा, पक्षी जाये दिगंतरा, घरट्या पलीकडे, नवेगाव बांधचे दिवस, जंगलाचं देणं या पुस्तकाना उच्चस्तरीय पुरस्कारांद्वारे सन्मानित करण्यात आले. राज्यात दादांचा एक विशिष्ट पाठक वर्ग आहे व नवीन पीढीने, निसर्ग, वन्यजीवन, वन्यप्राणी पक्षी, वने याच्याशी परिचित व्हावे, त्यांचे रक्षण करावे, हाच त्यांचा आग्रह असे.

दादांनी लिहीलेल्या चकवा चांदण आत्मवृत्तांतात, सोलापूर येथे जन्म झाल्यानंतर थेट त्यांचे प्रिय मित्र माधवरावजी पाटील यांच्या पर्यंत दादा चितमपल्ली यांनी भोगलेल्या यथार्थ व सृजनतेचे प्रतीबिंब आहे. शासकीय नोकरीत अत्यंत कर्तव्यदक्षता, श्रमसाध्यता, इमानदारी बाळगून उत्तम कार्य करण्यात कधी-कधी किती नरकीय यातना भोगाव्या लागतात याचे यथार्थ चित्रण या ग्रंथात अदभूत स्वरुपात वर्णन करण्यात आले आहे.

याबाबतीत दादा सर्वांचा आदर करतांना लिहितात, सुज्ञ व दुष्ट प्रवृत्तीच्या माणसाचा हा संघर्ष सनातन आहे, चांगल्या माणसाचे अनेक प्रकार असू शकतात, परंतु दुष्ट माणसंही सर्वकाळ सारखीच असतात. स्वप्नसृष्टीचे अतीरंजीत लालित्य या पुस्तकात नाही. अपीतु अरण्यात दडलेला ईश्वरकृपेचा बोध घेऊन अत्यंत सहजतेने जीवन व जंगल याची मार्मिकता, उल्हास शब्दात उकेरण्यात आला आहे.

चकवा चांदण भिन्न भिन्न स्थितीत परिस्थितकीय मानवीय व्यवहारात उद्भवलेल्या भावनांचे जीवनात समायोजन कशाप्रकारे करता येऊ शकते व मानवीय स्वभावात असलेली सहजतेची दुर्बोधता कशाप्रकारे अंगीकार करावी लागते या भावाचा अमोल दस्तावेज आहे. दादा पक्षी व पक्षी स्थलांतरणाचे वरिष्ठ ज्ञाता होते.

त्यांनी लिहिलेला पक्षी शास्त्र ग्रंथ पक्षी मित्रांकरिता वरदानस्वरुप आहे. तृणमोर पक्षी शोधण्यात त्यांना यश आले होते. रानकुत्र्यांवरील त्यांचे संशोधन, आज या विषयावरील संशोधनकर्त्यांकरीता, विद्यार्थ्यांकरीता दादांची अप्रतीम देणगी आहे.

डॉ. सलीम अली, प्रसिद्ध चित्रकार आलमनेरकर, प्रसिद्ध लेखक पु.ल. देशपांडे, बाबा आमटे, माडगुळकर दादांचे परम मित्र. या सर्व थोर पुरुषांचा दादांसोबत परम स्नेह होता.

दादा जीवनातील दारुण प्रसंगावर मात देत 93 वर्षांच्या वयात साहित्य सृजनात अविरत साहित्य साधनेत मग्न होते. प्रचार विरहित स्थितप्रज्ञता कशी असते याचा सहज बोध त्याच्यात होतो. दुष्काळ असो किंवा असहनीय उन्हाळा असो, नदीचा प्रवाह ओसरेल, संथ होईल, नजरेस येणार नाही. परंतु शेकडों वर्ष प्रवाहाची अंतीम परिणितीत पाण्याचे मूळतत्व तसेच असते, अद्दश्य. प्रत्येक पावसाळा नवीन जलप्रवाह घेऊन येतो, परंतु त्या नवीन प्रवाहाला मूळतत्त्वाशी शाश्वत विलीनीकरण परंपरेचे अनुगमन करावेच लागते. आमचे दादा आरण्य साहित्याचे मूळतत्त्व होते.

साहित्य सृजनाच्या प्रत्येक क्षेत्रात हेच घडत असते. कोणतेही साहित्य असो, विधान असो, त्यात मूळतत्त्व चिरंतन असते, अक्षुण राहते. त्या-त्या विधेतील मूळतत्त्वाचा पारंपारिक आधार घेऊनच साहित्य प्रवाहाचा पुढील प्रवास सुरु असतो. सर्व नदी आणि ओढ्यांची अपार जलराशी समुद्र आणि वृहद नद्या यांना येऊन मिसळते. समुद्र आणि मोठ्या नद्या नम्रनत (खालील भागात) असतात, हेच त्यांच्या श्रेष्ठत्वाचे प्रमाण नाही का? आम्हा सर्वांकरीता तर अरण्य ऋषी दादा चितमपली, संत ज्ञानदेव महाराजांच्या ओवी स्वरुपच आहेत.

। अविद्ये काळवंखे ।
की सुबोध सुदिने फांके ।
सितले प्रसादाकें। जया चेनि ।।

ज्याच्या शीतल प्रकाशामुळे अविद्यासम तिमीर नष्ट पावते आणि आत्मबोधरुपी सुदिवसाचा उदय होऊन संपूर्ण ज्ञानमय प्रकाश सर्वत्र पसरतो.

■ ■ ■

# विधवा भगिनींचा आवाज बुलंद व्हावा!

**आज सशस्त्र संघर्ष, विस्थापन आणि स्थलांतर आणि कोविड-19 साथीच्या आजारामुळे हजारो स्त्रिया नव्याने विधवा झाल्या आहेत आणि इतर अनेक ज्यांचे जीवनसाथी हरवले आहेत किंवा गायब झाले आहेत. विधवांचे अनोखे अनुभव आणि गरजा समोर आणल्या पाहिजेत, त्यांच्यासोबत मार्ग दाखवणारे आवाज बुलंद केले पाहिजेत. भारतात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने समान दर्जा देण्यासाठी अनेक संघटना आणि समाजसुधारक कार्य करत आहेत. मात्र भारतातील विधवांच्या प्रश्नाकडे डोळेझाक करण्यात येत असल्याचा आरोप होत राहतो. विधवांना त्यांचे हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने २३ जून हा दिन आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तेव्हा जाणून घेऊया काय आहे विधवा दिनाचा इतिहास, महत्व आणि उद्देश याबाबतची माहिती.**

---

कोणत्याही स्त्रिला आपल्या जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे. मात्र काही कारणास्तव त्यांचा जोडीदार गमावल्याने अशा महिलांना एकाकी आयुष्य जगावे लागते. त्यामुळे विधवा महिलांचे प्रश्न मोठे भयंकर आहेत. विधवा महिलांचा प्रश्न फक्त भारतातच नाही, तर जगभरात गंभीर होत चालला आहे.

त्यासाठी गेल्या सात वर्षापासून यूकेची लूम्बा फाउंडेशन ही संस्था जगभरातील विधवा महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात संयुक्त राष्ट्रांमध्ये मोहीम राबवत आहे. विधवांचे प्रश्न बिकट झाल्याने संयुक्त राष्ट्र संघाने २३ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

जागतिक पातळीवर विधवा महिलांचे प्रश्न भयंकर असल्याने संयुक्त राष्ट्राने २३ जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिन साजरा करण्याचे जाहीर केले. त्यानुसार दरवर्षी विधवा दिनाचे औचित्य साधून या दिवशी विधवा महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. जगभरातील विधवा महिलांची स्थिती सुधारावी, त्यांना इतर महिलांसारखे सामान्य जीवन जगता यावे यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात येतात.

इतर सामान्य महिलांसारखे त्यांना समान हक्क मिळण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघ प्रयत्न करते. मात्र आपण कितीही प्रगत झालो, तरी विधवा महिलांकडे पाहण्याचा आपला द्दष्टीकोन बदलत नाही.

जागतिकीकृत पातळीवर विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पती नसल्याने कुटूंब त्यांच्याकडे विशेष लक्ष देत नाही. तर कधी विधवा महिलांना वा?यावर सोडले जाते.

यामुळे जगभरातील लाखो विधवा महिला गरिबी, हिंसाचार, बहिष्कार, बेघरपणा, आजारी आणि समाजातील भेदभाव सहन करतात. विधवाविवाहास आपण सर्वपरीने प्रोत्साहन आणि आटोकाट प्रयत्न केले पाहिजे. जगभरातील ११५ दशलक्ष विधवांना गरिबीत जगण्यास भाग पाडले जाते. तर ८१ दशलक्ष महिलांना शारीरिक शोषणाचा सामना करावा लागत असल्याचे विविध अहवालातून स्पष्ट झाले आहे.

जागतिक पातळीवर विधवा महिलांच्या न्याय हक्काचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यात भारतातही विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. भारतात चार कोटींहून अधिक विधवा महिला आहेत. आजही विधवा महिला त्यांच्या हक्कापासून वंचित आहेत.

या विधवा महिलांना पती नसल्याने मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागते. एक उदाहरण आहे- जोवेरिया नाबुकेन्या एक विधवा, इसिंगिरो जिल्ह्यात तिच्या काही ८ नातवंडांसोबत वाचते. युनिसेफच्या पाठिंब्याने नाबुकेन्या मुख्य कौटुंबिक काळजी प्रॅक्टिसेसवर आहेत. तिची एक दिनचर्या आहे जिथे ती मुलांसोबत वाचते आणि ते शिकत असताना त्यांच्यासोबत खेळते.

जगभरातील बऱ्याच महिलांसाठी, त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी आणि प्रतिष्ठेसाठी दीर्घकालीन लढ्याने जोडीदाराचा विनाशकारी तोटा वाढविला जातो.

जगभरात २५८ दशलक्षाहून अधिक विधवा असूनही, विधवांना ऐतिहासिकद्दष्ट्या आपल्या समाजात न पाहिलेले, समर्थन न मिळालेले आणि मोजले गेलेले नाही. भूतकाळातील अनुभव दर्शवितो, की विधवांना अनेकदा वारसा हक्क नाकारले जातात, जोडीदाराच्या मृत्यूनंतर त्यांची मालमत्ता बळकावली जाते आणि रोगाचे 'वाहक' म्हणून त्यांना अत्यंत कलंक आणि भेदभावाचा सामना करावा लागतो.

जगभरात, पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना वृद्धापकाळ निवृत्तीवेतन मिळण्याची शक्यता खूपच कमी आहे, म्हणून जोडीदाराच्या मृत्यूमुळे वृद्ध स्त्रियांना निराधारपणा येऊ शकतो. लॉकडाऊन आणि आर्थिक बंदच्या संदर्भात विधवांना ते खूप आजारी पडल्यास किंवा स्वतःला आणि त्यांच्या मुलांचे पालनपोषण करण्यासाठी त्यांना बँक खाती आणि पेन्शन मिळू शकत नाहीत.

एकटी-माता कुटुंबे आणि अविवाहित वृद्ध स्त्रिया आधीच विशेषतः गरिबीसाठी असुरक्षित आहेत, हे एक क्षेत्र आहे ज्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय विधवा दिनी जगभरातील विधवांवर परिणाम करणाऱ्या काही समस्या आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि प्रगती करण्यासाठी काय केले पाहिजे यावर एक नजर टाका.

युनायटेड नेशन्स सन २०११पासून २३ जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिवस म्हणून पाळत आहे, विधवांच्या आवाजाकडे आणि त्यांच्या अनुभवांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि त्यांना आवश्यक असलेला अनोखा पाठिंबा मिळवण्यासाठी पाळला पाहिजे. आता पूर्वीपेक्षा अधिक हा दिवस विधवांना पूर्ण हक्क आणि मान्यता प्राप्त करण्याच्या दिशेने कृती करण्याची संधी आहे.

यामध्ये त्यांना त्यांचा वारसा, जमीन आणि उत्पादक संसाधनांचा वाजवी वाटा मिळण्याची माहिती प्रदान करणे समाविष्ट आहे; निवृत्तीवेतन आणि सामाजिक संरक्षण जे केवळ वैवाहिक स्थितीवर आधारित नाही; सभ्य काम आणि समान वेतन; आणि शिक्षण आणि प्रशिक्षण संधी. विधवांना स्वतःला आणि त्यांच्या कुटुंबांना आधार देण्यासाठी सक्षम करणे म्हणजे सामाजिक कलंक दूर करणे ज्यामुळे बहिष्कार आणि भेदभाव किंवा हानिकारक प्रथा निर्माण होतात.

शिवाय महिलांविरुद्ध सर्व प्रकारचा भेदभाव निर्मूलनाचा करार आणि बालहक्कावरील अधिवेशनासह आंतरराष्ट्रीय कायद्यात नमूद केल्याप्रमाणे विधवांच्या हक्कांची खात्री करण्यासाठी सरकारांनी त्यांच्या वचनबद्धतेचे पालन केले पाहिजे. विधवांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय कायदे अस्तित्वात असतानाही, अनेक राज्यांच्या न्यायिक व्यवस्थेतील कमकुवतपणामुळे विधवांच्या हक्कांचे व्यवहारात संरक्षण कसे केले जाते आणि त्याकडे लक्ष दिले पाहिजे.

न्यायिक अधिकाऱ्यांकडून जागरूकता आणि भेदभावाचा अभाव यामुळे विधवा न्याय व्यवस्थेकडे नुकसान भरपाई मागण्यासाठी वळू शकत नाहीत. शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कृती योजनांच्या संदर्भात विधवा आणि त्यांच्या मुलांवरील हिंसाचार, गरिबी निर्मूलन, शिक्षण आणि सर्व वयोगटातील विधवांना इतर समर्थन यासाठी कार्यक्रम आणि धोरणे देखील हाती घेणे आवश्यक आहे.

संघर्षानंतरच्या परिस्थितीत विधवांना शांतता निर्माण आणि सलोखा प्रक्रियांमध्ये पूर्णपणे सहभागी होण्यासाठी आणले पाहिजे जेणेकरून ते शाश्वत शांतता आणि सुरक्षिततेसाठी योगदान देतील आणि कोविड-19 च्या संदर्भात विधवांना पुन्हा चांगले सक्षम बनवण्यासाठी आमच्या कामातून सोडले जाऊ नये.

आमची पुनर्प्राप्ती त्यांच्या अनन्य गरजांना प्राधान्य देते आणि समाजांना अधिक समावेशक, लवचिक आणि सर्वांसाठी समान होण्यासाठी समर्थन देते, याची खात्री करूया.



कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे
रामनगर, गडचिरोली.
९४२३७१४८८३.

■ ■ ■

# जेव्हा तुमच्या घरी दिवा लागतो... तेव्हा कोणाचा तरी जीव पणाला लागतो!

**आपण घरात सुरक्षित बसलेलो असतो... बाहेर मुसळधार पाऊस कोसळत असतो, सोसाट्याचा वारा सुटलेला असतो किंवा कडक ऊन अक्षरशः अंगाची लाही लाही करत असते. आपण आपल्या घराचे दरवाजे, खिडक्या बंद करून निवांत असतो. पण याच वेळी, काही माणसं आपल्या घराचे दरवाजे उघडून, आपल्या आयुष्याची लढाई लढायला बाहेर पडत असतात. ते असतात आपले लाइनमन खरे प्रकाश योद्धा!**

---

● योगेश विटनकर
नागपूर.

---

वीज गेली की आपल्यापैकी अनेकांना लगेच राग येतो, चिडचिड होते. "अरे देवा! पुन्हा लाईट गेली? कधी येणार आता?" असे उद्गार आपोआप बाहेर पडतात. पण तुम्हाला माहीत आहे का, याच एका क्षणी शेकडो घरांमध्ये धाकधूक सुरू होते?

नियंत्रण कक्षातून फोन येतो, "लाईन चालू करा!" आणि मग जराही वेळ न घालवता तो कर्मचारी वादळ, पाऊस किंवा भर उन्हात आपल्या कामावर निघतो. तो हे विसरून जातो की, तो कोणाचा तरी प्रेमळ बाप आहे, कोणाचा तरी आधारवड मुलगा आहे किंवा कोणाचा तरी काळजीवाहू पती आहे.

त्याच्या कुटुंबीयांचे डोळे त्याच्या वाटेकडे लागलेले असतात. मुलं देवाजवळ आपल्या बाबांच्या सुखरूप परत येण्यासाठी प्रार्थना करतात, तर पत्नी देवघरात दिवा लावून 'माज्या माणसाला काही होऊ नये' अशी आळवणी करते. प्रत्येक वादळात, प्रत्येक पावसात, प्रत्येक बिघाडात या वीज कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांची चिंता वाढतच राहते.

**एका मुलीची हृदयस्पर्शी विनंती...**

काही दिवसांपूर्वी एका लाइनमनच्या मुलीने सोशल मीडियावर एक अत्यंत हृदयस्पर्शी आवाहन केले होतेः "कृपया... वीज गेली तर रागवू नका, ओरडू नका... आमचे बाबा, काका, भाऊ त्याच लाईनवर काम करत असतात. एक छोटीशी चूक त्यांचा जीव घेऊ शकते. त्यांचे कुटुंबीय त्यांची सुखरूप परत येण्याची वाट पाहत असतात."

हे वाक्य ऐकल्यावर आपल्या काळजाला हात लागतो, नाही का? तिच्या 12 वर्षांच्या स्वर्णा नावाच्या मैत्रिणीचे डोळे भीती दाखवतात, जेव्हा ती सांगते, "बाबा आत्ताच शेताजवळच्या ट्रान्सफॉर्मरवर गेले आहेत." तिची आई दर पाच मिनिटांनी फोन तपासते, "फोन बंद तर नाही झाला? विजेचा धक्का तर नाही लागला?" ही चिंता अनाठायी नाही. दरवर्षी आपल्याकडे अनेक लाइनमन ड्युटीवर असताना विजेचा धक्का लागून किंवा उंचीवरून पडून आपला जीव गमावतात किंवा जायबंदी होतात.

**जीवाची बाजी लावून कर्तव्य बजावणारे हात**

वीज विभागातील एक कर्मचारी सांगतो की, "सामान्य जनतेला फक्त वीज गेल्याचे दिसते, पण वीज परत आणण्यासाठी आमचे सहकारी आपला जीव धोक्यात घालून काम करतात. अनेकदा ओले खांब, तुटलेल्या तारा किंवा पडलेली झाडेही धोकादायक ठरतात. तरीही लाईन सुरू होईपर्यंत हे





लोक घरी परत येत नाहीत."

प्रदिप यांची पत्नी सांगते, "जेव्हाही बाहेर हवामान खराब असते, तेव्हा मी देवघरात दिवा लावते. देवाकडे प्रार्थना करते की माझ्या माणसाला काही होऊ नये. जर फोन बराच वेळ वाजला नाही, तर माझी अस्वस्थता अजून वाढते." ज्येष्ठ लाइनमन सुजित म्हणतात, "पावसात सर्वात जास्त धोका असतो. वीजेचा करंट जमिनीत पसरू शकतो. खांब निसरडे होतात. वरून नियंत्रण कक्षाचा दबाव असतो की 'लाईन चालू करा'. पण आम्ही किती धोका पत्करून काम करत आहोत, हे लोकांना माहीत नसते."

**पुढच्या वेळी वीज गेली तर...**

आपल्यासाठी वीज म्हणजे फक्त एक बटण दाबणे. पण या एका सोप्या क्रियेमागे एक संपूर्ण आयुष्य पणाला लागलेले असते. वादळात तुटलेल्या तारा जोडणे, ओल्या ट्रान्सफॉर्मरवर चढणे, खड्डयांमध्ये उभे राहून खांब धरणे, डोक्यापर्यंतच्या पाण्यात पोहूण जाणे... हे सर्व मृत्यूच्या जबड्यात उतरण्यासारखे आहे. पण अशा परिस्थितीतही ते आपली भीती गिळून कर्तव्य बजावतात.

त्यामुळे, पुढच्या वेळी जेव्हा तुमच्या घरातील दिवा अचानक विझेल, तेव्हा राग करण्यापूर्वी जरा थांबा. विचार करा की कोणीतरी आपले त्या तारांवर काम करत आहे. त्याच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना करा. तुमचा थोडासा संयम, त्यांची थोडीशी सुरक्षितता... त्यांच्या कुटुंबासाठी खूप मोठा दिलासा ठरू शकतो. चला, या निस्वार्थ सेवाभावी प्रकाश योद्धयांचा आदर करूया आणि त्यांच्या कामाचे मोल जाणूया.

■ ■ ■





# ट्यूब मास्टर

दररोज सकाळी एक माणूस पाण्यात उतरत असतो, त्याच्या हातात प्लास्टिकची एक पिशवी असते, ज्यात कपडे, जेवणाचा डबा आणि पुस्तकं असतात. तो कोणी मोठा जलतरणपटू नाही, पण त्याचं ध्येय मात्र जगावेगळं आहे. केरळच्या मल्लपूरम जिल्ह्यातल्या पदिंजट्टमुरी गावात राहणारे अब्दुल मलिक नावाचे हे शिक्षक गेली तब्बल २० वर्षं एका नदीतून पोहत शाळेत जात आहेत.



अब्दुल मलिक हे प्राथमिक शाळेत गणिताचे शिक्षक आहेत. त्यांच्या घरापासून शाळेचं अंतर फारसं नाही, पण दररोज बसने जायचं झाल्यास तीन तास लागतात आणि तेही प्रवास खडतर आणि अस्वस्थ करणारा असतो. म्हणून त्यांनी एक वेगळा मार्ग निवडला, कडलुंडी नदी पार करत पोहून शाळेत जाण्याचा.

पाण्यात पोहताना ते एका टायर ट्यूबचा वापर करतात आणि त्यामुळंच त्यांना "ट्यूब मास्टर" म्हणून ओळख मिळाली. आजवर त्यांनी एकही दिवस शाळा चुकवलेली नाही. त्यांचं शिस्तबद्ध जीवन आणि शिक्षणासाठी असलेली निष्ठा विद्यार्थ्यांमध्ये एक आदर्श निर्माण करतं. इतकंच नाही, तर त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना पोहणं शिकवणंही सुरू केलं आहे.

अब्दुल मलिक हे केवळ शिक्षक नाहीत, तर पर्यावरणप्रेमी नागरिकही आहेत. नदीचं प्रदूषण वाढू नये म्हणून ते नियमितपणे विद्यार्थ्यांसह नदी स्वच्छ ठेवण्यासाठी उपक्रम राबवतात. पाण्यातील प्लास्टिक, कचरा ते स्वतः गोळा करून नदीचे संरक्षण करतात.

त्यांची ही संघर्षमय आणि प्रेरणादायी कथा संपूर्ण देशभर चर्चेचा विषय बनली आहे. ग्रामीण भागातील शिक्षकांनी कोणत्या अडचणींना तोंड द्यावं लागतं, याचं हे एक सजीव उदाहरण आहे. अब्दुल मलिक यांनी परिस्थितीवर मात करत समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे झ जो शिक्षण, पर्यावरण आणि समर्पण या तिन्ही गोष्टींचं जिवंत प्रतीक आहे.

■ ■ ■

# मीठ लावून काकडी खाणं योग्य की अयोग्य?



उन्हाळ्यात काही फळ भाज्या, फळे खाल्ल्याने नक्कीच शरीराला फायदा मिळतो. त्यातीलच एक फळभाजी म्हणजे काकडी. कारण काकडीमध्ये भरपूर प्रमाणात पाणी असतं. शरीराला थंडावा देण्यासाठी काकडी हे एक सुपरफूड मानलं जातं. पाण्याची कमतरता भरून काढण्यास, पचन सुधारण्यास आणि त्वचेचा पोत सुधारण्यासाठी मदत करते. पण बऱ्याच जणांना काकडी खाण्याची योग्य वेळच माहित नाही. तसेच ती खाण्याची योग्य पद्धतही माहित नाही. कारण काकडी जर ती चुकीच्या वेळी खाल्ली तर ती फायद्याऐवजी नुकसान करू शकते.

काकडीमध्ये सुमारे 95% पाणी असते, जे शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. त्यात कॅलरीज देखील खूप कमी असतात, म्हणून वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. त्यात फायबर, व्हिटॅमिन के, पोटॅशियम आणि अँटीऑक्सिडंट्स देखील असतात जे शरीराच्या अनेक समस्यांशी लढण्यास मदत करतात. काकडी पचनसंस्था सुधारते आणि गॅस, ॲसिडिटी सारख्या समस्यांपासून आराम देते. तथापि, त्याचे फायदे तेव्हाच मिळतात जेव्हा ते योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने खाल्ली तर.

काकडी खाण्याची सर्वोत्तम वेळ म्हणजे दुपारी किंवा संध्याकाळी, जेव्हा शरीराची चयापचय क्रिया जास्त असते. यावेळी, काकडीचे पाणी आणि फायबर शरीराद्वारे लवकर पचते आणि पोट देखील हलके राहते. दुपारच्या जेवणासोबत किंवा नाश्त्यात काकडी खाल्ल्याने शरीराला पुरेसा ओलावा मिळतो आणि पचन देखील सुधारते.

**काकडी खाण्याची चुकीची पद्धत**

काही लोक सकाळी रिकाम्या पोटी काकडी खाण्याची चूक करतात, परंतु आयुर्वेदानुसार, असे करणे काही लोकांसाठी हानिकारक ठरू शकते, विशेषतः ज्यांची पचनसंस्था कमकुवत आहे. रिकाम्या पोटी काकडी खाल्ल्याने काही लोकांमध्ये गॅस, अपचन किंवा आम्लता सारख्या समस्या उद्भवू शकते.

काकडी खाण्यापूर्वी ती स्वच्छ पाण्यात भिजवणे किंवा धुणे महत्वाचे आहे कारण तिच्या पृष्ठभागावर माती, कीटकनाशके किंवा बॅक्टेरिया असू शकतात. तसेच, काकडी कधीही दूध किंवा दुधाच्या पदार्थांसोबत खाऊ नये कारण त्यामुळे पचन समस्या निर्माण होऊ शकतात आणि शरीरात विषारी घटक तयार होऊ शकतात.

अनेकजण काकडीवर मीठा टाकून खातात. परंतु जास्त मीठ काकडीतील आरोग्यदायी घटक कमी करू शकते, म्हणून मर्यादित प्रमाणात मीठ वापरणे चांगले.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### स्कुल चले हम..!

शाळेची वाजताच घन्टा
आनंदाने धरला शाळेचा रस्ता
गेटवरच सरांनी केले स्वागत
देऊनी चॉकलेट
फुलांचा गुलदस्ता..

नवीन पुस्तके येता हाती
आनंद मावेना गगनी
मन लावूनी करु अभ्यास
घडवू नव क्रांतीचा इतिहास ..!

मध्यान्न भोजन देई शासन
ठेऊ त्याची आम्ही जाण
विविध खेळात मिळवू प्राविण्य
ऑलिंपिक मध्ये ऊंचावू
देशाची मान..!

# शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर मध्ये बहुविशेषज्ञांच्या टीमवर्कने आई आणि बाळाचे प्राण वाचवले

**नागपूर, २१ जून :** १०२० बेडची सुविधा असलेल्या शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर (एसएमएचआरसी) येथील प्रसूती व स्त्रीरोग विभागाने वैद्यकीय कौशल्य व बहुविशेषज्ञांच्या सुसंवादात्मक कार्याच्या जोरावर एक अत्यंत दुर्मिळ आणि जीवघेण्या प्रसूतीतील आपत्कालीन प्रसंग यशस्वीरित्या हाताळला. या उपचारांतून एक तरुण माता आणि तिचे नवजात बाळ दोघेही सुरक्षितपणे बरे होऊन घरी परतले. ही घटना शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या गुणवत्तापूर्ण आणि सहानुभूतीपूर्ण आरोग्यसेवेच्या निष्ठेचे प्रेरणादायी उदाहरण ठरली.

२६ वर्षीय गर्भवती महिलेला, गर्भधारणाच्या ३२व्या आठवड्यात, ताकळघाट येथून शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या ३०० बेडच्या समर्पित शालिनीताई माता व बाल विभाग मध्ये अतिशय गंभीर अवस्थेत आणले गेले होते. ईक्लॅम्प्सियामुळे पीडित असलेल्या या महिलेचा रक्तदाब नियमनात राहिलेला नसल्यामुळे श्वासावरोध होऊन तिला हृदयविकाराचा झटका (कार्डियाक अरेस्ट) आला होता.

डॉ. स्नेहल देशमुख (स्त्रीरोगतज्ज्ञ) आणि डॉ. प्रियांका कांगले (भूलतज्ज्ञ) यांनी प्रसूती कक्षात तत्काळ रुग्णाला जीवनदान देण्यासाठी पुनर्जीवन प्रक्रिया सुरु केली आणि रुग्णाला यशस्वीरित्या स्थिर केले. तत्काळ रुग्णाला उच्च-जोखमीच्या सिझेरियन शस्त्रक्रियेसाठी तिला त्वरित ऑपरेशन थिएटरमध्ये हलवण्यात आले. ही शस्त्रक्रिया डॉ. स्नेहल देशमुख, डॉ. शश्वती घोष, व डॉ. शांतनू शेम्बाळकर यांनी, डॉ. राजसी सेनगुप्ता (विभागप्रमुख स्त्रीरोग व प्रसूती) यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. प्रियांका कांगले यांच्या भूलसेवेच्या सहकार्याने पार पाडली.

शस्त्रक्रियेनंतर मातेला पोस्टेरियर रिव्हर्सिबल एन्सेफालोपॅथी सिंड्रोम, सेरेब्रल व्हेनस थ्रोम्बोसिस आणि पेरिपार्टम कार्डियोमायोपॅथी यासारख्या दुर्मीळ गुंतागुंतींचा सामना करावा लागला. या परिस्थितीत सातत्यपूर्ण, समन्वयपूर्ण आणि तज्ज्ञांच्या बहुवैद्यकीय हस्तक्षेपाची नितांत गरज होती.



डॉ. हेमंत देशपांडे आणि डॉ. राकेश भैसारे यांच्या नेतृत्वाखालील क्रिटिकल केअर टीम- डॉ. राहुल डागा, डॉ. समृद्धी तायडे, डॉ. अनिताभ सुखदेवे, डॉ. अमित सुथार व डॉ. मसूम बिरंजन यांनी २४ तास अतिदक्षता सेवा दिली. डॉ. अंजली बोरकर (प्रमुख भूलतज्ज्ञ विभाग) यांच्या नेतृत्वाखाली भूलतज्ज्ञ टीमने शस्त्रक्रियेपूर्व आणि शस्त्रक्रियेनंतरची परिपूर्ण सेवा दिली.

तिच्या पेरिपार्टम कार्डिओमायोपथीच्या उपचारासाठी विशिष्ट उपचार योजना तयार करणारे हृदयतज्ज्ञ डॉ. अभय तिडके आणि डॉ. राहुल बारई यांच्या मार्गदर्शनाखाली हृदयविकार उपचार करण्यात आले, तर मेंदूविकाराशी संबंधित गुंतागुंतींचे कुशल व्यवस्थापन न्युरोलॉजिस्ट डॉ. जीवन किंकर यांनी केले.

त्याचवेळी नवजात बाळाला डॉ. सी. बोकाडे (प्रमुख बालरोग विभाग) व डॉ. कुश झुंझुनवाला यांच्या मार्गदर्शनाखाली बालरोग तज्ञांच्या विभागाने अत्यंत काळजीपूर्वक सेवा दिली. ज्यामुळे त्याच्या आयुष्याची सुरुवात आरोग्यदायी झाली.

रुग्ण जवळपास दोन महिने डॉक्टरांच्या देखरेखीखाली होती. सातत्यपूर्ण निरीक्षण, अतिदक्षता सेवा आणि विभागीय समन्वयामुळे तिला व्हेंटिलेटरवरून हळूहळू हटवण्यात आले आणि अखेरीस ती शुद्धीवर आली आणि तिला स्थिर स्थितीत घरी सोडण्यात आले. यामुळे तिच्या कुटुंबीयांना प्रचंड आनंद झाला आणि उपचार करणाऱ्या टीमला अत्यंत समाधान मिळाले.

या संपूर्ण प्रक्रियेत उत्कृष्ट नर्सिंग आणि पॅरामेडिकल सेवांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. डॉ. सीमा सिंग (नर्सिंग डायरेक्टर) आणि सिस्टर विशाखा मून (एएनएस) यांच्या नेतृत्वाखाली सिस्टर सुषमा सेन, सिस्टर भाग्यश्री, सिस्टर प्रितिका, सिस्टर ज्योती आणि इतर नर्सिंग कर्मचाऱ्यांनी सहानुभूतीपूर्ण व ममतेने रुग्णसेवा दिली. ज्यामुळे तिचा सर्वांगीण आणि प्रभावी उपचार झाला.

रुग्णाच्या कुटुंबाने संपूर्ण शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर टीमचे मन:पूर्वक आभार मानले.

डॉ. अनुप मरार, डायरेक्टर, डीएमआयएचईआर (डीयू) ऑफ-कॅम्पस यांनी सांगितले, ही विलक्षण केस कुशल टीमवर्क आणि एकसंध दृष्टिकोनातून काय साध्य होऊ शकते याचे प्रेरणादायी उदाहरण आहे. ही केस विविध विभागांमधील समन्वयाचे सामर्थ्य आणि एसएमएचआरसीमधील क्लिनिकल उत्कृष्टतेची दृढ परंपरा अधोरेखित करते. अशा घटना आपल्याला प्रत्येक रुग्णाच्या प्रवासात दर्जा अधिक उंचावण्याची प्रेरणा देतात.

डॉ. वसंत गावंडे, मुख्य वैद्यकीय अधीक्षक, एसएमएचआरसी म्हणाले, शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर मधील प्रसूती व स्त्रीरोग विभागाने केवळ पाच वर्षांत गुंतागुंतीच्या आणि उच्च जोखमीच्या प्रसूती केसमध्ये यशस्वीरित्या काम करून आपली विश्वासार्हता सिद्ध केली आहे. आमच्या रुग्णालयात दररोज वाढत असलेल्या यशस्वी प्रसूतींचा दर हाच आमच्या निष्ठेचा आणि परस्पर सहकार्याचा पुरावा आहे.

ही विलक्षण यशोगाथा शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या तज्ज्ञता, सहानुभूती आणि नवकल्पना यांच्या माध्यमातून आशा निर्माण करण्याच्या कृतीशील दृष्टिकोनाला मूर्त रूप देते.

# सी.आर.आय. सोलरने ६,८९४ सोलर पंपिंग सिस्टीमसाठी रुपये २१० कोटीची मोठी बहु-राज्यीय ऑर्डर मिळवली

**नागपूर, २१ जून :** सीआरआय पंप्सचा एक विभाग आणि अक्षय ऊर्जा-चालित जल उपायांमध्ये आघाडीवर असलेल्या सीआरआय सोलर ला, महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्था (मेडा), हरियाणा अक्षय ऊर्जा विकास संस्था (हरेडा) आणि पंजाब ऊर्जा विकास संस्था (पेडा) यांचेकडून ६,८९४ सोलर पंपिंग सिस्टीमचा पुरवठा, स्थापना आणि त्यांचे कार्यान्वन करण्यासाठी महत्त्वपूर्ण ऑर्डर मिळाल्या आहेत, ज्यांचे एकत्रित मूल्य रुपये २१० कोटी आहे.



या प्रतिष्ठित ऑर्डर, भारतातील कृषी संबंधित प्रमुख प्रदेशांत शाश्वत सिंचन पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी एकत्रित प्रयत्नांचे प्रतिनिधित्व करतात. या प्रतिबद्धता, केंद्र आणि राज्य सरकारांना त्यांच्या अक्षय उर्जेच्या आणि कृषी उत्पादकतेच्या उद्दिष्टांना पुढे नेण्यासाठी पाठिंबा देण्यात सीआरआयची वाढती भूमिका अधोरेखित करतात.

प्रकल्पाचे उपयोजन हे, संबंधित एजन्सीच्या वेळापत्रकानुसार सुरू होईल ज्यामध्ये सीआरआय सोलर, मोठ्या प्रमाणावरील सौर जल पंपिंग प्रकल्पांना अचूकता आणि गुणवत्ता हमीसह राबविण्यात त्यांच्या व्यापक कौशल्याचा वापर करेल.

या महत्त्वपूर्ण टप्प्यावर भाष्य करताना, सीआरआय ग्रुपचे अध्यक्ष जी. सौंदर्यराजन म्हणाले:

ही एकत्रित कामगिरी भारताच्या ग्रामीण आणि कृषी क्षेत्रांमध्ये स्वच्छ, विश्वासार्ह आणि पाण्याची शाश्वत उपलब्धता सक्षम करण्यासाठी सीआरआयच्या अटळ वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. हे प्रकल्प पायाभूत सुविधांच्या अतिरिक्त कार्य करतात - ते ग्रामीण समृद्धी, ऊर्जा कार्यक्षमता आणि पर्यावरणीय जबाबदारी यांना सक्षम करणारे घटक आहेत. भारत आपल्या स्वच्छ ऊर्जा कार्यक्रमाचे समर्थन करत असताना, सीआरआय, सौरविषयक नवोपक्रम आणि परिणामांसह आघाडीवर राहण्यास सज्ज आहे.

संपूर्ण भारतात १,८१,००० हून अधिक सौर पंपिंग सिस्टीम आणि आयओटी-सक्षम चाणाक्ष उपाय कार्यान्वित करून, सीआरआय पंप्स, ऊर्जा-कार्यक्षम आणि शाश्वत पाणी व्यवस्थापन उपायांकडील संक्रमणाचे नेतृत्व करत आहे. या उपक्रमांमुळे ६,१०० दशलक्ष किलोवॅट प्रति तास युनिटपेक्षा जास्त ऊर्जा बचत झाली आहे आणि ४.८० दशलक्ष टनांपेक्षा जास्त कार्बन-डाय-ऑक्साईडचे उत्सर्जन टाळण्यास मदत झाली आहे, ज्यामुळे पर्यावरणीय व्यवस्थापनात सीआरआयचे नेतृत्व अधिक मजबूत झाले आहे.

सीआरआय सोलरच्या ऑफरमध्ये उच्च-कार्यक्षमता असलेल्या सोलर पंपिंग सिस्टीम, इंटेलिजन्ट रिमोट मॉनिटरिंग आणि व्यापक विक्री-पश्चात सेवा यांचा समावेश आहे, ज्यामुळे या कंपनीने सरकारच्या नेतृत्वाखालील स्वच्छ ऊर्जा उपक्रमांसाठी एक विश्वासार्ह भागीदार म्हणून स्थान मिळवले आहे.

# शेतकऱ्यांनी श्रीराम ड्रिपइट वेजिटेबलसोबत यशाची पताका फडकवली : मेगा शेतकरी मेळाव्यात साजरा झाला आनंद!



**अकोला, २१ जून :** श्रीराम फार्म सोल्यूशन्स (एसएफएस) यांनी १८ जून, २०२५ रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील मोर्शी येथे एका भव्य मेगा शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले. या कार्यक्रमात महाराष्ट्र आणि शेजारील मध्य प्रदेशातील ३०० प्रगतिशील शेतकरी आणि सहा प्रमुख डीलर यांनी सहभाग घेतला.

या मेळाव्याचे मुख्य आकर्षण होते श्रीराम ड्रिपइट वेजिटेबल, जे विशेषतः उच्च-मूल्याच्या भाजीपाला, विशेषतः या कार्यक्रमातील मुख्य पिक - मिरची आणि टोमॅटो, पिकांच्या उत्पादनासाठी तयार करण्यात आले आहे.

कार्यक्रमादरम्यान अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या प्रेरणादायी यशोगाथा शेअर केल्या. मोर्शी, अमरावती येथील प्रगतिशील शेतकरी अंकुश तायवाडे यांनी सांगितले की, ड्रिप सिंचन मिरचीच्या शेतात श्रीराम ड्रिपइट वेजिटेबलच्या वापरामुळे त्यांच्या उत्पादनात २०२५% वाढ झाली आहे. ड्रिप लाईन्सखाली अचूक पोषक तत्त्वे पुरविल्यामुळे त्यांच्या मिरच्या निरोगी, चमकदार आणि ९१० सेमी लांब झाल्या, ज्यामुळे त्या बाजारात प्रीमियम दराने विकल्या जाऊ शकल्या.

दुसरे शेतकरी, देवेंद्र टिपरे यांनी मिरचीत आधी आणि निरोगी फळे लागल्याचे पाहिले, ज्यामुळे अधिक तोडणी व चांगल्या उत्पादनाने त्यांचा नफा वाढला. त्यांनी झाडांच्या आकारात समता, मिरच्यांचा सुधारित रंग, पोत आणि टिकवणूकक्षम शेल्फ लाइफ हाही महत्त्वाचा असल्याचे सांगितले.

त्यांनी म्हटले, प्रत्येक झाड एकसारखी प्रतिक्रिया देत होते, ज्यामुळे बाजारगटात गुणवत्तेत सुधारणा झाली.

भूषण देशमुख, जे भूमिपुत्र हायटेक नर्सरीचे मालक आहेत, त्यांनी श्रीराम ड्रिपइट वेजिटेबलला पाठिंबा व्यक्त केला. त्यांनी मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये मिळालेल्या उत्कृष्ट परिणामांचे अनुभव शेअर केले.

कार्यक्रमादरम्यान शेतकरी बुकिंग योजना सुरू करण्यात आली, जी उत्साहाने स्वागत करण्यात आली. अनेक शेतकरी त्यांच्या पुरवठ्याची नोंदणी करण्यासाठी कार्यक्रमस्थळी रांगेत उभे राहिले.

ही पुढाकार नवोन्मेषी कृषी उपाय आणि स्थानिक पातळीवर समर्थनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सशक्त करण्याच्या श्रीराम फार्म सोल्यूशन्सच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

# डिजिटल पेमेंटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाकडून इंडसइंड बँकेचा सन्मान

**मुंबई, २१ जून :** भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाकडून २०२३-२४ चा डिजिटल पेमेंट्स पुरस्कार मिळाल्याची घोषणा इंडसइंड बँकेने केली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात डिजिटल पेमेंटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल खासगी क्षेत्रातील बँकांमध्ये या बँकेने तिसरा क्रमांक पटकावला. १८ जून २०२५ रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे झालेल्या या पुरस्कार सोहळ्याला केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण प्रमुख पाहुण्या म्हणून आणि अर्थ राज्यमंत्री श्री. पंकज चौधरी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

डिजिटल क्षमता वाढवण्याच्या आणि देशभरातील लाखो लोकांना सक्षम बनवणाऱ्या सुरक्षित, स्केलेबल तसेच नावीन्यपूर्ण डिजिटल पेमेंट सोल्यूशन्स प्रदान करण्याच्या इंडसइंड बँकेच्या अढळ वचनबद्धतेचा हा पुरस्कार म्हणजे एक पुरावा आहे. वित्तीय सेवा विभागाने जारी केलेल्या अधिकृत स्कोअरकार्डनुसार, बँकेने आर्थिक वर्ष २३-२४ मध्ये डिजिटल व्यवहाराचे १२०% लक्ष्य साध्य केले - जे भारतातील सर्व खासगी क्षेत्रातील बँकांमध्ये सर्वाधिक आहे.

डिजिटल पेमेंट्स पुरस्कार समारंभात इंडसइंड बँकेच्या रितेश राज सक्सेना, डायरेक्ट बँकिंग प्रमुख आणि श्री. देव रतन सुरी, प्रमुख - एसडीजी (पेमेंट्स, कार्ड्स आणि सरकारी व्यवसाय) यांना श्री. एम. नागराजू, सचिव, वित्तीय सेवा विभाग आणि डॉ. अभिजित फुकोन, आर्थिक सल्लागार, डीएफएस यांनी हा पुरस्कार प्रदान केला.

या कामगिरीबद्दल इंडसइंड बँकेचे ग्राहक बँकिंग आणि विपणन प्रमुख सौमित्र सेन म्हणाले, हा पुरस्कार आम्हाला दिल्याबद्दल आणि देशभरात डिजिटल स्वीकार वाढवण्यासाठी इंडसइंड बँकेच्या प्रयत्नांना मान्यता दिल्याबद्दल आम्ही अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाचे आभारी आहोत. आयएनडीआयई सारख्या आमच्या वेगळ्या प्लॅटफॉर्मद्वारे सतत नावीन्यपूर्ण आणि आमच्या ग्राहकांना अंतर्ज्ञानी, सुरक्षित आणि वैयक्तिकृत बँकिंग अनुभव देण्याच्या आमच्या संकल्पाला ही मान्यता बळकटी देते. भारताच्या डिजिटल प्रवासाला पाठिंबा देण्यासाठी आणि समाजातील प्रत्येक घटकासाठी बँकिंग सुलभ आणि सहज बनवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

# टाटा मोटर्सकडून एस प्रो चार चाकी मिनी ट्रक लाँच

**पुणे, २३जून :** टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने नवीन टाटा एस प्रोच्या लाँचसह नवीन टप्पा गाठला आहे, तसेच लहान कार्गो मोबिलिटीच्या परिवर्तनात्मक युगाचा शुभारंभ केला आहे. ३.९९ लाख रूपयांच्या सूरवातीच्या किमतीसह टाटा एस प्रो भारतातील सर्वात किफायतशीर चार-चाकी मिनी ट्रक आहे, जो अपवादात्मक कार्यक्षमता, अद्वितीय वैविध्यता आणि उच्च दर्जाचे मूल्य देतो.

उद्योजकांच्या भावी पिढीला सक्षम करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला टाटा एस प्रो पेट्रोल, बाय-फ्यूईल (सीएनजी + पेट्रोल) आणि इलेक्ट्रिक व्हेरिएण्ट्समध्ये उपलब्ध आहे, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या व्यवसाय गरजांसाठी योग्य सोल्यूशन निवडण्याची स्थिरता मिळते.

एस प्रो लाँच करत टाटा मोटर्सचे कार्यकारी संचालक गिरीश वाघ म्हणाले, लाँच करण्यात आलेल्या टाटा एसने भारतातील कार्गो मोबिलिटीमध्ये क्रांती घडवून आणली. गेल्या दोन दशकांमध्ये या ट्रकने २५ लाखांहून अधिक उद्योजकांना यशस्वीरित्या सक्षम केले आहे, तसेच प्रगती व क्षमतेचे प्रतीक बनला आहे. नवीन टाटा एस प्रोसह आम्ही महत्त्वाकांक्षी भावी पिढीसाठी नवीन उद्देशासह हा वारसा अधिक दृढ करत आहोत. स्थिरता, सुरक्षितता आणि



नफ्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या एस प्रोमध्ये उत्तम उत्पन्न मिळवून देण्याची क्षमता आहे, जो उज्ज्वल भविष्य घडवण्याच्या दिशेने वाटचाल करण्यास सुसज्ज असलेल्या महत्त्वाकांक्षी उद्योजकांच्या महत्त्वाकांक्षांची पूर्तता करण्यास मदत करेल.''

टाटा एस प्रोबाबत मत व्यक्त करत टाटा मोटर्स कमर्शियल वेईकल्सच्या एससीव्हीपीयूचे उपाध्यक्ष व व्यवसाय प्रमुख श्री. पिनाकी हल्दर म्हणाले, उद्देशपूर्ण टाटा एस प्रो सखोल ग्राहक अभिप्रायांसह विकसित करण्यात आली आहे आणि विविध उपयोजनांची पूर्तता करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. विविध प्रदेश व हवामान स्थितींमध्ये, तसेच लाखो किलोमीटर अंतरापर्यंत या ट्रकची प्रखर चाचणी करण्यात आली आहे. मल्टी-फ्यूईल पर्याय, किफायतशीरपणा आणि सुधारित ड्रायव्हिंग क्षमतेसह टाटा एस प्रो विविध वापरांमध्ये उच्च दर्जाचे मूल्य देतो. आमच्या पोर्टफोलिओमधील हा धोरणात्मकरित्या भर करण्यात आलेला ट्रक आहे, जो उद्योजकांना आणि लहान व्यवसायांना विश्वासार्ह, भविष्यासाठी सुसज्ज गतशीलता सोल्यूशन्ससह सक्षम करण्याप्रती टाटा मोटर्सच्या कटिबद्धतेला अधिक दृढ करतो. भारतातील व्यावसायिक, ई-कॉमर्स व लॉजिस्टिक्स हब महाराष्ट्र एस प्रो बाय-फ्यूईल आणि ईव्ही व्हेरिएण्ट्ससाठी लाभदायी क्षेत्र आहे.

महाराष्ट्रातील मुंबई, पुणे व नागपूर अशी प्रमुख शहरे एफएमसीजी, फ्लीट लॉजिस्टिक्स, डार्क स्टोअर्स व पेय वितरण अशा क्षेत्रांमध्ये एस प्रो ईव्हीच्या फिक्स्ड-ड्युटी चक्रांसाठी विशेषत: अनुकूल आहेत, जेथे उच्च प्रमाणातील डिलिव्हरी नेटवर्क्ससाठी कार्यक्षमता व विश्वसनीयतेची आवश्यकता आहे. दरम्यान कोकण, विदर्भ व मराठवाडा या यासारख्या प्रांतांमध्ये कृषी-आधारित उद्योग आणि एमएसएमईची संपन्न परिसंस्था आहे. या क्षेत्रांमध्ये एस प्रोची उच्च लोड क्षमता, सुसंगत आकारमान आणि इंधन-कार्यक्षम ड्राइव्हट्रेन्स अरूंद रस्त्यांमधून नेव्हिगेट करण्यासाठी आणि लास्ट-माइल डिलिव्हरी ऑप्टिमाइज करण्यासाठी व्यावहारिक व लाभदायी सोल्यूशन देतात.

# सरूच्या भावनिक जटिलतेला समजून घेण्यात तिने मला सहानुभूतीपूर्वक मदत केली

**मुंबई, २१ जून :** झी टीव्हीवरील सरू ही मालिका प्रेक्षकांना आपलीशी वाटत आहे. यातील कथानक आणि व्यक्तिरेखांची मांडणी भावनिक पातळीवर इतकी परिणामकारक झाली आहे की या मालिकेने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. सरू (मोहक मटकर) आता वेद (शगुन पांडे) सोबत नव्या शहरी जीवनाशी जुळवून घेत आहे आणि तिची ऑनस्क्रीन आई गौरी (ज्येष्ठ अभिनेत्री निलम पांचाळ) सोबतचे तिचे नातेही मालिकेत एक हृदयस्पर्शी समीकरण निर्माण करत आहे.



जिथे मोहक या प्रमुख भूमिकेत एक तरुण प्रतिभावान अभिनेत्री म्हणून स्वतःचा ठसा उमटवत आहे, तिथे निलम पांचाळ त्यांच्या दशकांच्या अनुभव आणि अभिनयासह केवळ ऑनस्क्रीन नव्हे तर ऑफस्क्रीनही एक उत्कृष्ट मार्गदर्शक ठरत आहेत. पण त्यांच्या ऑनस्क्रीन नात्याला अधिक खोलपणा मिळवून देण्यासाठी त्यांनी नेमकं काय केलं? मोहकनुसार, त्यांच्या दीर्घ राजस्थान शूटिंगदरम्यान एकत्र काम करताना ऑफ-स्क्रीन चहा पिणे असो किंवा सराव करणे असो, या सगळ्या गोष्टींमध्ये त्यांच्यात निर्माण झालेल्या त्यांच्या नात्यानेच खरी जादू केली. दोघींमधील ही सहजता स्क्रीनवर त्यांच्या व्यक्तिरेखांच्या कमजोरी, ताकद आणि भावना यांचं वास्तवदर्शी चित्रण करते जे सरूच्या भावनिक प्रवासाला आणि तिच्या आईमधल्या नात्याला जिवंत बनवते.

आपल्या नात्याबद्दल सांगताना मोहक म्हणाली, जीवनात काही नाती अशी असतात जी पहिल्याच क्षणापासून नैसर्गिक वाटतात निलम मॅडमसोबतचं माझं नातं असंच आहे. ऑडिशन प्रक्रियेदरम्यान पहिल्या वाचनापासूनच आमच्यात एक सहज संवाद आणि प्रामाणिकपणा होता. प्री-शूट वर्कशॉपपासून ते राजस्थानमधील आमच्या दीर्घ शेड्यूलपर्यंत, त्यांचं असलेलं सततचं समर्थन माझ्यासाठी एक आधार ठरला. मग ते उशिरापर्यंतची रिहर्सल असो किंवा चहा घेत शांतपणे केलेल्या चर्चा प्रत्येक क्षण माझ्यासाठी एक शिकवण ठरली आहे.

ती पुढे म्हणाली, सरूच्या भावनिक गुंतागुंतीला समजून घेण्यासाठी आणि त्या भूमिकेत खोलवर उतरता यावं म्हणून त्यांनी मला खूपच मदत केली आणि प्रोत्साहन दिलं. त्यांच्या सहवासामुळे केवळ सरूचं पात्र साकारायला मला मदत झाली असं नाही, तर माझ्या वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासातही त्यांनी महत्त्वाचं योगदान दिलं आहे. इतक्या प्रतिभावान आणि सशक्त व्यक्तिमत्त्वासोबत मी स्क्रीन शेअर करत आहे, हे सांगताना मला अतिशय अभिमान वाटतो.

आता जेव्हा सरू आपल्या आयुष्यातील एका सशक्त नव्या अध्यायात प्रवेश करत आहे आणि अखेर अनिकासमोर उभी ठाकत आहे, तेव्हा प्रेक्षकही प्रत्येक दृश्यामध्ये खऱ्या भावना आणि जिवंत अभिनय अनुभवण्यासाठी उत्सुक आहेत.

## आज का अंदाज

सोमवार २३ जून २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| २४५ | २४८ | १६० | २२८ | २४६ | २५८ | १६९ | ८९० |
| ५६० | ३४७ | २५० | ३७८ | ३९० | ७८० | ३३० | ७०० |
| ४८९ | ४४६ | ३४० | ४७७ | ३५७ | ३५७ | २४० | ४४९ |
| १० | ४० | ७२ | ८२ | २० | ५० | ६८ | ७३ |
| १९ | ४९ | ७३ | ८३ | २९ | ५१ | ६४ | ७४ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ | २१ | ५९ | ६३ | ७८ |

२३ जून : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६८ | ९८ |
| २७ | ३७ | ६४ | ९४ |
| २० | ३० | ६५ | ९५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** आज पूर्ण होत असलेल्या कामात अनावश्यक विलंब होईल. तुम्ही तुमची बुद्धिमत्ता आणि विवेक वापरावा. नोकरीच्या शोधात तुम्हाला इकडे तिकडे भटकंती करावी लागेल.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्र परिणामांचा असेल. तुमचे वागणं सुधारण्याचा प्रयत्न करा. समाजात तुमची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करा. तुमची महत्त्वाची कामे इतरांवर सोपवू नका.

**मिथुन :** आज आर्थिक व्यवहारात अधिक काळजी घ्या. जास्त पैसे खर्च होऊ शकतात. परिस्थिती लक्षात घेऊन भांडवली गुंतवणुकीबाबत अंतिम निर्णय घ्या. प्रेमसंबंधांमध्ये जोडीदारावर संशय घेणे टाळा.

**कर्क :** आज तुमची जुन्या मित्राशी भेट होईल. निपुत्रिक लोकांना मुलांशी संबंधित चांगली बातमी मिळेल. प्रेमसंबंधांमध्ये संशयास्पद परिस्थिती टाळा. आज तुम्हाला एखादी चांगली बातमी मिळेल.

**सिंह :** खर्चावर नियंत्रण ठेवा. अनावश्यक खर्च टाळा. आर्थिक स्थिती मजबूत राहील. वादविवाद टाळा. मालमत्ता खरेदी-विक्रीत उशीर होईल. मात्र, प्रवासाचे योग संभवतील. कामाला सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

**कन्या :** सहकाजयांशी मतभेद होऊ शकतात. कधीकधी वातावरण आनंदी तर कधीकधी तणावपूर्ण असू शकते. कामाच्या ठिकाणी महत्त्वाच्या योजना एखाद्या अज्ञात कारणामुळे पुढे ढकलल्या जाऊ शकतात.

**तूळ :** तुम्हाला अतिशय महत्त्वाच्या कामात यश मिळेल. तुम्हाला स्वादिष्ट जेवण मिळेल. तुम्हाला लांबच्या प्रवासाला जावे लागू शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या अधीनस्थांशी जवळीक वाढेल.

**वृश्चिक :** आज प्रेमसंबंधांमध्ये तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. सुसंवाद निर्माण करण्याची गरज भासेल. वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्ये आनंद आणि सहकार्य वाढेल.


**धनु :** आज तुम्ही कायदेशीर अडचणीत येऊ शकता. ज्यामुळे तुम्हाला प्रचंड शारीरिक आणि मानसिक त्रासाला तोंड द्यावे लागेल. दुविधा निर्माण करणाजया परिस्थितीत ताणतणावाला हावी होऊ देऊ नका.

**मकर :** आजचा दिवस आनंदाचा आणि प्रगतीचा असेल. महत्त्वाच्या कामात कोणताही मोठा निर्णय तुमच्या वैयक्तिक परिस्थिती लक्षात घेऊनच घ्या. आज कामाच्या ठिकाणी निरर्थक वाद टाळा.

**कुंभ :** परस्पर विश्वास कायम ठेवा. वैवाहिक जीवनात पती-पत्नीमध्ये आनंद आणि सहकार्य वाढेल. तुमचे आरोग्य बिघडू शकते. महिलांचा वेळ हास्य आणि विनोदात जाईल.

**मीन :** तरुण मित्रांसोबत बाहेर जाण्याची योजना आखतील. भौतिक सुख, समृद्धी आणि व्यवसायात वाढ होण्याची शक्यता आहे. सामाजिक, राजकीय चर्चा किंवा वादविवाद टाळा.

## शब्दकोडे क्रमांक २१४४



**आडवे शब्द :-**
१) बातमी
४) बगल
६) जाणून-बुजून, हटकून
८) अधिक महिना
१०) लिंबू, साखर पाण्याचे पेय
१२) तुकडा, चावा
१३) पिता
१४) वेदना
१५) पत्र
१७) पृथ्वी
१९) एक आदिवासी जमात
२१) कुबेराचा सेवक
२२) एकाद्याच्या वतीने घातलेली भीड
२५) हाण! मार!
२७) धपाटा
२८) ओलसर हवा
३०) मर्यादा हद्द
३२) कोलकाताचे विमानतळ
३४) बारीक -सारीक
३६) आपले राष्ट्रगीत
३९) मान्यतेचा शब्द
४०) टिंगल
४१) **** कमीज एक पोषाख
४२) सत्ता
४४) दोरा
४६) प्रामाणिक
४७) रत्न
४९) फांदी तुटतानाचा आवाज
५१) धोका
५३) साल
५६) अवघड, कडक (इं.)
५७) कमीतकमी
६०) माफ
६१) संगीतातील एक राग
६२) जोखड
६३) चामखीळ
६४) त्वरा
६५) बशीचा जोडीदार
६७) चाबूक
६९) थोडक्यात सप्रेम नमस्कार विनंती विशेष
७२) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
७३) दुर्गंधी येऊ लागलेला
७५) बारीक खांब
७६) युद्ध
७७) गीत
७८) दही घुसळण्याचे साधन
७९) पोलीस

**उभे शब्द :-**
१) वाळा
२) भरभराट
३) घासणे (इं)
५) दुष्ट माणूस
६) गुमान, मुकाट्याने
७) टप्प्याटप्पा घेत घेत
८) मध
९) गुरुजी
११) सिद्धता
१६) झाडाभोवतीचा कट्टा
१८) चीर, भेग, फट
१९) मंगळवेढ्यात जन्मलेली एक स्त्री संत
२०) तलवार
२३) कलंक
२४) घोडा, गाढवाची विष्ठा
२६) फूल, पुष्प
२९) अतिशय मऊ, मुलायम कापड प्रकार
३१) विहिरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन
३२) पानासकट कोवळी फांदी
३३) समुद्रकिनारा
३५) पुरुष
३७) बाज विणण्याची कापडी पट्टी
३८) नूतन
४१) नवऱ्याची दुसरी पत्नी
४३) सरसकट
४४) भीती, वचक, दरारा
४५) गवंड्याकडील दोरीचे एक साधन
४६) शर्करा
४८) मवाळ धोरण
५०) शाहीराजवळचे चर्मवाद्य
५२) जबरदस्तीने लावलेला विवाह
५४) लोकर (इं.)
५५) मध्यस्थ
५८) लज्जास्पद
५९) स्थान, जागृत
६३) अंत:करण
६६) वारा
६८) मच्छर
६९) सटवाई, दुष्ट स्त्री
७०) छोटी विश्रांती
७१) मृत्यु नसलेला
७४) हात
७६) सदोदित, नेहमी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## सहकार महाविद्यालय येथे २३०० देशी वृक्षांचे वाटप




**बुलडाणा :** श्रीमती बसंतीबाई देवकीसनजी चांडक सहकार कला व वाणिज्य महाविद्यालय डोंगर खंडाळा येथे दि.१९ जून रोजी भाईजींच्या प्रेरणेतून, आदरणीय डॉ. सुकेश झंवर व कोमल झंवर यांच्या मार्गदर्शनाने २३०० वृक्ष वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वृक्षवल्ली आम्हा सोयरें वनचरें या संत शिरोमणी तुकोबारायांच्या ओळींना सार्थ ठरवीत भाईजी यांची संकल्पना 'वसुंधरा' आम्ही तुझे अपराधी.. यामाध्यमातून वड, पिंपळ, लिंब , जांभूळ, चिंच , आंबा, सीताफळ व इतर वृक्ष वाटप करण्यात आले. बुलडाणा अर्बन मागील दोन दशकांपासून वृक्ष लागवडीचा पावन विचार सर्वत्र राबवत आहेत. वृक्षारोपणच नव्हे तर वृक्ष संवर्धनाचे अनेक सामाजिक उपक्रम दरवर्षी सातत्याने राबवले जातात. वड, पिंपळ, औषधी वनस्पती, फळझाडे, अशा देशी व उपयोगी झाडांच्या रोपांमुळे महाविद्यालय परिसरात खुलून गेला. प्रत्येक विद्यार्थ्याला एक झाड देऊन 'झाड दत्तक घ्या, ते वाढवा' असा संकल्प देण्यात आला. कोमल झंवर यांनी 'आज एक झाड लावले, तर उद्या तीच छाया आपल्या पिढ्यांना संरक्षण देईल. पर्यावरण हा अभ्यासाचा विषय नसून, तो जगण्याची शैली बनवली पाहिजे. 'एक मूल एक रोप' या विचारातून हिरवळ निर्माण करण्याचा स्तुत्य उपक्रम इको क्लबच्या माध्यमातुन राबवण्यात आला. असे सांगितले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी तयार केलेले 'हिरवी शपथ' पत्र, ज्यावर त्यांनी स्वाक्षरी करून झाड जगवण्याची जबाबदारी घेतली. यावेळी अनेक पालकही उपस्थित होते. यावेळी स्थानिक संचालक अनंतराव सावळे ,बबनराव उजेड ,बबनलाल गाडगे व इतर संचालक मंडळ, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाघमारे, विभागाचे विभागीय व्यवस्थापक राजेंद्र वानेरे, शाखा व्यवस्थापक अनिल देशपांडे व कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता मुख्याध्यापक सतीश रोढे, प्राध्यापक, शाळेचे शिक्षक वृंद, बुलडाणा अर्बनचे कर्मचारी, बुलडाणा अर्बन पणन कर्मचारी व इतर सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी योजना राबवाव्या

### भारत कृषक समाजाचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. २३ :



प्रथम शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी प्रभावी उपाय योजना राबवण्यात याव्यात, अशी मागणी भारत कृषक समाजातर्फे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली. निसर्गाच्या लहरीपणामुळे सततची नापिकी, घटते उत्पादन व वाढता उत्पादन खर्च , खासगी सावकार, वित्तीय संस्था, बँकेकडून घेतलेले कर्ज यासह इतर कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. गतवर्षी प्रमाणे यंदाही अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले परिणामी शेतमालाचे उत्पादन प्रचंड घटले असून, शेतमालाला भावही योग्य मिळत नसल्याचे दिसून आहे. परिणामी शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर वाढतच असून, तो आत्मत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहे. त्यामुळे प्रथम शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारा, अशी मागणी भारत कृषक समाजाचे चेअरमन प्रकाश मानकर , डॉ. रमेश ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पत्राद्वारे केली. त्यांनी ना. पवार यांची भेट घेऊन त्यांना पत्र देत चर्चाही केली.

गतवर्षी जून व जुलै महिन्यात अतिवृष्टीमुळे ९ हजार ५८८ हेक्टरवरील पिकांना फटका बसला. ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीमुळे ५७ हजार ७५८ हेक्टर क्षेत्रावरील पिकांची हानी झाली झाली. सततच्या सोयाबीन पिकावर प्रतिकूल परिणाम झाला. एक लाख ८९ हजार ३४६ हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीनची हानी झाली. तसेच अतिवृष्टीमुळे कपाशी, तूरसह अन्य पिकेही जमीन दोस्त झाली. सध्या सोयाबीनला प्रतीक्विंटल ४ हजारांपेक्षा कमी भाव मिळत असून, लागवडीचा खर्चही निघत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. ३ हजार २९ हेक्टर क्षेत्रातील संत्राबागा उद्धस्त झाल्या असून, हानी भरपाईसाठी १० कोटी ९० लाख ६२ हजारांची आवश्यकता आहे. यंदा उन्हाळ्यात अवकाळी पावसामुळे ८ हजारांपेक्षा जास्त क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. शेतकऱ्यांबाबत शासनाकडून नवीन घोषणा होतात. त्यात हजारो लाखो कोटींच्या बजेटच्या या योजना त्या विविध खात्यामार्फत राबवण्यात येतात. यावर खर्च केला जातो. हे सर्व शेतकऱ्यांच्या नावाने होते.

## शाळा दुरुस्तीसाठी भीक मांगो आंदोलन

### तीन किलोमीटर चालत विद्यार्थ्यांनी गाठली पंचायत समिती



**मोताळा:** खरबडी येथील जिल्हा परिषद शाळेची दुरावस्था झाली असून वर्ग खोल्या गळत आहेत. याबाबत ग्रामपंचायतला निवेदन देऊनही दखल न घेतल्याने शाळा समिती पदाधिकाऱ्यांनी चिमुकल्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन शाळा दुरुस्तीसाठी भीक मांगो आंदोलन केले. त्यानंतर तीन किलोमीटर पायी चालत विद्यार्थ्यांनी येथील गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

खरबडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची सुविधा नाही. या बाबत ग्रामपंचायत सचिवास वारंवार सांगूनही परिणाम झाला नाही. त्यामुळे ग्रामपंचायतला लेखी तक्रार दिली. ग्रामसभेत सुद्धा सांगितले. तरीही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे शाळा समिती पदाधिकाऱ्यांनी आंदोलन करीत निवेदन दिले. निवेदनावर समाधान इंगळे, किशोर सिरसाट, मंगलसिंग सुरडकर, मोहसीन शाह, विजय इंगळे, विशाल राणे, सुरेश किणगे, प्रवीण राणे यांच्या सह्या आहेत. शहरात आज गुरुवारी आठवडी बाजार असल्याने तालुक्यातील शंभराहून अधिक गावातील नागरिक तथा व्यापारी बाजारात आले होते. यावेळी शैक्षणीक सुविधेसाठी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने लक्ष वेधले.

## योगदिनानिमित्त ११६ महिलांनी घेतला

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा , दि. २३ :



सोशल मीडिया आरोग्याला तारक की मारक या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना सुद्धा यथोचित पुरस्कार देण्यात आले.आपले आरोग्य हीच खरी संपती हा संदेश देत आजारी पडण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन जिल्हा आयुष अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे यांनी केली. जिल्हा आयुष विभाग,ज्ञानगंगा रनर्स ग्रुपचे रण रागिणी फ्री रण क्लब आणि जिल्हा स्त्री रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जून रोजी जागतिक योग दिवसाच्या निमित्ताने स्त्रियांसाठी योग संगम शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये ११६ स्त्रीयांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा स्त्री रुग्णालय अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील, तर प्रमुख पाहुणे जिल्हा आयुष अधिकारीडॉ. प्रशांत तांगडे, हे होते. जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या निसर्गरम्य वातावरणात सर्व स्त्रियांनी योग तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योग आणि प्राणायामाचे प्रात्यक्षिक केले. आयुष कन्सल्टंट डॉ शफात आणि योग तज्ञ डॉ. नरेंद्र भिसे, भोलाने यांनी आयोजनात महत्त्वाची भूमिका निभावली.योगा दिनाचे निमित्त साधून ३१ मे चॅलेंज आणि अहिल्या नगर मॅरेथॉन च्या सर्व रण रागिणींचा क्लब चे टी शर्ट देऊन सन्मान करण्यात आला.उपस्थित सर्व रण रागिणींसाठीआरोग्य विभागाने मोफत ब्लड चेक अप कॅम्पचे आयोजन करण्यात आले. याचा लाभ सर्व रणरागिणी यांनी घेतला.

कार्यक्रमानंतर सर्वांसाठी पौष्टिक नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमासाठी सर्व रणरागिणी मोठ्या संख्येत हजेरी लावली. यावेळी बोलताना डॉ. प्रशांत तांगडे यांनी योग व निरोगी आयुष्य व स्त्री जीवनात त्याचे महत्त्व याविषयी माहिती दिली.

## एसआरपीएफ कार्यालयातील दुसऱ्या माळ्यावरून बिबट्याचा फेरफटका

### कार्यालयातील सीसीटीव्हीत कैद

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. २३ : शहरातील राज्य राखीव पोलिस दल क्रमांक ९ येथील दुमजली प्रशासकीय इमारतीत एक बिबट्या शनिवारी मध्यरात्री आला. त्याने पहिला आणि दुसऱ्या माळ्यावर ऐटीत फेरफटका मारला आणि काही वेळाने निघून गेला. इमारतीत अगदी राजेशाही थाटात फिरणारा हा बिबट्या कार्यालयातील सीसीटीव्हीत कैद झाला आहे. सआरपीएफच्या कार्यालयीन इमारतीत बिबट शिरल्याची माहिती मिळाल्यावर शनिवारी मध्यरात्री वन विभागाचे बचाव पथक बिबट फिरत असलेल्या इमारतीजवळ दाखल झाले. मात्र तत्पूर्वीच इमारतीतून हा बिबट्या निघून गेला. तो बिबट एसआरपीएफ परिसराला लागून असलेल्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परिसरातील झुडपांमध्ये निघून गेला, अशी माहिती वन विभागाच्या बचाव पथकाचे प्रमुख अमोल गावनेर यांनी दिली आहे. दरम्यान एसआरपीएफ वसाहत व प्रशासकीय कार्यालय हा भाग जंगल परिसराला लागून आहे. गत काही वर्षांपासून या परिसरात बिबट्या येतो. लगतच



असणाऱ्या वडाळी, पोहरा जंगल परिसरात बिबट्यांची संख्या वाढली आहे. तपोवन भागात घरात जाऊन बिबट्याचा श्वानावर हल्ला शहरातील तपोवन परिसरात डॉक्टर कॉलनी येथे १५ जूनला रात्री बिबट्याने एका घराच्या फाटकावरून घराच्या आवारात उडी घेतली. या वेळी आवारात असलेल्या श्वानावर हल्ला करून बिबट पुन्हा घराच्या फाटकावरून उडी मारुन पळून गेला होता.

## दिवसभरात १५ मिमी पावसाची नोंद



मान्सूनचे आगमन झाले असून पुढील तीन दिवस जिल्हाभरात मध्यम पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २२ ते २४ या कालावधीत विखुरलेल्या स्वरुपात पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यानंतर पुन्हा २५ जूनपासून पावसाचे प्रमाण वाढू शकते.

**प्रा. अनिल बंड, हवामानतज्ज्ञ, श्री शिवाजी कृषी महाविद्यालय**

**अमरावती:** शहरासह जिल्ह्यात गुरुवारी मान्सून बरसला. पावसाने सर्वच तालुक्यांत हलक्या ते मध्यम प्रमाणात हजेरी लावली. अमरावती शहरात दिवसभरात १५ मिमी पावसाची नोंद झाली. गुरुवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. दुपारी २.३० वाजता मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू झाला. तो सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू होता. झारखंड आणि लगतच्या पश्चिम बंगालवर ठळक कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय आहे. तसेच ७.६ किमी उंचीवर चक्राकार वारे वाहत असून, राजस्थानवर चक्राकार वारे वाहत आहे. त्यामुळे पाऊस सुरू असून जिल्ह्यात शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली आहे.

## उमरखेड ते करोडी रस्ता झाला चिखलमय

### वाहनचालकांना करावी लागते तारेवरची कसरत?

■ महासागर प्रतिनिधी,
उमरखेड , दि. २३ : विदर्भ - मराठवाड्याला जोडणारा उमरखेड ते निवघा बाजार-येळंब-करोडी-हिंगोली हा मधला मार्ग आहे. निवघा बाजारसह हिंगोली हा अत्यंत जवळचा मार्ग आहे. निवघा बाजार येथून करोडी मार्गे उमरखेडचे अंतर फक्त १६ किमी आहे. तर उमरखेड ते निवघा बाजार हादगाव मार्गे ३० कि.मी आहे. त्यामुळे मधल्या मार्गाचा नागरिक वापर करतात. परंतु, नुकत्याच पडलेल्या पावसामुळे या रस्त्याचे पितळ उघडे पडले. हा संपूर्ण रस्ता चिखलमय झाल्याने मार्ग काढताना वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. करोडी येथे पैनगंगा नदीवरून हा मार्ग असल्याने पावसाळ्यात हा रस्ता सुरळीत सुरु राहावा यासाठी नदी पात्रावर कोट्यवधी रुपये खर्च करून मोठा पुल बांधण्यात आला. विदर्भातील उमरखेड-यवतमाळतसेच हिंगोली जिल्ह्यातील येहळेगांव येथे जाण्यासाठी जवळचा मार्ग असून या मार्गाची विदर्भ-मराठवाड्याच्या मधल्या भागात रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. या रस्त्यावर मोठी वदळ असून हिंगोली जिल्ह्यासह नांदेड, यवतमाळ जिल्ह्याला जोडणारा हा



मार्ग आहे. निवघा बाजारसह तळणी, कोळी, महाताळा, चक्री, कोहळी, शिरड, मनुला बु. माटाळा, पेवा, करोडी, काळेश्वर, येळंब, उंचेगाव, धानोरा, हस्तरा येथिल नागरिकांना उमरखेड बाजारपेठेत ये-जाकरण्यासाठी हा एकमेव कमी अंतर असलेला रस्ता आहे. मराठवाड्यातील हदगाव विधानसभा मतदार संघात करोडीपर्यंत भाग येतो. त्यामुळे येथील लोकप्रतिनिधी करोडीपर्यंत रस्ता विकास निधी देतात. करोडीपासुन उमरखेडच्या मधल्या मार्गावर एक मोठा नाला आहे. पावसाळ्यामध्ये नाल्याला पूर आल्यास हा रस्ता पुर्ण बंद होत आहे. या नाल्यावर पुल करणे गरजेचे आहे.

रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून रस्ता दुरुस्ती करण्याची मागणी या भागातील नागरीक अनेक वर्षांपासून करीत आहेत. परंतु, लोकप्रतिनिधीच्या दुर्लक्षामुळे प्रलंबित आहे.

## युवक काँग्रेसच्या वतीने शहर स्वच्छता अभियान

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. २३ : ऐन पावसाळ्याच्या तोंडावर शहरातील अनेक भागात स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. त्यामुळे रोगराईचा धोका निर्माण झाला आहे. सामान्य जनतेला भेडसावत असलेल्या या महत्वाच्या समस्यांकडे लोकप्रतिनिधी व मनपा प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अमरावती विधानसभा युवक काँग्रेसच्या वतीने शहर स्वच्छता अभियान ही अभिनव मोहीम हाती घेण्यात आली आहे. आपले शहर, आपली जबाबदारी या ब्रीदवाक्यानुसार या मोहिमेअंतर्गत शहरातील प्रत्येक प्रभागात स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानाची मनपा प्रशासनाला पूर्वसूचना दिल्याने प्रशासनाने आदल्या दिवशीच संपूर्ण गाडगेनगर परिसरातील कचरा उचलून स्वच्छता केली.



मात्र कठोरा नाका चौक ते पाठ्यपुस्तक महामंडळाकडे जाणाऱ्या रस्त्यावर साचलेल्या कचऱ्याबाबत युवक काँग्रेसला अनेक तक्रारी प्राप्त झाल्याने कार्यकर्त्यांनी स्वतः पुढाकार घेत कचरा उचलला. युवक काँग्रेसच्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले. यानंतर शहरातील प्रत्येक प्रभागात स्थानिक नेत्यांच्या मार्गदर्शनात ही मोहीम राबवण्यात येणार असून, पुढील काही दिवसांत संपूर्ण शहरात हे अभियान प्रभावीपणे राबवले जाणार आहे. विविध सामाजिक संघटनांचा सहभाग देखील या मोहिमेत राहणार आहे. सर्व नागरिकांनी तसेच सामाजिक संघटनांनी या उपक्रमात सहभाग घ्यावा.

शहर स्वच्छतेसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन युवक काँग्रेसच्या वतीने केले आहे. या वेळी महिला काँग्रेस अध्यक्ष जयश्री वानखडे, प्रदीप हिवसे, विजय वानखडे, धीरज हिवसे, संजय शिरभाते, प्रशांत महल्ले, सुजाता झाडे, शिल्पा राऊत, मैथिली पाटील, वंदना थोरात, अनिला काझी, शोभा शिंदे, मनाली तायडे यांच्यासह समीर जवंजाळ, अनिकेत ढेंगळे, वैभव देशमुख, योगेश बुंदेले उपस्थित होते. स्वच्छता हाच मुख्य उद्देश स्थानिक नागरिकांचा सहभाग वाढवून परिसर स्वच्छ ठेवण्याचा मुख्य उद्देश आहे. तत्पूर्वी, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुरुवारी सकाळी ९ वाजता या अभियानाची सुरुवात करण्यात आली. स्वच्छतेचा मूलमंत्र देणाऱ्या संत गाडगेबाबा यांच्या गाडगेनगर समाधिस्थळी प्रतिमेला अभिवादन करून माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, शहर अध्यक्ष बबलू शेखावत, विलास इंगोले, मिलिंद चिमोटे, अशोक डोंगरे, बाळासाहेब भुयार यांच्या प्रमुख उपस्थितीत या मोहिमेला प्रारंभ केला.

## अर्थपूर्ण व्यवहारासाठी अडवले जातात पदोन्नतीचे सर्व प्रस्ताव

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. २३ : करिअर ॲडव्हॉन्समेंट स्कीमअंतर्गत महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या पदोन्नतीचे प्रस्ताव अर्थपूर्ण संबंधांसाठी अडवले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे पात्रता असून आणि प्रस्ताव सादर करुनही अनेक सहयोगी प्राध्यापकांना सहा महिने ते वर्षभराच्या प्रतीक्षेनंतरसुद्धा पदोन्नती प्राप्त झाली नाही. विशेष असे की सदर प्रस्तावांवरील कार्यवाही विहित कालमर्यादेत पार पाडण्याचे स्पष्ट निर्देश उच्च शिक्षण सहसंचालक आणि विद्यापीठ प्रशासनातर्फे देण्यात आले आहेत. परंतु त्या आदेशांना केराची टोपली दाखवत अनेक प्राध्यापकांची पदोन्नती वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवली जात आहे.

गेल्या ९ मे रोजी पुण्याच्या उच्च शिक्षण संचालक कार्यालयाच्या अनुषंगाने येथील सहसंचालकांनी पुन्हा एकदा कठोर शब्दांत परिपत्रक जारी करत प्राचार्य आणि संस्थाचालकांना अंमलबजावणीबाबत जबाबदारीची जाणीव करून दिली. तरीही अनेक संस्थांनी या सूचनांकडे दुर्लक्ष केले. संस्थाचालकांकडून विविध कारणे दाखवून प्राध्यापकांची




स्थाननिश्चिती व पदोन्नतीची प्रक्रिया मुद्दाम थांबवली जाते, अशा अनेकांच्या तक्रारी आहेत. सहयोगी प्राध्यापक ते प्राध्यापक पदोन्नतीसाठी पात्र असतानाही ६ महिने, ८ महिने, वर्षभर किंवा त्याहून अधिक काळ प्रस्ताव प्रलंबित ठेवले गेले आहे. बहुतेक ठिकाणी अर्थपूर्ण कारणांसाठीच असे केले जात असल्याच्या गंभीर तक्रारीही पुढे आल्या आहेत.

उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे यांनी परिपत्रकानुसार पगार बिलासोबतच स्थान निश्चिती न झालेल्या प्राध्यापकांची माहिती दर महिन्याच्या वेतनबिलासोबत देण्याचे आदेश दिले होते.

मात्र, अनेक महाविद्यालयांनी ती माहिती केवळ कागदापुरती पुरवली असून, त्यावर कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे दिसून आलेले नाही.

शासन निर्णयानुसार 'सीएएस' प्रक्रियेसाठी प्राध्यापकाने तीन महिने आधी अर्ज करावा, 'आयक्यूएसी' व विद्यापीठाने त्यावर कार्यवाही करून विहित समितीकडून मंजुरी घ्यावी आणि नंतर सहसंचालक कार्यालय त्यावर शासन प्रतिनिधी म्हणून अंतिम आदेश देतील, अशी ही प्रक्रिया आहे. यातील पहिल्या टप्प्यावरच विलंब केला जात आहे.

उदाहरणच द्यायचे झाल्यास मुर्तिजापूर येथील एका कला महाविद्यालयातील सहायक प्राध्यापिकेने 'सीएएस' अंतर्गत सहयोगी प्राध्यापक या पदासाठीची पात्रता १२ जानेवारी २०२५ रोजी प्राप्त केली.

संबंधित सर्व शैक्षणिक आणि प्रशासनिक प्रक्रिया पूर्ण असूनही, अद्याप त्यांच्या पदोन्नतीचा निर्णय महाविद्यालय प्रशासनाकडून यावेळी घेण्यात आलेला नाही.

**Change Of Name**

I WANT TO CHANGE MY NAME IN PASSPORT NO **G5920507**. MY OLD NAME WAS **MANDEEP SINGH.** NOW MY NEW NAME IS **MANDEEP SINGH RANDHAWA.**
**ADD** : PLOT NO 883 BABADEEP SINGH NAGAR NARI ROAD NAGPUR 440026

MY OLD NAME WAS **UNNATI MANOJKUMAR LALWANI.** NOW MY NEW NAME IS **UNNATI MANOJ LALWANI.**
**ADD** : KANNAMWAR WARD, DESAIGANJ,GADCHIROLI - 441207

MY OLD NAME WAS **NEELAWANTI ISRANI.** NOW MY NEW NAME IS **SHEETAL MANOJ LALWANI.**
**ADD** : KANNAMWAR WARD, DESAIGANJ, GADCHIROLI - 441207

MY OLD NAME WAS **RAMA LAXMANRAO SONOLIKAR.** NOW MY NEW NAME IS **RAM LAXMANRAO SONOLIKAR .**
**ADD** : 436/A BEHIND KAMAL TAKIJ BALABHAU PETH DR. AMBEDKAR MARG NAGPUR MAHARASHTRA 440017

I WANT TO CHANGE MY NAME IN PASSPORT NO **M9538925.** MY OLD NAME WAS **BHUPENDRA KUMAR OMPRAKASH MALIK.** NOW MY NEW NAME IS **BHUPENDRA OMPRAKASH MALIK.**
**ADD** : HOUSE NO 293, NAIK WARD BALLARPUR DIST CHANDRAPUR 442701

## दुबार पेरणी टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी

■ महासागर प्रतिनिधी,
मोताळा , दि. २३ : तालुक्यात अद्याप ही भरपूर पाउस नोंदवण्यात आला नाही, त्यामुळे जमिनीत आवश्यक त्या प्रमाणात ओल निर्माण झालेली नाही, त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई न करता पुरेसा वाफसा होईल तेव्हाच शेतकरी पेरणी करावी असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. खरीप हंगामाची शेतकऱ्यांनी पेरणी करताना जमिनीत पुरेसा वाफसा व बियाण्यांची निवड करताना उगवण क्षमता चांगली असल्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे. दुबार पेरणी टाळण्यासाठी या बाबींकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बुलडाणा यांनी केले आहे. जिल्ह्यात पूर्वमोसमी व अवकाळी पावसाने यावर्षी दमदार हजेरी लावली. ३ मे पासून चालू झालेला पाऊस दम खायला तयार नाही. मे महिन्यातच नदी, ओढे, नाले भरून वाहते झाले. बांध फुटून शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे अनेक तालुक्यातील शेतकऱ्यांना पेरणीपूर्व मशागत करता आली नाही. जून महिन्याच्या सुरूवातीला आठ ते दहा दिवसांच्या पावसाने विश्रांती घेतली. यामुळे पेरणीपूर्व मशागत करून वेळेवर पेरणी करता येईल, अशी अपेक्षा जिल्हयातील बळीराजाला होती. परंतु अनेक ठिकाणी जमिनीत वाफसा येण्याआधीच पावसाने पुन्हा नियमितपणे बरसणे चालूच ठेवले. या पावसामुळे पुन्हा शेतीची कामे खोळंबले.

तर उर्वरित तालुक्यात जमिनीत आवश्यक प्रमाणात ओल निर्माण न झाल्याने पेरणीत अडचणी निर्माण होत आहे. असे असले तरीही अनेक ठिकाणी शेतकरी पेरणी करत असल्याची माहिती आहे.

यामुळे बियाण्यांच्या उगवण क्षमतेवर परिणाम होवून दुबार पेरणीचे संकट येऊ शकते. हे नुकसान टाळण्यासाठी जमिनीत पुरेसा वाफसा



आल्यानंतरच पेरणी करणे योग्य आहे. बियाण्यांची उगवण क्षमता तपासा बियाणे खरेदी करताना प्रमाणित बियाणे खरेदी करावे. पेरणीसाठी बियाणे घरगुती वापरत असाल तर सहाय्यक कृषी यांच्या मार्गदर्शनाखाली बियाण्याची उगवण क्षमता तपासून घ्यावे. मागील एक महिनाभर जिल्हयातील अनेक ठिकाणी जोरदार पाऊस पडला, तर अनेक तालुक्यात जमिनीत पाणीच मुरले नाही.

त्यामुळे जमीनीत वाफसा स्थिती नाही. परिणामी जमीनीत बुरशी स्थिती निर्माण झालेली दिसून येते.

त्याचा परिणाम उगवण क्षमतेवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे अत्यावश्यक झाले आहे. शेतकऱ्यांनी पेरणी करताना बीजप्रक्रिया करावी. बियाणे खरेदी करताना प्रमाणित बियाणे खरेदी करा.

RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३

# अंड्याची गरमागरम भजी

झटपट रेसिपी

दोस्तांनो, पावसाळ्यात गरमागरम भजी खायची लहर येते. अशावेळी हॉस्टेलमध्येच तुम्ही भजीचा घाट घालू शकता. बटाटा, कांदा, पालक या भजी आपण नेहमीच खातो. त्यामुळे यंदा अंड्याची भजी ट्राय करायला हरकत नाही.

**साहित्य :** चार उकडलेली अंडी, चार मोठे चमचे बेसन, चिमूटभर मिरपूड, अर्धा चमचा लाल तिखट, अर्धा चमचा ओवा, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ आणि तेल.

**कृती :** उकडलेल्या अंड्यांचे दोन भाग करा. अंड्यांना मीठ आणि मिरपूड लावून ठेवा. आता एका भांड्यात बेसन घ्या. त्यात लाल तिखट, चवीनुसार मीठ, ओला आणि गरजेनुसार पाणी घालून भजीचं पीठ तयार करा. हे पीठ फार घट्ट आणि सैलही नको. त्यामुळे बेताने पाणी घाला. कढईत तेल गरम करून घ्या. अंड्याचे तुकडे बेसनच्या पिठात घोळवा. हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. ही भजी चटणी किंवा सॉससोबत खा.






# परदेशी नोकरी सोडून सुरू केला दह्याचा ब्रँड



अचिव्हर

अनेक लोक परदेशात चांगली नोकरी मिळवून तिथेच स्थायिक होण्याचे स्वप्न पाहतात, पण केरळमधील रहिवासी नहज बशीर यांनी परदेशातील नोकरी सोडून भारतात परतण्याचा निर्णय घेतला आणि दही बनवण्याचा व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले, परंतु कठोर परिश्रमाने नहजने व्यवसायात यश मिळवले. आज नहज बशीर त्यांच्या 'क्रॅनबेरी' या ब्रँडमधून दरवर्षी १५ कोटी रुपयांची कमाई करत आहेत. इतकेच नाही तर अंबानी कुटुंबदेखील क्रेम्बेरीचे ग्राहक आहे. नहज बशीर यांचा जन्म केरळमध्ये झाला. त्यांचे कुटुंब टिश्यू मॅन्युफॅक्चरिंग व्यवसाय करत असे. वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी नहजला कतारमध्ये नोकरी मिळाली, पण त्याला स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा होता. अशा परिस्थितीत नहजने नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला आणि तो भारतात परतला.

**कुटुंब नाराज; पण**

नहजचे कुटुंब त्याच्या या निर्णयावर खूश नव्हते, मात्र नहजच्या आईने त्याला पाठिंबा दिला. कतारमध्ये नोकरी करताना नहज भारतात यायचा त्यावेळी भारतात चांगल्या आणि आंबट दह्याची मोठी कमतरता असल्याचे त्याला जाणवायचे. नहजला कतारमध्ये मिळणारे दही आवडले. त्यातूनच त्याला दह्याचा व्यवसाय सुरू करण्याची कल्पना सुचली. २०२० मध्ये नहजने क्रॅनबेरी नावाची कंपनी सुरू केली.

**दही ब्रँड यशस्वी**

ही कंपनी अनेक चवींसह विविध प्रकारचे दही बनवते. हळूहळू, नहजचा ब्रँड यशस्वी झाला. नहज स्वतः मॉलमध्ये जाऊन दह्याचे नमुने वाटून लोकांना त्याचे उत्पादन सादर करत असे. अल्पावधीतच नहाजचे दही खूप लोकप्रिय झाले. अंबानी कुटुंबदेखील क्रॅनबेरीचे ग्राहक आहे. क्रॅनबेरीने अंबानी कुटुंबातील दोन्ही मुलांच्या लग्नात दहा हजारांहून अधिक दह्याचे पॅकेट डिलिव्हर केले होते. नहाज या व्यवसायातून दरवर्षी १५ कोटी रुपयांपर्यंत कमाई करत आहे.

## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

# हा गुंता कधी सुटेल?

मॅच मेकिंग

मी २८ वर्षांची तरुणी असून माझं एका मुलावर प्रेम आहे. पण पालकांना तो आवडत नसल्यामुळे त्यांनी माझं लग्न दुसऱ्या मुलाशी ठरवलं आहे. याबाबत मी माझ्या प्रियकराला सांगितलं. हे नातं तोडायचं ठरवलं. पण मी तुझ्याशिवाय राहू शकत नाही, असं त्याचं म्हणणं आहे. या सगळ्या परिस्थितीसाठी तो मला जबाबदार धरतो आहे. या सगळ्याचा मला खूप ताण आला आहे. मी आईवडिलांच्या विरोधात जाऊ शकत नाही. प्रियकरालाही सोडू शकत नाही. मी काय करू?

– तुझी सध्याची मनस्थिती खूप गुंतागुंतीची असणार यात शंका नाही. या नात्याबद्दल तू आईशी बोललीस. तिच्याकडून तुला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. अशा परिस्थितीत तू कुटुंबातल्या इतर सदस्यांचा आधार घेऊ शकतेस. तुझ्या वडिलांशी स्पष्टपणे बोलू शकणाऱ्या व्यक्तीला हा गुंता सांग. तुझा प्रियकर किंवा त्याच्या कुटुंबियांना यासाठी पुढाकार घ्यायला सांग. या नात्याबद्दल तुझे पालक साशंक असतील. ते तुला काही प्रश्न विचारतील. या प्रश्नांची शांतपणे उत्तरं दे. त्यांच्या सगळ्या शंका दूर कर. याआधी तुझ्या प्रियकराला विश्वासात घे, त्याच्याशी स्पष्टपणे बोल. गरज पडली तर समुपदेशकांची मदत घे.



# बेंगळुरूजवळ काय पाहाल?



भटकंती

बेंगळुरू हे सर्वात जास्त गर्दी असलेल्या शहरांपैकी एक आहे. येथील लोक सकाळपासून रात्री उशिरापर्यंत कामात व्यस्त असतात. पण या व्यस्ततेतून वेळ काढून काही लोक सुट्टीचा आनंद घेण्यासाठी कुटुंबासह किंवा मित्रमंडळींसह बाहेर फिरायला जाण्याचा प्लॅन करतात. तुम्ही बाहेर फिरायला जात असाल तर बेंगळुरू शहराला एकदा भेट द्याच. इथे भेट देण्यासाठी बेंगळुरू पॅलेस, लालबाग बोटॅनिकल गार्डन आणि उलसूर तलाव अशी प्रसिद्ध ठिकाणे आहेत.

बेंगळुरू पासून सुमारे १०० किलोमीटरपर्यंतच्या अंतरावर असलेल्या या सुंदर ठिकाणांना भेट देण्याचा प्लॅन करू शकता. येथील नैसर्गिक दृश्ये खूप मनमोहक आहेत. निसर्गाच्या सांनिध्यात राहून नेचर फोटोग्राफी करायला आवडत असेल, तर ही ठिकाणे योग्य आहेत.

**नंदी हिल्स**

नंदी हिल्स बेंगळुरूपासून सुमारे ६० किलोमीटर अंतरावर आहे. इथे पोहोचण्यासाठी एक ते दोन तास लागू शकतात. चिकबल्लापूर रेल्वे स्टेशन हे नंदी हिल्सपासून सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन आहे. इथून ते नऊ किलोमीटर अंतरावर आहे. इथे निसर्गाची सुंदर दृश्ये पाहायला मिळतात. सकाळी ६ ते ६.३० दरम्यान सूर्योदयाचे अद्भुत दृश्य पाहता येईल. या ठिकाणी देवनहल्ली किल्ला पाहू शकता आणि भोगानंदीश्वर मंदिराला भेट देऊ शकता.

**स्कंदगिरी**


स्कंदगिरी हे एक अतिशय प्रसिद्ध ठिकाण आहे. ते बेंगळुरूपासून ६२ किलोमीटर अंतरावर आहे. ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांनी या ठिकाणाला भेट द्यायलाच हवी. यासोबतच येथील सूर्योदय पाहण्याची संधी गमावू नका. तुम्हाला इथे अॅडव्हेंचरस अॅक्टिव्हिटी करण्याची संधीदेखील मिळू शकते. स्कंदगिरी हिल्सच्या माथ्यावर भगवान शंकराचे मंदिर आहे.

**चुंची धबधबा**

बेंगळुरू ते चुंची फॉल्स हे अंतर सुमारे ८० ते ९० किलोमीटर आहे. कर्नाटकातील कनकपुरा येथून मेकेदाटू आणि संगमला जाताना हा धबधबा दिसेल. येथील नैसर्गिक सौंदर्य मनमोहक आहे. हे एक परिपूर्ण असे पिकनिक स्पॉट आहे.


### हाऊ टू

## ऑन करा गेस्ट मोड




आपला स्मार्टफोन इतरांच्या हातात देण्याआधी छोटं सेटिंग करून बघा. अँड्रॉइड स्मार्टफोनमध्ये गेस्ट मोड असतो. तो ऑन केल्यानंतर दुसरं कोणी तुमचे फोटो किंवा इतर चॅट बघू शकत नाही. तुमचा फोन अगदी नव्यासारखा होतो. हा मोड ऑफ केल्यानंतर स्मार्टफोन पुन्हा आधीसारखा होतो. यासाठी फोन सेटिंग्जमध्ये जा. इथे युजर अकाउंट्स हा ऑप्शन्स दिसेल. या ऑप्शनमध्ये गेस्ट मोड दिसेल. हा मोड अॅक्टिवेट करून तुम्ही इतरांना स्मार्टफोन द्या.

### ॲप वर्ल्ड





## घरीच करा मेडिटेशन

दोस्तांनो, सध्याच्या काळात फिट राहणं खूप गरजेचं आहे. योगा, मेडिटेशनमुळे तुम्ही शारीरिकच नाही तर मानसिकदृष्ट्याही फिट रहाता. काही ॲप्स डाउनलोड करून तुम्ही फिटनेसचे धडे घेऊ शकता. सिंपल हॅबिट: मेडिटेशनच्या मदतीने तुम्ही आरामात मेडिटेशन करू शकता. जगभरातली तज्ज्ञमंडळी तुम्हाला मार्गदर्शन करतील. 'काम' या ॲपमध्ये मेडिटेशनची विविध सत्र देण्यात आली आहे. त्यानुसार तुम्ही किती वेळ मेडिटेशन करायचं हे ठरवू शकता. 'ओक' हे ॲप मेडिटेशन आणि श्वसनाच्या व्यायामांच्या मार्गदर्शनाचं उत्कृष्ट माध्यम आहे.

### टेक गाईड

## अशी थांबवा प्री-इन्स्टॉल्ड ॲप्स




स्मार्टफोनमध्ये काही प्री- इन्स्टॉल्ड ॲप्स असतात. ती अनइन्स्टॉलही करता येत नाहीत. यातली बरीच ॲप्स फोनमधली स्पेस व्यापतात. अशा ॲप्सचं कार्य थांबवण्यासाठी काय करता येईल, याविषयी...अशी ॲप्स ऑफ करता येतात. यासाठी फोन सेटिंग्जमध्ये जनरल टॅबवर टॅप करा. मग 'ॲप्स अँड नोटिफिकेशन' सिलेक्ट करा. इथे 'अनइन्स्टॉल' आणि 'फोर्स स्टॉप' असे दोन पर्याय दिसतील. काही ॲप्ससाठी अनइन्स्टॉल पर्यायचा वापर करता येणार नाही. अशावेळी फोर्स स्टॉपचा पर्याय निवडता येईल. यानंतर ते ॲप फोनमध्ये दिसणार नाही.

### सोशल मिडिया




## इन्स्टा स्टोरी बनवा आकर्षक

सध्या इन्स्टाग्राम स्टोरीजची चलती आहे. तुमच्या स्टोरीज अधिक आकर्षक पद्धतीने सादर करून अधिकाधिक फॉलोअर्स मिळवता येतील. यासाठी तुमच्या स्टोरीला साजेसं संगीत जोडा. इन्स्टाग्रामचं म्युझिक फीचर यासाठी उपयोगी पडेल. इंस्टाग्राममध्ये स्टोरीसोबत एखादं कोडं जोडण्याची सोय आहे. त्याचा वापर करा. फॉलोअर्ससाठी प्रश्नोत्तराचं सत्र ठेवा. तुमच्या स्टोरीबाबत इतरांची मतं घेता येतील. यामुळे तुमची स्टोरी जास्तीत जास्त फॉलोअर्सपर्यंत पोहचू शकेल.

# लावा व्यायामाची सवय

फिटनेस फंडा

उद्यापासून व्यायाम सुरू करू असं म्हणणाऱ्यांचा उद्या कधीच येत नाही. तुम्हीही व्यायाम उद्यावर ढकलताय का? सकाळी उठून जीममध्ये जाणं तुमच्यासाठी खूप मोठं आव्हान आहे का? सकाळी मस्त ताणून द्यायची, आराम करायचा असं तुम्हाला वाटत असेल तर लवकर जागे व्हा. सकाळी उठून व्यायामाला सुरूवात करा. ही सवय लावून घेण्यासाठी काय करायचं याविषयी...



✲ सोशल मीडियावर काही वेळ घालवल्याशिवाय झोप येत नसेल तर तुम्हाला ही सवय बदलायला हवी. सोशल मीडियामुळे तुमचं वजन कमी होणार नाही. मात्र जीममध्ये घाम गाळल्यामुळे तुम्ही नक्कीच फिट व्हाल. सकाळी लवकर उठण्यासाठी रात्री लवकर झोपायला हवं. आठ तासांची शांत झोप घेतल्यानंतर सकाळी ताजंतवानं वाटतं. त्यामुळे दररोज लवकर उठण्याची सवय लावा.

✲ जीमला जाताना एखाद्या मित्र किंवा मैत्रिणीला सोबत घ्या. कोणीतरी सोबत असेल तर तुम्हालाही जीमला जाण्यात रस वाटेल. मस्त गप्पा मारत जीममध्ये जाण्याचा आनंद वेगळाच असतो.

✲ जवळची जीम शोधा. लांबवरच्या जीममध्ये जायचा खूप कंटाळा येतो. अशावेळी जवळच्या जीमचं सदस्यत्त्व घेतलं तर तुमचा वेळही वाचू शकेल.

✲ आपल्याला वजन कमी करायचं आहे असा दृढनिश्चय करा. एखाद्या दिवशी आपल्याला खूप कंटाळा येईल. पण हा कंटाळा बाजूला ठेऊन व्यायाम करायला जा. कंटाळ्यापेक्षाही व्यायाम जास्त महत्त्वाचा आहे.

✲ तुमचं वजन एका दिवसात वाढलेलं नाही. तसंच ते पटकन कमीही होणार नाही. त्यामुळे या प्रक्रियेसाठी थोडा वेळ द्या. झटपट निकालांची अपेक्षा करू नका.

# स्टायलिश आणि कम्फर्टेबल जॅकेट्स

फॅशन पॅशन



लग्नापासून पार्टीपर्यंत आणि कोणत्याही प्रसंगी जॅकेट घातले जातात. लेदर फॅब्रिकपासून पॉलिएस्टर मटेरियलपर्यंत बनवलेले जॅकेट उबदारपणा देते. जॅकेट कोणत्याही वयोगटातील लोकांसाठी पहिली पसंती आहेत. यात रेग्युलर फिट प्रकार मिळतो. त्यामुळे शार्प लूक मिळतो.

प्रीमियम फॅब्रिक जॅकेट खरेदी करताना लोकांची अनेकदा फसवणूक होते. सॉलिड पॅटर्न असलेले हे जॅकेट लग्न समारंभापासून पार्टी आणि दैनंदिन पोशाखांपर्यंत सर्व ठिकाणी वापरले जातात. ही जॅकेट्स चांगला लूक देतात. विविध रंग आणि आकारांनुसार घालू शकता. प्रवास करताना आणि जिम करताना ती आरामदायी असतात. जॅकेट सॉफ्ट फिनिशसह एलिगंट आणि समृद्ध लूक देतात. सॉलिड पॅटर्न असलेले जॅकेट्स तुम्हाला पार्टी, लग्न, प्रसंगी आणि कार्यक्रमांमध्ये प्रभावी बनवतात. ते फक्त एकाच वॉशमध्ये चमकदार स्वच्छ होतात.

मेन व्हर्सिटी स्टायलिश लेटरमन लाँग स्लीव्हज विंटर जॅकेट हे जॅकेट लांब बाहीमध्ये येते. ते तुम्हाला नियमित शैलीत डॅशिंग लूक देते. त्यात झिप क्लोजर प्रकार आहे. तो तुम्हाला चांगली पकड देतो. स्टाईल वाढवण्यासाठी हे जॅकेट अनेक रंगांच्या पर्यायांमध्ये येतात. पार्टी ते ऑफिस आणि रेग्युलर या जॅकेटना पर्याय नाही. यात साइड पॉकेट्स असतात. त्यात तुम्ही आवश्यक गोष्टी ठेवू शकता. तुम्हाला डॅशिंग बनवण्यासाठी, त्याच्या दोन्ही साइड स्लीव्हजना वेगवेगळे रंग देण्यात आले आहेत.

# कला शाखेतील युवक-युवती होऊ शकतात पायलट

करियरवाटा



विमान चालवण्याचे, आकाशात उंच भरारी घेण्याचे स्वप्न अनेकजण बघतात, मात्र आतापर्यंत या स्वप्नासाठी एक मोठी अट होती. ती म्हणजे या क्षेत्रात जाण्यासाठी बारावी मध्ये विज्ञान शाखा असावी लागते. त्यामुळे अनेक कला आणि वाणिज्य शाखेतील हुशार विद्यार्थी या क्षेत्रात जाण्यापासून वंचित राहायचे. मात्र आता ही परिस्थिती बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवाई वाहतुकीचे नियमन करणाऱ्या भारताच्या सर्वोच्च संस्थेने (डीजीसीए – डिरेक्टोरेट जनरल ऑफ सिव्हील एव्हिएशन) एक महत्त्वपूर्ण शिफारस केली आहे. त्यामुळे आता कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनाही कमर्शिल पायलट परवान्यासाठी प्रशिक्षण घेता येणार आहे.

'डीजीसीए' ने हा प्रस्ताव नागरी उड्डाण मंत्रालयाकडे पाठवला आहे. मंत्रालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर हा प्रस्ताव कायदा मंत्रालयाकडे जाईल आणि त्यानंतर अधिकृतपणे लागू होण्याची शक्यता आहे. या नव्या नियमाच्या अंमलबजावणीने १२ वी उत्तीर्ण, वैद्यकीयदृष्ट्या सक्षम आणि इतर आवश्यक परीक्षा उत्तीर्ण केलेले सर्व शाखांचे विद्यार्थी पायलट प्रशिक्षणासाठी पात्र ठरतील.

**३० वर्षांनंतर मोठा बदल**

१९९० च्या दशकापासून 'सीपीएल' प्रशिक्षण फक्त विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठीच मर्यादित होते. यामुळे कला आणि वाणिज्य शाखांच्या अनेक हुशार विद्यार्थ्यांना पायलट होण्याची संधी मिळत नव्हती. गेल्या काही वर्षांमध्ये कला व वाणिज्यच्या विद्यार्थ्यांना 'ओपन स्कूल'मध्ये जाऊन भौतिकशास्त्र आणि गणिताची परीक्षा पुन्हा द्यावी लागत होती.

**वाढती मागणी आणि तयारी**

'डीजीसीए'ने या नव्या नियमामुळे पायलट होण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे या वाढलेल्या मागणीला तोंड देण्यासाठी आणि प्रशिक्षणाचा दर्जा टिकवण्यासाठी भारतातील 'फ्लायिंग स्कूल्स'ना अधिक सक्षम करण्याच्या योजना सुरू करण्यात आल्या आहेत. 'डीजीसीए'चे अध्यक्ष फैज अहमद किदवई यांनी 'फ्लायिंग स्कूल्स'ना वेबसाइटवर प्रशिक्षणाचा कालावधी, उपलब्ध विमानांची संख्या, प्रशिक्षकांची उपलब्धता आणि सिम्युलेटरची स्थिती यासारखी माहिती पारदर्शकपणे प्रदर्शित करण्याचे आदेश दिले आहेत.

**पायलट बनण्याचे स्वप्न आता सर्वांसाठी!**

हा निर्णय भारतातील विमानचालन क्षेत्रात समावेशकता वाढवण्याचा एक मोठा टप्पा ठरणार आहे. यामुळे देशातील विमानचालन क्षेत्रालाही मोठा फायदा होण्याची शक्यता आहे, कारण या नव्या धोरणामुळे अधिक प्रमाणात प्रशिक्षित, कुशल आणि विविध पार्श्वभूमीचे पायलट तयार होतील.

# पाण्यापासून मोबाईलचे संरक्षण करायचेय ?

भटकंती



पावसाळा सुरू झाला आहे. देशभरात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस पडत आहे. भारतीय हवामान खात्याने २० हून अधिक भागांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. यात उत्तराखंड, बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि ईशान्य भारताचा समावेश आहे. अशा वेळी ऑफिस, कॉलेज किंवा बाहेर जाताना फोनचे पाण्यापासून संरक्षण करणे गरजेचे आहे. पावसात फोन खराब होऊ नये, यासाठी पाच सोप्या टिप्स जाणून घ्या.

१. पावसाळ्यात वॉटरप्रूफ फोन केस घेणे महत्त्वाचे आहे. या फोन केसला पाणी आणि ओलाव्यापासून वाचवण्यासाठी बनवलेले असते. बाजारात अनेक प्रकारच्या वॉटरप्रूफ केस उपलब्ध आहेत. तुमच्या फोन मॉडेलला सुट होईल अशी केस निवडा. यामुळे पाण्यामुळे होणारे नुकसान टाळता येईल.

२. वॉटरप्रूफ केस वापरणे शक्य नसेल तर फोन सीलबंद वॉटरप्रूफ पाऊचमध्ये ठेवा. पाऊच पूर्णपणे बंद होत आहे आणि पाणी आत जाणार नाही, याची खात्री करा. पाऊचमध्ये सिलिका जेलचे छोटे पॅकेट ठेवा. ते ओलावा शोषून घेईल. पाऊच स्वस्त आणि प्रभावी पर्याय आहे.

३. पावसात फोनचे नुकसान टाळण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे पावसात फोन वापरू नका. फोन खिशात किंवा बॅगेत ठेवा. कॉल किंवा मेसेज पाठवायचा असेल, तर थांबून कोरड्या जागेची निवड करा. पाण्याच्या संपर्कात फोन येणे टाळा.

४. चुकून फोन ओला झाला, तर घाबरू नका. मऊ कापडाने किंवा टिश्यू पेपरने फोन पुसा. पाणी शोषण्यासाठी फोन तांदळाने भरलेल्या भांड्यात २४ तास ठेवा. तांदूळ ओलावा शोषून घेतात. यामुळे फोनचे नुकसान टाळता येईल. फोन बंद करून बॅटरी काढता येत असेल, तर काढा.

५. फोन खरेदी करताना त्याची आयपी रेटिंग तपासा. आयपी ६७ किंवा आयपी ६८ रेटिंग असलेले फोन पाणी आणि धुळीपासून सुरक्षित असतात. असे फोन पावसात किंवा पाण्याच्या संपर्कात आले, तरी खराब होण्याची शक्यता कमी असते. नवीन फोन घेताना हे रेटिंग नक्की तपासा.

# केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधवांनी केले विद्यार्थ्यांचे सारथ्य





## पहिल्या दिवशी शाळकरी विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. २३ :
उन्हाळ्याच्या सुट्टयांनंतर आजपासून शाळाचे सत्र सुरु झाले असून शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी मेहकर तालुक्यातील मादणी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे सारथी बनून बैलगाडीने शाळेत आणले. दोन महिन्याच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर विदर्भातील शाळेची पहिली घंटा सोमवारी २३ जूनला वाजली. शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे स्वागत केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांनी मादणी येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी गावातून वाजतगाजत प्रवेशोत्सव दिंडी काढण्यात आली. या शाळा प्रवेशोत्सवात विद्यार्थ्यांना अद्ययावत दफ्तर आणि शालेय गणवेश वाटप करणेयात आले.

जाधव यांच्या पुढाकारातून बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणाऱ्या जवळपास १७ हजार विद्यार्थ्यांना या अद्ययावत स्कूल बॅग वाटप करण्यात येणार आहे. त्याचा शुभारंभ शाळा प्रवेशोत्सवात जिल्हा परिषदेच्या मादणी शाळेपासून करण्यात आला.

प्रतापराव जाधव म्हणाले की, शिक्षणाविषयी विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण व्हावी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुद्धा चांगले दर्जेदार शैक्षणिक साहित्य मिळावे, या हेतूने ग्रामीण भागात शिक्षण घेणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी या स्कूल बॅग वाटप करण्यात येत आहे. ज्या शाळेत शिकलो त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे स्वागत आज करण्याचे भाग्य मला मिळाले. जि. प. शाळेमध्ये शिकणाऱ्या बुलडाणा जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांना अद्ययावत स्कूल बॅग देण्याचा शुभारंभ आज मादणी गावातून सुरु केल्याचे त्यांनी सांगितले.

# अल्पवयीन तरुणाकडून महिलेचा निर्घृण खून

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. २३ :
जिल्ह्यातील राजुरा शहरात एक धक्कादायक घटना घडली आहे. उधारीवर सिगारेट न दिल्याच्या रागातून एका महिलेचा खून करण्यात आल्याचे पोलिस तपासातून समोर आले आहे. विशेष म्हणजे, खून करणारा 17 वर्षीय अल्पवयीन मुलगा असून तो पीडितेच्या शेजारी राहतो.
कविता रायपूरे (वय 55) या घरी एकट्याच असताना त्यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करून त्यांचा खून करण्यात आला. त्यावेळी त्यांचा मुलगा, जो सुरक्षारक्षक म्हणून काम करतो, ड्युटीवर गेला होता. सकाळी त्यांची विवाहित मुलगी घरी आल्यावर हा प्रकार उघडकीस आला.

पोलिस विभागाने या प्रकरणाचा सखोल तपास करत विविध शक्यतांचा विचार केला. संपत्ती, कौटुंबिक वाद किंवा अन्य कोणतेही वैयक्तिक कारण आहे का, यासाठी 40 ते 50 लोकांची चौकशी करण्यात आली. अखेर अल्पवयीन आरोपीचा शोध लागून त्याच्याकडून गुन्ह्याची कबुली मिळाली. या घटनेने संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण पसरले आहे.
तपासादरम्यान पोलिसांना मयत महिलेच्या घराजवळ राहणारा एक तरुण अचानक बाहेर गावी गेल्याची माहिती मिळाली. यावर संशय घेत पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता धक्कादायक माहिती समोर आली.

मयत कविता रायपूरे यांच्या घरात छोटे किराणा दुकान होते. आरोपीकडून सुमारे एक हजार रुपयांची उधारी बाकी होती. त्यामुळे त्यांनी पूर्वीची रक्कम न भरल्यास सिगरेट देण्यास नकार दिला. याच गोष्टीचा राग मनात धरून आरोपी अल्पवयीन तरुणाने पहाटेच्या सुमारास कोयत्याने त्यांच्या डोक्यावर वार करत खून केला. हा खून आरोपीने अगदी शांतपणे, आधीच नियोजन करून केला होता.

## एमपीएससी भरती प्रक्रियेकरिता पर्सेंटाईल पद्धती लागू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा पोलीस उपनिरीक्षक अशा विविध परीक्षांसह सरळ सेवा भरती प्रक्रिया राबवली जाते. यामध्ये ग्रुप क पदांचा समावेश असतो. आयोगाने त्याच्या परिपत्रकांनुसार यापुढे स्पर्धा परीक्षेप्रमाणेच सरळसेवा भरतीप्रक्रियेकरिता किमान पर्सेंटाईल अर्हतामान लागू करण्यात आला आहे.

आयोगाच्या कार्य नियमावलीतील नियम क्रमांक ८ (५) संदर्भात दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजीच्या सुधारणेसह स्पर्धा परीक्षांप्रमाणेच सरळसेवा भरतीप्रक्रियांकरीता घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षांसाठी देखील किमान पर्सेंटाईल अर्हतामान लागु करण्याचा निर्णय आयोगामार्फत घेण्यात आला आहे.

सदर निर्णय आयोगाकडुन यापुढे घेण्यात येणा-या चाळणी परीक्षांना लागू असेल . पर्सेंटाईल ही प्रणाली उमेदवाराच्या गुणांची तुलना इतर सर्व उमेदवारांच्या गुणांशी करते आणि त्या उमेदवाराने किती टक्के उमेदवारांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे हे दर्शवते.

: हॅलो डॉक्टर :

## कंबरदुखी आणि गुडघेदुखीवर विनाशस्त्रक्रिया उपचार

लोकारोग्य



बदलत्या जीवनशैलीमुळे ऐन तारुण्यात अनेक प्रकारचे आजार उदभवतात. आहाराची चुकीची पद्धत, प्रचंड धावपळ, दगदग आणि मुख्य म्हणजे शारीरिक श्रम अर्थात व्यायामाचा अभाव या कारणामुळे हल्ली अनेक तरुणांमध्ये देखील ऐन तिशीत कंबरदुखीचा आणि गुडगेदुखीचा आजार सुरु होताना दिसतोय. हाडांचे हे विकार सुरु होण्याचं मुख्य कारण म्हणजे मणक्याची चकती सरकणे आणि त्यामुळे मग कंबरेत प्रचंड वेदना सुरु होतात. गुडघ्याची वाटी देखील सरकते त्यातील वंगण कमी झाल्यामुळे देखील गुढगेदुखीचा आजार उदभवतो.

परंतु, हाडाचे विकार म्हंटल कि, ते बरे करण्यासाठी फक्त शस्त्रक्रियाच असा एक गैरसमज जनमानसात रूढ असतो. खरं तर हाडाचे ९९ टक्के आजार हे शस्त्रक्रियेविना बरे होऊ शकतात हे सत्य आहे ते कसे? हेच जाणून घेण्यासाठी सुप्रसिद्ध अस्थिव्यंगविकार तज्ज्ञ डॉ. श्रीकृष्ण ढोणे यांच्याशी साधलेला संवाद.

**गुढगेदुखी किंवा कंबरदुखी म्हटलं कि शस्त्रक्रियाच असा एक समज जनमानसात दिसतो. परंतु, हे दुखणे विना शत्रक्रिया बरे होऊ शकते याची पार्शवभूमी नेमकी काय सांगाल?**

■ शस्त्रक्रिया किंवा सर्जरी हे वैद्यकशास्त्राने आपल्याला दान दिलेले आहे. भाजीमध्ये आपण मीठ किंवा साखर अगदी चिमूटभर टाकतो अगदी तेवढाच शस्त्रक्रियेचा वापर करायचा असतो.

हाडांचे जे आजार असतात त्यावर उपचारांचे सर्व मार्ग हाताळून पाहिल्यानंतर अगदी शेवटचा मार्ग म्हणजे शस्त्रक्रिया आहे. कंबर दुखी किंवा गुढगेदुखी का होते? तर शारीरिक व्यायामाचा अभाव,अरबट चरबट खाणे,मद्यपान,धूम्रपान अशी विविध व्यसन यामुळे पोटाचा घेर वाढतो.वजन प्रचंड वाढते आणि कम्बर दुखी किंवा गुढगेदुखी सुरु होते. म्हणूनच जर आहार पद्धती बदलली, दररोज व्यायाम नियमित केला बैठका काढल्या,आणि औषधांच्या मात्रा घेऊन या सर्व उपायांनी वजन नियंत्रित केले कि आपोआप कम्बर दुखीचा किंवा गुढगेदुखीचा त्रास संपवता येतो. आपल्या मणक्यांमध्ये ५ चकत्या आहेत. दुखणे वाढले कि, एक काढून टाकतो परंतु बाकीच्या चार चकत्या सुरळीत राहण्यासाठी वजन नियन्त्रित कारण गरजेच असत.

**कंबरदुखीचा ज्यांना त्रास असतो त्यांच्या मणक्याची चकती सरकते ती पुन्हा व्यवस्थित करता येते का?**

■ होय. सरकलेली मणक्याची चकती पूर्ववत करण्यासाठी रुग्णाला ट्रॅक्शन चा उपचार अतिशय योग्य असतो . यामध्ये रुग्णाच्या कमरेला पेल्वीस पासून अर्ध्या बाजूला वर आणि खाली सुमारे २५ ते ३० किलो वजन बांधतात.यादरम्यान रुंगांचे जेवण कमी केलं जात. हा उपचार दोन तीन दिवस केला कि रुग्णाचे वजन कमी होते आणि त्याचे दुखणे देखील कमी होते. हा आपल्याकडचा खूप प्रभावी उपचार आहे.

**इंडियन मेथड ऑफ म्यानिप्युलेशन ऑफ स्पाईन म्हणजे काय?**

■ हि उपचार पद्धती म्हणजे रुग्णांकरिता एक सिक्रेट आहे. जेंव्हा रुग्ण पाठदुखीचा किंवा कंबर दुखीचा आजार घेऊन रुग्णलयात येतात तेंव्हा आम्ही त्याची त्याचे दोन्ही पाय पोटाजवळ घेऊन पाठ मोडतो त्यामुळे कट्कन आवाज येतो. जी सरकलेली डिस्क असते ती यामुळे पूर्ववत होते आणि ती आत जाते. या उपचारामुळे रुग्णाला देखील आनंद होतो त्याचे दुखणे अचानक बंद झाल्यामुळे.

**अनेक वयोवृद्धाना गुढगेदुखी आणि कंबरदुखीचा आजार असतो तो बरा करण्यासाठी उपाय काय?आणि पाठीचे स्नायू मजबूत केले तर हाडांची दुखणी कमी करता येतात का?**

■ ज्यांचं वय ७० च्या पुढे आहे अशा वयोवृद्ध रुग्णांना कंबरदुखी आणि गुढगेदुखीचा आजार हा कॉमन असतो. अशा रुग्णांना गुढग्यामध्ये किंवा कंबरेत स्टिरॉइड चे इंजेक्शन देऊन हे दुखणे थांबवता येते. मात्र त्याच बरोबर अशा वयोवृद्धांनी आणि खरं तर सर्वच वयोगटातील रुग्णांनाही नियमित जलतरण करायला हवे. योगासन, सर्वांगासन नियमित करायला हवे. जोर बैठका काढायला हव्यात.

भरपूर चालायला हवं आणि दररोज झोपताना पायांच्या मध्ये लोड घेऊन झोपायचे यामुळे कंबरदुखी आणि गुढगेदुखीचा त्रास थांबवता येतो. आपल्या शरीराची रचना पहिली तर ३० टक्के हाड आणि ७० टक्के स्नायू असतात. शरीराचा संपूर्ण भार आपले स्नायूंचं पेलत असतात.

जस स्कुटर किंवा गाडीला मेन्टेन्स महत्वाचा असतो तद्वतच आपल्या शरीरातील स्नायूंची काळजी घेणं महत्वाचं असत.त्यासाठीच दररोज व्यायाम करावा. केवळ कॅल्शिअम च्या गोळ्या घेऊन उपयोग नाही.

■ ■ ■

## बंजारा हिल्स अंकुरा हॉस्पिटलमध्ये स्पायना बिफिडा रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया



बंजारा हिल्स येथील अंकुरा हॉस्पिटलने न्यूरोगॅस्ट्रो एन्टेरोलॉजी केअरमध्ये एक ऐतिहासिक प्रगती करत, एक अग्रगण्य, किमान आक्रमक प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली आहे ज्यामुळे स्पायना बिफिडा या जन्मजात आजाराने ग्रस्त असलेल्या ३२ वर्षीय महिलेला स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा परत मिळाली आहे. ही एक जन्मजात स्थिती होती ज्यामुळे जन्मापासूनच आतडे आणि मूत्राशयात गंभीर बिघाड झाला होता.

पूर्णवेळ कार्यरत असलेली ही रुग्णा, आतडे बाहेर काढण्यासाठी तिच्या पालकांवर बराच काळ अवलंबून होती. दहा वर्षांपूर्वी दुसऱ्या एका सुविधेत करण्यात आलेली मागील शस्त्रक्रिया ॲंटिग्रेड कॉन्टिनन्स एनीमा अयशस्वी झाली होती, ज्यामुळे तिला काळजीवाहकांकडून चालवल्या जाणाऱ्या मॅन्युअल एनिमावर अवलंबून राहावे लागले.

शाश्वत उपाय शोधण्यासाठी, तिने अंकुरा हॉस्पिटलमधील बालरोग शस्त्रक्रिया आणि बालरोग मूत्रविज्ञानाचे मुख्य सर्जन डॉ. व्हीव्हीएस चंद्रशेखरम यांच्याकडे जाण्याचा मार्ग स्वीकारला.

सर्वसमावेशक मूल्यांकनानंतर, बहुविद्याशाखीय पथकाने एक नवीन, कमीत कमी आक्रमक प्रक्रिया प्रस्तावित केली.असे म्हटले जाते की ही भारतातील पहिलीच प्रक्रिया होती. या पद्धतीमध्ये फक्त कोलोनोस्कोपिक मार्गदर्शन वापरून सेकम (मोठ्या आतड्याच्या सुरुवातीला) मध्ये PEG (पक्युर्टेनियस एंडोस्कोपिक गॅस्ट्रोस्टोमी) ट्यूब टाकणे समाविष्ट होते. या पद्धतीमुळे पारंपारिक शस्त्रक्रिया किंवा चीरांची आवश्यकता दूर झाली, ज्यामुळे रुग्णाला स्वतंत्रपणे तिचे आतडे फ्लश करता आले. ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

दै. महासागरचा उपक्रम

# प्रभाग मित्रांचा भरभरून प्रतिसाद



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
दै. महासागरच्यावतिने नव्याने सुरू करण्यात आलेल्या प्रभाग मित्र या उपक्रमाला नागपूर शहरासह लगतच्या भागातून भरघोस प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांतर्गत प्रभाग मित्रांची पहिली बैठक रवी भवन येथे रविवारी संपन्न झाली.

बैठकीला महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक, सीईओ उमाशंकर लाल, कार्यकारी संचालक पंकज चांडक, निवासी संपादक मनोज बागडे, उपक्रमाचे प्रभारी दिलीपकुमार दुपारे, कमल नामपल्लीवार यांच्यासह कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रारंभी उमाशंकर लाल यांनी या नव्या उपक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. मनोज बागडे, दिलीपकुमार दुपारे यांनी उपक्रमाची विस्तृत माहिती दिली. नागपूर शहराच्या विविध भागात अनेकविध समस्या असून, त्या मांडण्यासह सोडवणूक करण्यासाठी एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात आहे. प्रभाग मित्रांनी नकारात्मक बाबींबर प्रहार करण्याबरोबरच समाजातील सकारात्मक बाबी सुद्धा समोर आणाव्या, असे आवाहन श्रीकृष्ण चांडक यांनी केले. यावेळी प्रभाग मित्रांनी उपस्थित केलेल्या शंकाचे समाधान करण्यात आले.

## विधानसभेत षंढ लोक

### संदीप देशपांडे यांची टीका हक्कभंग दाखल होणार?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :
विधानभवनात षंढ लोक बसल्याची जळजळीत टीका मनसे नेते संदीप देशपांडे यांनी केली आहे. विधिमंडळाच्या कार्यक्रमात मराठी भाषेचा बोर्ड नसल्याच्या मुद्यावर भाष्य करताना त्यांनी हे विधान केले आहे.

ठाकरे गटाचे खासदारा संजय राऊत यांनीही काही महिन्यांपूर्वी असे विधान केले होते. त्यानंतर त्यांच्यावर हक्कभंग दाखल करण्यात आला होता. आता तसेच विधान करणाऱ्या संदीप देशपांडे यांच्यावरही हक्कभंग दाखल होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## त्वचेचा कॅन्सर असलेल्या आजीला नातवाने कचऱ्यात फेकले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३ :
एका नातवाने आपल्या आजीला कचऱ्यात फेकल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. त्वचेचा कॅन्सर असल्याने नातवाने आजीला कच?यात फेकल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेने माणुसकीला काळिमा फासला गेला आहे. सध्या या वृद्ध महिलेवर कूपर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



मुंबईतील आरे परिसरात असलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यात एका वृद्ध महिलेला टाकून गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीच्या आधारे पोलिस घटनास्थळी दाखल झाले. येथील वृद्ध महिलेची चौकशी केली असता घडलेला संपूर्ण प्रकार समजला.

यशोदा गायकवाड असे या वृद्ध महिलेचे नाव असून त्यांना त्वचेचा कॅन्सर आहे. याच कारणामुळे नातवाने आजीला कचऱ्याच्या ढिगाऱ्यात फेकून तो निघून गेला होता. आजीच्या कॅन्सरवर उपचार करण्यासाठी पुरेसे पैसे नसल्याने नातवाने आपल्या आजीला फेकून दिल्याचे समजते. पोलिसांनी या वृद्ध आजीला ताब्यात घेतल्यानंतर उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. परंतु दोन रुग्णालयांनी उपचारास नकार दिला होता. अखेर कूपर रुग्णालायला विनंती केल्यानंतर या रुग्णालयात आजीवर उपचार सुरू करण्यात आले आहेत.

## पुरवठा विभागाच्या गाड्या देसाईगंज येथील कथित सिएमआर कार्यालयासमोर उभ्या?

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. २३ :
हंगाम २०२१ पासुन सिएमआर मिलींग मध्ये प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे धक्कादायक वास्तव आहे. अशात देसाईगंज येथील एका राईसमिलर्सचे वारंवार मानवी खाण्यास अयोग्य तांदुळ पकडण्यात येऊनही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नाही.

दरम्यान संबंधित राईसमिलर्सच्या कथित सिएमआर कार्यालयासमोरच पुरवठा विभागातील तसेच आदिवासी विकास महामंडळ विभागातील अधिकाऱ्यांच्या सरकारी व खाजगी गाड्या उभ्या राहात असल्याचे वारंवार निदर्शनास येत असल्याने संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह लावले जात आहे. सदर राईसमिलर्सचे पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांशी साटेलोटे तर नाही ना? अशी चर्चा आहे.

देसाईगंज येथील एका राईसमिलर्सचे जिल्ह्यातील कुरखेडा, देसाईगंज, आरमोरी, गडचिरोली तसेच वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथील शासकीय गोदामात मोठ्या प्रमाणात पुरवठा केलेला मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ रंगेहाथ पकडण्यात आला आहे. असे असतांना संबंधित राईसमिलर्सवर अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही.

दरम्यान सदर राईसमिलर्सच्या कथित सिएमआर कार्यालयासमोर वारंवार आदिवासी विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालय गडचिरोली कार्यालयाची एमएच-१५ एचक्यु-६०९८ आदिवासी विकास महामंडळ उपप्रादेशिक कार्यालय अहेरीचे तत्कालीन उपप्रादेशिक व्यवस्थापक बी.एस.बरकमकर यांची एमएच-२६ सिई-०८९३ तसेच तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश आघाव पाटिल यांची एमएच-१५ जिएल-३९०९ क्रमांकाची गाडी वारंवार उभी राहात असल्याचे निदर्शनास येत आहे.

कथित सिएमआर कार्यालय हे सिएमआर मिलींग मध्ये वारंवार मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करीत असलेल्या राईसमिलर्सचे खाजगी कार्यालय असतांना पुरवठा विभागातील तसेच आदिवासी विकास महामंडळाचे अधिकारी मात्र वारंवार भेटिला येण्यामागे मोठी आर्थिक देवाणघेवाण असल्याचे सांगीतले जात आहे.

कथित सिएमआर कार्यालयाचा संचालक लगतच्या छत्तीसगड, तेलंगणा, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आदी ठिकाणांहून मानवी खाण्यास अयोग्य रिसायकलिंग राशनचा मोठा तांदुळ पुरवठादार असुन पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांशी साटेलोटे असल्याने सिएमआर मिलींग गैरव्यवहारात गुंतला असल्याचे सांगण्यात येत आहे.

यात प्रामुख्याने किमान आधारभूत किंमत धान खरेदी केंद्रावरुन धानाचे लाट मिळवून देण्यासाठी प्रती लाट ४० हजार,तांदळाचे लाट पास करून देण्यासाठी अधिकाऱ्यांना देण्याच्या नावाखाली प्रती ४० हजार असे एकुण ८० हजार प्रती लाट घेऊन पुरवठा अधिका?यांना ठरलेली लाटवाईज रक्कम देत असल्यानेच सिएमआर मिलींग मध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करूनही कारवाई केली जात नसल्याचे सांगीतले जात आहे.

विशेष म्हणजे जे राईसमिलर्स कथित सिएमआर कार्यालयाच्या संचालकाच्या मजीर्नुसार चालण्यास नकार देतात अशांचे एकतर सिएमआर मिलींगचे लाट पास केले जात नाहीत किंवा सदर राईसमिलर्स कडुन तांदुळ घेऊन शासकीय गोदामात जमा करण्यास नेत असतांना पकडून दिल्या जातात ज्याबाबत एफआयआर करण्यात येऊ नये करीता सदर राईसमिलर्सच मध्यस्थी करून लाखो रुपयात प्रकरण सेट करून देत असल्याचे सिएमआर मिलींग मधुन बाद झालेले अनेक राईसमिलर्सकडुन सांगण्यात येते.

तथापी जिल्ह्यात सिएमआर मिलींग करणारे सर्वच राईसमिलर्स कथित सिएमआर कार्यालयाच्या संचालकाच्या अधिपत्याखाली धान भरडाईचे काम करत असुन मागील काही वर्षांपासून शासकीय धान खरेदी केंद्रावरुन उचल केलेला धान भरडाई न करता परस्पर खुल्या बाजारात विक्री करून शासनाला मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ जमा करून शासनाची फसवणूक करून लाखो रुपये विनासायास कमवित असल्याचे सांगीतले जात आहे.

यात पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांची भुमिकाच मुख्य असल्याने व सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्स कडुन वसुली करून कथित संचालक संबंधित अधिकाऱ्यांचा हिस्सा अदा करीत असल्याचे सांगीतले जात आहे.विशेष म्हणजे कथित संचालकास राजकीय पाठबळ लाभले असल्याने त्याचाच गैरफायदा घेत कथित संचालक सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्स सोबतच पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांसह आदिवासी विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनाही बोटावर नाचवत असल्यानेच सिएमआर मिलींग मध्ये दरवर्षी एका हंगामात शासनाच्या किमान ५०० कोटी रुपयाला संगनमताने चुना लावल्या जात असल्याचे सांगण्यात येते.

त्यामुळे कथित कार्यालयासमोर उभ्या गाड्या ठेवत असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांच्या एकुणच संपत्तीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात आल्यास मोठे घबाड उघडकिस येण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.

महासागर
नागपूर
वृत्तसागर
■ मंगळवार, दि. २४, जुन २०२५ ■

# वेकोलि व्यवस्थापकाच्या घरी चोरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

वर्धा मार्गावर असलेल्या जामठा परिसरातील संदेश सिटीला सध्या चोरांनी लक्ष्य केले आहे. रविवारी घरफोडीची पुन्हा एक घटना येथे पुढे आली आहे. चोरांनी वेकोलि व्यवस्थापकाच्या घरी चोरी करून 9 लाखांच्या मुद्देमालावर डल्ला मारला. शुक्रवारी रात्रीही चोरट्यांनी सोसायटीत घरफोडी केली होती. विशेष म्हणजे ही चोरी कुटुंब घरी असतानाही झाली होती.

यावरून चोरांची हिंमत किती वाढली आहे याचा अंदाज येतो. दोन दिवसांच्या आत घरफोडीची दुसरी घटना घडल्याने परिसरात दहशतीचे वातावरण आहे. पोलिसांनी त्रिनाद कोटमराजू सरीकोंडा (28) रा. संदेश सिटीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. त्रिनाद हे वेकोलित व्यवस्थापक आहेत. गत शुक्रवारच्या सकाळी ते घराला कुलूप लावून कुटुंबासह हैदराबाद येथे गेले होते. या दरम्यान चोरांनी घरामागील स्वयंपाक खोलीच्या खिडकीचे ग्रील तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटात ठेवलेला हिऱ्यांचा हार, सोनसाखळी, अंगठी आणि महागड्या घड्याळी असा 9 लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. रविवारी सकाळी ही घटना पुढे आली. त्रिनाद यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली.

पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. शुक्रवारी रात्री परिसरातच राहणाऱ्या सुनील द्विवेदी कुटुंबासह घराच्या पहिल्या माळ्यावर झोपलेले होते. मध्यरात्रीनंतर चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश करून 5 लाख रुपयांचा माल चोरी केला होता. एकानंतरएक दोन्ही घटना पुढे आल्याने सोसायटीमध्ये राहणाऱ्या नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे.

# "स्वप्निकेतन" सदनिकांचे स्वप्न झाले साकार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांचे हस्ते लाभार्थ्यांना किल्ली सुपूर्द

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

नागपूर महानगरपालिकातर्फे प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. 03 अंतर्गत मौजा वांजरा खं. क्र. 24/4, 24/6 जागेवर बांधण्यात आलेले 480 ईडब्ल्यूएस सदनिकांचे हस्तांतरण व विविध विकास कामांचे लोकार्पण रविवार (ता.22) करण्यात आले. कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना सदनिकांच्या किल्ली सुपूर्द करण्यात आल्या.



यावेळी मार्गदर्शन करताना श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सर्वप्रथम लाभार्थ्यांचे अभिनंदन केले. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मनपाने अतिशय उत्तम सदनिका तयार केल्याची भावना व्यक्त करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहरातील सहा ही विधानसभा क्षेत्र निहाय पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत किमान एक हजार घरांच्या इमारती उभारण्यात याव्या, जेणेकरून नागरिकांना राहण्याची उत्तम व्यवस्था होईल. त्यांनी सांगितले की, झोपडपट्टीत राहणाऱ्या नागरिकांना देखील मालकी हक्काचे पट्टे दिले जात असून, पुढील काळात सवार्ना पक्के घरे मिळतील. असा विश्वास व्यक्त केला. तसेच मनपाद्वारे उभारण्यात आलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्राला अतिशय सुंदर व देखणी इमारत प्रमाणे दर्शविण्याचा देखील सूचना त्यांनी यावेळी दिली. नागपूर हे हरित शहरांच्या यादीत असून, येथील विकासासह पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरणपूरक अशा ई बसेस देखील नागरिकांच्या सेवेत उपलब्धता करून दिली आहेत, तरी नागरिकांनी स्वतःच्या वाहनांचा कमीत कमी उपयोग करून सार्वजनिक वाहतूक सेवेचा लाभ घ्यावा असे ही फडणवीस यावेळी म्हणाले.

याप्रसंगी प्रधान सचिव गोविंद राज, मनपाचे आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत,अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., उप सचिव विद्या हंपिया, अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, मनपाचे मुख्य अभियंता मनोज तालेवार, मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, एसडीपीएलचे संचालक गौरव अग्रवाल, पीएमसीचे दिनेश वराडे यांच्यासह मनपाचे अधिकारी कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

यावेळी राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागरिकांना हजार रुपयात त्यांच्या घराची रजिस्ट्री करण्याचा महत्वाचा निर्णय राज्य शासनाने घेतल्या बद्दल मुख्यमंत्री यांचे अभिनंदन केले. तसेच पुढील वर्षात केंद्र शासनाच्या निधीतून राज्यातील दीड कोटी जनतेसाठी ३० लाख घरे उपलब्ध होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकेत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी स्वप्नानिकेतन बद्दल माहिती देत राज्य शासनाकडून निधीची उपलब्ध करून दिल्याबद्दल आभार मानले.

सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण असणाऱ्या स्वप्ननिकेतन सदनिकांच्या हस्तांतरणासोबतच मनपाच्या अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाच्या पाचपावली अग्निशमन केंद्र, स्वच्छता विभागाच्या नव्या दोन चोकेज रिसायकलर मशीन, ओंकारनगर येथील स्मार्ट टॉयलेट, हॉट मिक्स प्लांट नवीन मशिनरी, कळमना जलतरण तलाव, २७ आयुष्मान आरोग्य मंदिर केंद्र, ट्री ट्रान्सप्लांटर मशिन, अग्निशमन फायर टेंडर्स, राज्य शासनाच्या निधीतून प्राप्त बसेसचे आणि अंबाझरी दहन घाटाकडे जाणाऱ्या पुलाचे लोकार्पण सह मेहंदी बाग उड्डाणपुलाखाली, दही बाजार उड्डाणपुलाखाली, सक्करदरा उड्डाणपुलाखाली, दिघोरी उड्डाणपुलाखाली लँडस्केपिंग आणि सुशोभीकरणाचे काम, जे पी नगर मेट्रो स्टेशनच्या उभ्या भिंतीवर ग्राफिटी वर्क म्हणून ओळखले जाणारे प्रॉव्ह. लँडमार्क आर्ट पेंटिंग, चौकात महिलांच्या जीवनासह सायकलचे भित्तिचित्र, नरेंद्र नगर चौकात उभ्या असलेल्या अंतराळवीराचे भित्तिचित्र आदींचे लोकार्पण करण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजनेच्या उत्कृष्ट अमलबजावणी बद्दल मनपाच्या चमू सह, एसडीपीएल व पीएमसी चमूचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मनपाचे जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी व्यक्त केले. यावेळी उपायुक्त राजेश भगत, विनोद जाधव, अशोक गराटे, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, मुख्य अग्निशमन अधिकारी तुषार बाराहाते, उद्यान अधीक्षक अमोल चौरपगार, कार्यकारी अभियंता सुनिल उईके, प्रतिक गजभिये, एसडीपीएलचे उन्मेष धोटे व इतर उपस्थित होते.

# वाडी अमरावती महामार्गावर बोलेरो पिकअपची जोरदार धडक

## एकाचा मृत्यू, दोन गंभीर जखमी



■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २३ :

येथील अमरावती महामार्गावरील भारत नगर दुभाजका जवळ सोमवार २३ जुन रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास एका भीषण अपघातात एका युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे.

मृत युवकाचे नाव उत्तमकुमार मंगलू राम ठाकूर (वय ३५) असे असून तो आयुध निमार्णी अंबाझरी येथे कार्यरत होता. त्याच्यासोबत सतीश लकडा (वय २८) व फुलचंद इक्का (वय ३२) हे दोघे सहकारी देखील गंभीर जखमी झाले आहेत. हे तिघेही आठव्या मेल येथून वडधामनाकडे यामाहा दुचाकी एमएच ३१ इक्स १२४६ वरून निघाले होते. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार चालक नशेत होता आणि ते तिघे विरूद्ध बाजुने प्रवास करत होते. दरम्यान, वडधामनाकडून वाडीकडे भरधाव वेगाने येणाऱ्या बोलेरो पिकअप एमएच ४९ बी झेड ००९३ ने समोरून जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की उत्तम ठाकूर याचा जागीच मृत्यू झाला. तर इतर दोघे गंभीर जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच वाडी पोलीस स्टेशनचे दुय्यम पोलीस निरिक्षक सोनूबापू देशमुख, पोलीस उपनिरीक्षक निकिता कोठे, उपनिरीक्षक अमित बंडगर आणि हेड कॉन्सटेबल संतोष उपाध्याय यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तात्काळ पंचनामा करून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात रवाना केले, तर मृतकाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला. बोलेरो चालक घटनास्थळावरून फरार झाला.

# मुकबधीर बहीण-भाऊ खेळता-खेळता बेपत्ता

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

आई-वडिलांसह नातेवाईकाकडे नागपुरात आलेले मुकबधीर बहीण-भाऊ घरासमोर खेळता-खेळता अचानक बेपत्ता झाले. याबाबतचे वृत्त पसरताच परिसरात खळबळ उडाली. माहिती मिळताच वाठोडा पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली. संपूर्ण परिसर पिंजून काढला. अखेर 5 तासांच्या अथक प्रयत्नानंतर दोन्ही मुले छतरपूर फॉर्म्सजवळ मिळाली. त्यांना ताब्यात घेऊन पालकांच्या स्वाधिन करण्यात आले. मुलांना सुरक्षित पाहून आई-वडिलांच्या जीवातजीव आला.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही मुले बिहार येथील रहिवासी आहेत. मुलगा 5 वर्षांचा तर मुलगी 6 वर्षांची आहे. ते आई-वडिलांसह बिडगावच्या आराधनानगरात राहणाऱ्या नातेवाईकाकडे आले होते. रविवारी रात्री 9 वाजताच्या सुमारास दोघेही घरासमोर खेळत होते. खेळता-खेळता अचानक दोघेही बेपत्ता झाले. कुटुंबीयांनी दोघांचाही शक्य त्या ठिकाणी शोध घेतला, मात्र ते मिळाले नाही. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. वाठोडा पोलिसांनी तात्काळ दोन्ही मुलांच्या वर्णनाची माहिती नियंत्रण कक्षाला दिली. माहिती मिळताच एसीपी नरेंद्र हिवरे आणि वाठोडाचे ठाणेदार हरीश बोराडे घटनास्थळी पोहोचले. पथकांचे गठन करून मुलांचा शोध घेण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी रवाना केले. आसपासच्या पोलिस ठाण्यांमध्येही माहिती देण्यात आली. गस्तीवर असलेल्या पोलिसांनी उद्घोषणा प्रणालीच्या माध्यमातून लोकांना मुलांबाबत माहिती दिली. नागरिकही मदतीसाठी पुढे सरसावले. एका महिलेने घटनास्थळापासून जवळपास एक किमी अंतरावर असलेल्या रेल्वे पुलाखालील मोठ्या खड्ड्यात जमलेल्या पाण्याजवळ दोन्ही मुलांना खेळताना पाहिले होते. तिने पोलिसांना माहिती दिली. तात्काळ पोलिस तेथे पोहोचले. त्या ठिकाणी मुलांच्या पाऊलखुणा तर होत्या, मात्र मुले नव्हती. त्यामुळे मुले खड्ड्यात बुडाली तर नाही असा संशय निर्माण झाला. स्थानिक नागरिक गुड्डू शेवणे यांनी वेळ न दवडता खड्ड्यात उडी घेतली. पाण्यात खोलवर जाऊन पाहणी केली. परंतु मुले तेथे नव्हती. सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

या दरम्यान मुलांची माहिती आसपासच्या सर्व परिसरात पोहोचली होती. एका व्यक्तीला माहिती मिळाली की, दोन मुले छतरपूर फार्म्सच्या दिशेने गेली आहेत. त्याने तत्काळ पोलिसांना सूचना दिली. पोलिस आणि नागरिक तेथे पोहोचले. उमिया परिसरातील रेल्वे रूळाजवळ दोन्ही मुले सुखरूप खेळताना दिसली. भटकलेली मुले आपल्या घराऐवजी रेल्वे लाईनवरून विरुद्ध दिशेनी जात होते.

# वाढत्या विजेच्या मागणीसाठी महावितरण सज्ज

## नागपूर जिल्ह्यात वितरण यंत्रणा बळकटीकरणाची कामे वेगात!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

नागपूर जिल्ह्यातील विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी महावितरणने युद्धपातळीवर कामे हाती घेतली आहेत. अवघ्या १ मार्च ते २० जून २०२५ या साडेतीन महिन्यांच्या कालावधीत महावितरणने जिल्ह्यात वीज वितरण यंत्रणा बळकट करण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी पावले उचलली आहेत. याअंतर्गत, 4 नवीन उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आली असून, १० उपकेंद्रांतील पॉवर ट्रान्सफॉर्मर्सची क्षमता वाढवण्यात आली आहे. याशिवाय, ४७१ नवीन वितरण रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बसवून वीज वितरण यंत्रणेची क्षमता लक्षणीयरीत्या वाढवण्यात आली आहे.



नागपूरच्या विकासाला गती देण्यासाठी आणि ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी महावितरणने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाल विभागात ३३/११ केव्ही श्रीकृष्ण नगर आणि ३३/११ केव्ही मानेवाडा ही दोन नवीन उपकेंद्र सुरू करण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त, बुटीबोरी विभागात ३३/११ केव्ही शिवकैलाशा व 33/11 केव्ही एच झोन (आमगाव) एमआयडीसी ही नवीन उपकेंद्रही कार्यान्वित झाले आहे. या नवीन उपकेंद्रांमुळे संबंधित परिसरातील वीजपुरवठा अधिक स्थिर आणि विश्वसनीय होण्यास मदत होईल, ज्यामुळे नागरिकांना दजेर्दार वीज सेवा मिळेल.

विद्यमान उपकेंद्रांची क्षमता वाढवून महावितरणने वीजपुरवठ्याचा दाब यशस्वीपणे कमी केला आहे. महाल विभागातील जयहिंद, सिव्हिल लाईन्स विभागातील डॉ. आंबेडकर चौक, सावनेर विभागातील खापा, कळमेश्वर, उमरेड विभागातील सैकी, पचखेडी, जावळी आणि मौदा विभागातील गुमथळा व मा उमिया या ३३/११ केव्ही उपकेंद्रांतील पॉवर ट्रान्सफॉर्मर्सची क्षमता वाढवण्यात आली आहे. यामुळे या भागातील विजेच्या वाढत्या मागणीची पूर्तता करणे आता शक्य होणार आहे, ज्यामुळे स्थानिक पातळीवर वारंवार होणारे वीज खंडित होण्याचे प्रकार कमी होतील.

वीज वितरण प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी महावितरणने जिल्ह्यात ४७१ नवीन वितरण रोहित्र बसवले आहेत. यामुळे स्थानिक पातळीवरील वीजपुरवठ्याचे व्यवस्थापन अधिक प्रभावी होणार आहे, ज्यामुळे विजेच्या मागणीनुसार पुरवठा करणे सोपे होईल. यात नागपुर शहर मंडलातील 25 केव्हीएची 15, 63 केव्हीएची 17, 100 केव्हीएची 31, 200 केव्हीएची 166, 315 केव्हीएची 18 आणि 630 केव्हीएची 4 तर नागपूर ग्रामिण मंडलातिल 16 केव्हीएची 2, 25 केव्हीएची45, 63 केव्हीएची 9, 100 केव्हीएची 110, 200 केव्हीएची 25, 15 केव्हीए सिंगल फेजची 8 आणि 25 केव्हीए सिंगल फेजची तब्बल 21 अशी जिल्ह्यात एकूण 471 नवीन वितरण रोहीत्रांचा समावेश आहे. यामुळे स्थानिक पातळीवरील वीजपुरवठ्याचे व्यवस्थापन अधिक प्रभावी होणार आहे.

या सर्व कामांमुळे नागपूर जिल्ह्यातील वीजपुरवठा अधिक सशक्त, गुणवत्तापूर्ण आणि ग्राहकांच्या गरजा पूर्ण करणारा ठरेल, असा विश्वास महावितरणने व्यक्त केला आहे. भविष्यातील वाढती मागणी लक्षात घेता, महावितरणची ही पाऊले जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरतील आणि नागपूर जिल्ह्याला ऊर्जेच्या बाबतीत अधिक आत्मनिर्भर बनवतील.

# संदेश सिटी मध्ये घरफोडी

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. २३ :

पोलीस स्टेशनअंतर्गत जामठा शिवारातील संदेश सिटी मध्ये बंद घराच्या किचन ला असलेल्या मागच्या खिडकीचे लोखंडी ग्रील तोडून अज्ञात आरोपीनी घरात प्रवेश करून सोन्याचांदीच्या दागिन्यासह ८.९२००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. फिर्यादी त्रिनाथ कोटमराज सरिकोंडा, वय - 58 वर्ष, रा. रऊ 20, संदेश सिटी, जामठा, वर्धा रोड ,नागपूर, हे वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड मध्ये जनरल मॅनेजर आहेत.शुक्रवारी २० जूनला आपल्या कुटुंबियांसह ते हैदराबाद या त्यांच्या पैतृक गावी गेले होते. दरम्यान अज्ञात चोरट्यांनी या सोसायटीच्या मागील भागात असलेल्या सुरक्षा भिंत ओलांडून त्यानंतर सरीकोंडा यांच्या घराच्या किचन ला असलेल्या खिडकीच्या लोखंडी ग्रील तोडून आत प्रवेश केला व घरातील आलमारीत असलेल्या 18 सोन्याच्या बांगड्या प्रत्येकी 15 ग्रॅम वजन असे एकूण



270 ग्रॅम व ज्याची अंदाजे किंमत 6,75,000 रू एक 45 ग्रॅमची सोन्याची चैन किंमत 1,12,000/- रु. जुनी वापरती एक 22 ग्रॅम सोन्याची स्टेप चेन ज्याची किं.अं. 55,000/- रु., जुनी वापरती एक गोल्डन कव्हर ची घड्याळ किंमत 10,000/- रु.व जुना 18 कॅरेटच्या 18 ग्रॅम सोन्यामध्ये दोन कॅरेट डायमंडचा नेकलेस व कानातले ज्याची अं.किं. 40,000/- रु., असा एकुण 8,92,000/- रु. चे सोन्याचे दागीने, घडी व डायमंड ज्वेलरी असा मुद्देमाल घेऊन आरोपी पसार झाले. रविवारी (२२) सकाळी ८ वाजता फिर्यादी घरी पोहचले मुख्य दार उघडून आतमध्ये गेल्यावर त्यांना अलमारीतील कपडे व साहित्य अस्ताव्यस्त पडून दिसले.

# महावितरणचे स्मार्ट मीटर प्रीपेड नव्हे तर पोस्टपेडच : संचालक सचिन तालेवार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

महावितरणकडून बसवण्यात येत असलेले स्मार्ट मीटर हे 'प्रीपेड' नसून, नेहमीच्या मीटरप्रमाणे 'पोस्टपेड'च असतील, असे महावितरणचे संचालक (संचलन व प्रकल्प) सचिन तालेवार यांनी आज (दि. 22) नागपूर येथे सांगितले. या नव्या मीटरमध्ये केवळ 'कम्युनिकेशन'ची अतिरिक्त सुविधा उपलब्ध असून, यामुळे ग्राहकांना आपल्या वीज वापराचे अधिक प्रभावीपणे नियोजन करता येणार आहे.




संचालक तालेवार यांनी स्पष्ट केले की, थकबाकीदार ग्राहकांना पूर्वीप्रमाणेच वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी 15 दिवसांची पूर्वसूचना दिली जाईल. विशेष म्हणजे, मोबाईल ॲपद्वारे ग्राहक आपल्या वीज वापराचे सविस्तर निरीक्षण करू शकतील आणि त्यावर नियंत्रण ठेवू शकतील. नागपूर येथील विद्युत भवन कार्यालयात आयोजित नागपूर परिक्षेत्रातील नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, अमरावती आणि अकोला या पाचही परिमंडलांच्या संयुक्त आढावा बैठकीप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्देश दिले.

ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा आणि त्यांच्या तक्रारींचे त्वरीत निराकरण करण्यावर विशेष भर देण्याच्या सुचना करीत त्यांनी मार्च 2025 च्या तुलनेत वाढलेली थकबाकी या महिन्यात शंभर टक्के वसूल करण्याचे तसेच चालू मागणीची संपूर्ण वसुली करण्याचे निर्देश तालेवार यांनी दिले. ग्राहक मॅपिंग, लोड शिफ्टिंग, एमएफ समस्या यांसारख्या विविध कारणांमुळे होणारे नकारात्मक आणि असामान्य नुकसान त्वरित दुरुस्त करण्याचे आदेश त्यांनी यावेळि दिले. एकाच पत्त्यावर असलेल्या एकापेक्षा अधिक वीज जोडण्यांची पडताळणी युद्धपातळीवर करण्याचे निर्देशही तालेवार यांनी दिले. नवीन वीज जोडण्या आणि वीज भार (लोड) वाढवण्याची प्रकरणे विहित मुदतीत पूर्ण करण्यासोबतच सौर प्रकल्प सुरू होण्यापूर्वी सर्व प्रणाली मजबुतीकरणाची कामे पूर्ण करावीत. रखडलेल्या प्रकल्पांना गती देण्यासाठी एजन्सींना पुरेसे साहित्य आणि अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्यासोबतच कामांची गुणवत्ता सुनिश्चित करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

यावेळी त्यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप, शेतीला दिवसा वीज पुरवठा, प्रधानंत्री सुर्यघर मोफत वीज योजना, वाहिनी विलगीकरण, सौरग्राम, मॉडेल सौर व्हीलेज, उपकेंद्र सक्षमीकरण, अधिक वीज हानी असलेल्या वाहिन्या, पैसे भरूनही प्रलंबित वीज जोडण्या, वीज वाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती या विषयांचा देखील आढावा संचालक तालेवार यांनी यावेळी घेतला.

या बैठकीला मुख्य अभियंता सर्वश्री सुहास रंगारी, दिलीप दोडके, हरिश गजबे, राजेश नाईक, अधीक्षक अभियंता सर्वश्री अमित परांजपे, मंगेश वैद्य, संजीव वाकडे, अनिल वाकोडे, दिपक देवहाते यांच्यासह नागपूर शहरातील सर्व कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

# विजेच्या धक्क्याने मुलाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

टाकीतून पाणी काढताना मोटरला हात लागल्याने एका 16 वर्षीय मुलाला विजेचा जबर धक्का बसला. कुटुंबीयांनी उपचारार्थ रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. ही घटना कोतवाली पोलिस ठाण्यांतर्गत महाल परिसरात घडली. ऋतिक प्रविण दारोडकर असे मृत मुलाचे नाव आहे.

या घटनेने त्याच्या कुटुंबाला मोठा धक्का बसला आहे. ऋतिक हा अकरावीचा विद्यार्थी होता. रविवारी रात्री 11 वाजताच्या सुमारास तो घरी पाण्याच्या टाकीतून पाणी काढत होता. या दरम्यान टाकीत लागलेल्या पाण्याच्या मोटरचे बटन सुरू होते. पाणी काढताना मोटरला स्पर्श झाल्याने ऋतिकला विजेचा जबर धक्का बसला. तो बेशुद्ध होऊन खाली कोसळला. कुटुंबीयांनी तत्काळ त्याला उपचारार्थ खासगी रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी मिळालेल्या सूचनेवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# बिडगाव नगरपंचायत सर्वपरी विकास करणार : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गावभेट दौरा या उपक्रमांतर्गत नागपूर जिल्ह्यातील बिडगाव नगर पंचायतीस भेट दिली. त्यावेळी नगरपंचायत तर्फे सर्व प्रथम वृक्षारोपण करण्यात आले. सोबत त्यांनी स्थानिक नागरिकांना येत असलेल्या समस्येचे लेखी निवेदन सुद्धा स्वीकारले. विशेष करून प्रधानमंत्री आवास योजना बीडगाव येथील सर्वाधिक तक्रार प्राप्त झाल्यामुळे महसूल मंत्री यांनी सांगितले की " मला या गावाचा नागरिकाने भरपूर मतदान केले आहे. तुम्ही मला केलेले मतदान व्यर्थ जाईल असं कधी वाटू देणार नाही.

आपण जे निवेदन आज देत आहे त्यावर मी लवकरात लवकर समाधान शोधून समस्येचं निवारण करणार आणि आपण सुद्धा आपल्या नगरपंचायत ला हिरवे गार नगरपंचायत करण्यासाठी एक पेड माँ के नाम अभियाना अंतर्गत सर्वांनी आपल्या घराजवळ आई साठी एक लाऊन पर्यावरण वाचविण्यासाठी प्रयत्न करावे" असे आवाहन गावातील नागरिकांना केले.



सोबतच गावाच्या सर्वांगीण विकासासाठी इथून पुढील काळात आणखी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जातील, हा विश्वास याप्रसंगी उपस्थितांना दिला. त्याच वेळी स्थानिक प्रधानमंत्री आवास योजनेचे रहिवासी रजत पराते यांनी प्रधानमंत्री आवास योजना साठी मुख्याधिकारी नगरपंचात बीडगाव आणि नागपूर सुधार प्राण्यास तथा नागपूर महानगर विकास प्राधिकरण यांच्या सोबत आपल्या प्रमुख उपस्थिति मध्ये बैठक आयोजित करावी अशी मागणी निवेदना मार्फत केली.

यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे पालकमंत्री नागपूर जिल्हा, भाजप नागपूर जिल्हा महामंत्री अनिल निधान, भाजप कामठी ग्रामीण मंडळ अध्यक्ष सचिन घोडमारे, संजय गांधी निराधार योजना समिती, कामठी येथील माजी अध्यक्ष रमेश चिकटे, माजी सरपंच बिडगाव निकेश कातुरे, माजी उपसरपंच संतोष तिजारे अध्यक्ष भाजप, करुणाताई कातुरे, गोपाल कुमेरीया, प्रदीप गावंडे, भारतीताई देवगडे, रामुजी भुरे, शिवपाल कातुरे, प्रवीण कातुरे, रजत पराते, प्रीतम बोकडे,योगेश येलचरवार, प्रदीप चौधरी, प्रमोद ठवरी, प्रशांत बोरकर, रवींद्र तायडे, नभा मन्ना, संजय बेलसरे, तसेच ग्रामस्थ, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# पुन्हा वाजली घंटा, ढोल- ताशाच्या गजरात गजबजल्या शाळा

## २ हजार विदयार्थ्यांनी दाखविले कवायतीतून प्रात्यक्षिके

■ महासागर प्रतिनिधी, काटोल , दि. २३ :

उन्हाळ्याची सुट्टी संपवून नव्या कोऱ्या वह्या-पाठ्यपुस्तके, कडक इस्त्री केलेला गणवेश आणि नवे बूट, खांद्यावर नवे दफ्तर घेत हजारो विद्यार्थ्यांनी लाखोटीया भुतडा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात पुन्हा नवीन सत्रातील पहिले पाऊल टाकले.



नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांचा गजर, एन सी सी पथकाचे मार्चपास, फुलांची उधळण, औक्षण करत शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. शाळांमध्ये विविध उपक्रमांद्वारे प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. राज्यातील विदर्भ प्रदेशात शालेय शिक्षणाचे २०२५-२६ हे शैक्षणिक वर्ष २३जून सोमवारपासून सुरू झाले. शालेय शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार शाळांमध्ये प्रवेशोत्सव-आनंदोत्सव जल्लोषात करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळांमध्ये फुलांची, रांगोळीच्या पायघड्या, विविध वेशभूषा फेटेधारी कार्यक्रमाचे वैभव वाढविणारे ठरले. नवप्रवेशित विद्यार्थ्यांना शाळेची आवड लागावी,त्यांची भीती घालवावी त्यांचा शाळेचा पहिला दिवस कायम आठवणीत राहावा, म्हणून शाळेनी वेगवेगळे उपक्रम राबवीत जंगी प्रवेशोत्सव साजरा केला. सुमारे 2हजार विद्यार्थ्यांची सामूहिक कवायत, वर्ग 5 ते 8 चे विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके वितरण, सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना लाडूंचे (खाऊ )वाटप याप्रसंगी करण्यात आले. प्रथम दिनी शेकडो पालकांनी कार्यक्रमाला उपस्थिती मुलांचा प्रवेशोत्सव आंनदोत्सव स्वतः बघितला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य सुधीर बुटे, प्रमुख पाहुणे व बक्षीस वितरक संस्थेचे उपाध्यक्ष रेखा राठी, प्रमुख उपस्थिती जि.प. सदस्य पुष्पाताई चापले, प.स सदस्य अरुण उईके,ज्येष्ठ पत्रकार ब्रिजेश तिवारी, सुरेंद्र भाजीखाये,माजी उपसरपंच स्वप्नील व्यास, संजय राऊत,शाहिद काजी,प्रमोद चापले, रणजित गायकवाड, शांतारामजी काळबांडे, प्रशांत गिरडकर,पठाण, उपमुख्याध्यापक कैलास थुल, पर्यवेक्षक मनोज ढाले,हरिष राठी, संजय आगरकर,प्रिया धारपुरे सर्व विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

प्राचार्य सुधीर बुटे म्हणाले, राज्यातील शाळांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आजपासून सुरू झाली आहे. त्यानुसार पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षणात क्रांतिकारी बदल होत आहेत. केवळ पाठांतरावर भर न देता, अनुभवावर आधारित शिक्षण दिले जाणार आहे. खेळ, गाणी, गोष्टी, कोडी, नाटक, चित्रकला, प्रकल्प यांचा शिक्षणात समावेश आदी उपक्रम विद्यालयात नवीन सत्रात नेहमी प्रमाणे होणार आहे.

विद्यार्थ्यांनी शिस्त अंगिकारल्यास विदयार्थ्यांचे यशस्वी व्यक्तिमत्व घडते असे मार्मिक विचार अध्यक्षीय मार्गदर्शनातून प्राचार्य सुधीर बुटे यांनी व्यक्त केले. स्वप्नील व्यास, सुरेंद्र भाजीखाये, पस सदस्य अरुण उईके, जिप सदस्य पुष्पाताई चापले,माजी मुख्याध्यापक शाहिद काजी यांनी विचार व्यक्त केले. संचलन सुनील सोलव तर आभार हरीश राठी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेकरिता लेझीम पथक कुंकूम तिलक मोहिनी भक्ते,भारती पिसे, रॅली संयोजक एनसीसी पथक ज्ञानेश्वर भक्ते, मनोज ढाले, सोनाली ठवळे, विद्यार्थ्यांना खाऊ वितरण श्यामसुंदर धिरण, ध्वनीक्षेपण बँड पथक व्यवस्था महेश मलवे, शुभम राऊत, सर्व शिक्षक व कर्मचारी वृंदाचे सहकार्य लाभले.

# मौदा तालुक्यात विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव संपन्न

■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. २३ :



आज नागपूर जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद आणि खाजगी अनुदानित शाळा सुरू झाल्या त्यानिमित्त अनेक शाळेत मोठ्या उत्साहात प्रवेशोत्सव संपन्न झाला मुलांचे पहिले पाऊल या कार्यक्रमांतर्गत अनेक शाळेत विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती होती मौदा तालुका पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी किरण चीनकुरे यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण तालुक्यातील शाळेत हा उत्सव साजरा करण्यात आला.

यानिमित्य उपविभागीय अधिकारी तहसीलदार खंडविकास अधिकारी आरोग्य अधिकारी आणि न्यायाधीश यांनी विविध शाळेला भेटी दिल्या तालुक्यातील खराडा पुनर्वसन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मौदा तहसीलदार दत्तात्रय निंबाळकर यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी ग्रामपंचायत सरपंच सदस्य व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

तालुक्यात सर्व केंद्रप्रमुख आपल्या केंद्र शाळेत उपस्थित होते पहिलाच दिवस असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह दिसून आला. सर्व शाळेत विद्यार्थ्यांना गोड जेवण देण्यात आले. असेच सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली.

# कळमेश्वरात न.प.विद्यालयात प्रवेशोउत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी, कळमेश्वर, दि. २३ :




येथील पीएमश्री नगरपरिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे नवीन शैक्षणिक वर्षानिमित्ताने शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यानिमित्ताने नवागत विद्यार्थ्यांचे फुलांनी स्वागत करण्यात आले .

तसेच सर्व विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे, पुस्तके, वही, गणवेश,शूज सॉक्स वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला शाळा शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष बबन भाऊ वानखेडे अध्यक्ष म्हणून तर शाळेच्या प्राचार्या श्रीमती पौर्णिमा मेश्राम, ब्रिजलाल रघुवंशी,पालक संघाच्या सहसचिव शिवानी इंगोले, सदस्य लक्ष्मी कटाई तसेचशाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्य पुनम आंबटकर , शाळेचे उपप्राचार्य दादाराव जांभरुणकर, शाळेचे पर्यवेक्षक बाबुराव राठोड आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी शाळेच्या प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना शिस्तीचे महत्व तसेच शाळेनी केलेली प्रगती याबद्दल मार्गदर्शन केले. शाळेचे माजी विद्यार्थी ब्रिजलाल रघुवंशी यांच्या कडून विद्यार्थ्यांना चित्रकला वही देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे संचालन सुरेखा धरपाळ तर आभार प्रीती बाळसकर यांनी मानले. यापसंगी पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक मनीषा नेरलवार, प्रीती गोडसे , सुमन सिंग विशाल साठवणे चावर्क खैरे उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीशभाऊ सौदागर यांना श्रद्धांजली देऊन करण्यात आली.

# ढोलताशांच्या गजरात श्री गजानन विद्यालयाचा प्रवेशोत्सव



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

श्री गजानन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नविन सुभेदार ले आऊट, नागपूर येथे विद्याथ्यार्चा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी शाळेने स्थापित श्री गजानन साम्राज्य ढोल ताशा पथकाचे वादन करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वारावर विद्याथ्यार्चे औक्षवाण करुन, पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. या प्रसंगी प्रमूख अतिथी म्हणून गिरीश व्यास (माजी विधानपरिषद सदस्य) उपस्थित होते. विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावावी हा संदेश दिला. कार्यक्रमांचे अध्यक्ष म्हणुन शाळेचे मुख्याध्यापक कमलाकर तंबाखे सर यांनी विद्याथ्यार्ना व शिक्षकांना नविन सत्राच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला उपमुख्याध्यापक मनोज अग्रवाल, पर्यवेक्षक पुरुषोत्तम कावटे उपस्थित होते.

# जसापूर शाळेत पेढे वाटून स्वागत



■ महासागर प्रतिनिधी, बेला, दि. २३ :

जवळच्या जसापूर येथील जि प प्राथमीक शाळेत मुला मुलींना पेढे भरवून स्वागत करण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून प्रवेशोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका अनिता मारचट्टीवार होत्या.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रवीण वैरागडे, उपाध्यक्ष मोरेश्वर अवचट, समाजसेवक व प्रतिष्ठित नागरिक जनार्दन सरकार, खोवेश काळे व अनेक गणमान्य नागरिक, पालक उपस्थित होते. अतिथींच्या हस्ते गणवेश व शालेय पुस्तकांचे वाटप करण्यात आले. उन्हाळी सुट्यात समर कॅम्प यशस्वी केल्याबद्दल खोवेश काळे यांचे सुरकार यांनी पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन स्वागत केले. गेल्या शैक्षणिक क्षेत्रात शाळेचा निकाल 90 टक्के लागला होता. तो यंदा 95% लावण्याचे उद्दिष्ट मुख्याध्यापिका मारचट्टीवार आपल्या भाषणातून व्यक्त केले. शकुंतला कुबडे यांनी विद्यार्थी व उपस्थितांचे आभार मानले.

# राज्यव्यापी सामाजिक न्याय दो अभियान

**नागपूर :** छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने २६ जून रोजी' 'सामाजिक न्याय दो' अभियाना अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून नारे- निदर्शन करण्यात येणार आहेत. आंबेडकरी महिला मोर्चाच्या जिल्हा अध्यक्ष अभियानाचे नेतृत्व करणार आहेत, असे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी माध्यमांना सांगितले. विशेष सामाजिक न्याय विभागात काम करणाऱ्या काही अधिकाऱ्यांना चांगली वागणूक देण्यात येत नसल्याचे आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या निदर्शनास आले आहे. ही गंभीर बाब लक्षात घेता राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी राज्यव्यापी आंदोलनाचे निर्देश दिले. पोलिस ठाण्यांत अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्यात यावी, या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार असून आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे जनसंपर्क प्रमुख डॉ. कृष्णा बेडसे तसेच महाराष्ट्र प्रदेश धुळे यांनी दिली आहे.

# नगर परिषद हायस्कूलच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे केले स्वागत

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. २३ :



पीएम श्री नगर परिषद हायस्कूल काटोल येथे आज दिनांक 23 जुन रोजी शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी नगरपरिषद कार्यालयाचे उपमुख्यअधिकारी उमेश हेंबाडे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य पंचशीला लोखंडे, दीपक जुननकर, शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप शेटे, शाळेचे पर्यवेक्षक प्रसन्नजीत मानकर, रूपाली मालोदे, योगिता महात्मे, डॉ. श्रीराम घाईट, मजहर मलनस, तुषार राठोड, सचिन वाळके, माया मसराम,गोविंदा बगवे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना सन्माननीय पाहुण्यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर आज शाळेचा पहिला दिवस असल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. तसेच इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण पहिल्याच दिवशी करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत झाला.

# तरुण पिढीने ड्रग्जचे नव्हे तर खेळाचे व्यसन लावावे

## ऑपरेशन थंडर अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:

अंमली पदार्थांच्या विरोधात समाजाला एकत्र आणण्यासाठी, आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी सप्ताहांतर्गत शहर पोलिसांकडून विविध कार्यक्रमांसह क्रीडा स्पर्धांचेही आयोजन केले जात आहे. शनिवारी वाडीमध्ये व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विशेष पोलिस महानिरीक्षक (एएनओ) संदीप पाटील, अंबाझरी ऑर्डिनंस फॅक्टरीचे महाव्यवस्थापक अयज तिरपुडे आणि सहायक पोलिस आयुक्त अशोक शेवाळे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ऑर्डिनंस फॅक्टरी डिफेंस टीम, वाडी पत्रकार संघ, जवाहरलाल नेहरू महाविद्यालय आणि वाडी पोलिस ठाण्याचे अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संयुक्त संघाने प्रतियोगितेत सहभाग घेतला. शेवटच्या सामन्यात ऑर्डिनंस फॅक्टरी संघाने वाडी पोलिसांचा दणदणीत पराभव करून पहिला क्रमांक पटकावला. पाहुण्यांकडून खेळाडूंना ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना आयजी पाटील म्हणाले की, तरुणांचे व्यसनाधिन होणे समाजासाठी चिंतेची बाब आहे. तरुणांना अंमली पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी प्रत्येक स्तरावर प्रयत्न झाले पाहिजे. त्यांना अंमली पदार्थांचे नाही तर खेळांचे व्यसन लागले पाहिजे. क्रीडा क्षेत्रात पुढे जाणारे तरुण शारीरिकच नाहीतर मानसिकदृष्ट्याही मजबूत होतात. पोलिस विभागाकडून अत्यंत कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले आहे. यामध्ये सर्व नागरिकांचे सहकार्य अपेक्षित आहे.

# कळमेश्वरात प्रताप माध्यमिक विद्यालयात प्रवेशोत्सव साजरा



■ महासागर प्रतिनिधी, कळमेश्वर, दि. २३ :

आज प्रताप माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मोठ्या हर्ष उल्हासाने विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचे प्रमुख अतिथी नि गेटवर फुलांचा वर्षाव करत त्यांना विविध साहित्य वाटप करत तीलक कुंकुम द्वारे विद्यार्थ्यांचे शाळेच्या परिसरात पहिल्या दिवशी प्रवेश मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रवीण राऊत, सरपंच सावळी बाळूभाऊ जाचक समाजसेवक, सुरेखा मोहनकर, शितल मोहनकर , रमेश मोहनकर, शीलाताई सुके कोषाध्यक्षा, प्रताप शिक्षण संस्था , मुख्याध्यापक प्रताप माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय प्रवीणकुमार श्रीखंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांना शालेय गणवेश ,पुस्तके वाटप करण्यात आली. शालेय पोषण आहारा अंतर्गत पुलाव, जिलेबीची मेजवानी विद्यार्थ्यांना देण्यात आली. याप्रसंगी सरपंच प्रवीण राऊत व बाळू जाचक यांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्टरित्या मार्गदर्शन केले मुख्याध्यापक प्रवीण कुमार श्रीखंडे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणात्मक मार्गदर्शन केले. सर्व शिक्षकांनी सहकार्य करत उत्कृष्टरित्या प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे संचालन जयश्रीताई सुके तसेच आभार ओमदेवी ठाकरे मॅडम यांनी मानले. याकरिता पृथ्वी चव्हाण सर व सागर देशमुख सरांनी विशेष सहकार्य करत शालेय परिसर उत्कृष्टरित्या शोभिवंत केले होता.

# राष्ट्रीय आदर्श विदयालय व कनिष्ठ महाविद्यालय तसेच प्राथमिक विभागात प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. २३ :



रामटेक -राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तसेच राष्ट्रीय आदर्श प्राथमिक विभाग रामटेक येथे शाळेचा पहिला दिवस शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सर्व विद्यार्थी विद्याथीनींना कुंकूम तिलक करून फुगे, चॉकलेट, गुलाबपुष्प देऊन गुलाब पुष्पाची वृष्टी करून तसेच फटाक्यांच्या आतिषबाजीत बँड पथकाच्या सुमधुर ध्वनीत स्वागत करण्यात आले. यावेळी शाळा ते गांधी चौकापर्यंत प्रभातफेरी काढण्यात आली. मुलामुलींनी महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. मुलामुलींनी दिलेल्या घोषनांनी परिसर दुमदुमून गेला.सरस्वतीच्या प्रतिमेला मल्यार्पण व दिपप्रज्वलन करून विदयार्थ्यांनी प्रार्थना केली.

वर्ग २ ते ८ च्या शालेय विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. प्राचार्य राजु बर्वे, मुख्याध्यापक निलेश टोंगसे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक शैलेश परमार,संजीव दयार्पूरकर, पराग तळेगावकर, पुष्पराज बावने, विठ्ठल वाघाडे, रंगराव पाटील, वेदप्रकाश मोकद्दम, संजय पिसे, अरविंद कोहळे, राजेश भोतमांगे, सुनील सेलोकर, मनोहर महाजन, नरेंद्र माकडे, सौ संध्या महाजन, अशोक खंडाईत, संजय उईके, संगीता सोनवाने, नरेश रुखमोडे, गीता चामट, श्रीकांत येरपुडे, हिरु लांजेवार, कमलेश सहारे, जगदीश गुजरकर, सौ अंजुषा उजवणे, श्याम टाले, दीप्ती मारोतकर,दिलीप जांभुळे, सौ प्रियंका हांडे, सुहास महाजन,अनिता देशमुख, सौ. दुर्गा भोंगाडे, रोशनी सावरकर, मीना लंघे, विजयचंद्र पाटील, मानसिंग कोवाचे, हरीश जुनणकर, नामदेव खडसे, दिलीप गराडे, राजु नान्हे आर्दीनी प्रयत्न केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार आनंदराव देशमुख, उपाध्यक्ष डॉ. कमलाकर लेंडे, सचिव मयंक देशमुख, सहसचिव नारायणराव देशमुख, कोशाध्यक्ष अंशुल देशमुख,सदस्य शामराव सेलोकर, नीलकंठ महाजन, जयश्री रागीट, घनश्याम बर्वे, होमराज हजारे आर्दीनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# विजेच्या धक्क्याने मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

वाळायला घातलेले कपडे काढत असताना विजेच्या तारांना स्पर्श झाल्याने एका व्यक्तीला विजेचा जबर धक्का बसला. गंभीररित्या होरपळून उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. अमोल भगवान बगमारे (40) रा. अंबेनगर, भांडेवाडी असे मृताचे नाव आहे. शनिवारी रात्री 12.20 वाजताच्या सुमारास अमोल छतावर वाळायला घातलेले कपडे काढण्यासाठी गेले होते. या दरम्यान विद्युत वाहिनीच्या संपर्कात आल्याने त्यांना विजेचा जबर धक्का बसला. ते बेशुद्ध होऊन खाली कोसळले.

# जिल्ह्यातील शिक्षक निवड वेतनश्रेणी पासून वंचित

## अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २३ :

राज्यातील प्राथमिक माध्यमिक व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील प्राथमिक शिक्षकांना दिनांक ०१/०१/१९८६ पासून चट्टोपाध्याय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार त्रिस्तरीय वेतन श्रेणी लागू करण्यात आली आहे. चटोपाध्याय आयोगाच्या शिफारशीनुसार १२ वर्षाच्या अर्हताकारी सलग सेवेनंतर वरिष्ठ श्रेणी व वरिष्ठ श्रेणीतील १२ वर्षाच्या अर्हताकारी सलग सेवेनंतर म्हणजेच सलग २४ वर्षाच्या अर्हताकारी सलग सेवेनंतर निवड वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे.परंतू जिल्ह्यातील ७ ऑगस्ट१९९२ पासून नियुक्त शिक्षकांना व त्यापूर्वीच्याही काही शिक्षकांना नागपूर जिल्हा परिषदेच्या लेटलतीफ कारभारामुळे अद्याप निवडश्रेणी लागू झालेली नाही, यासंदर्भात अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाकडून मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. ३ मार्च २०२५ रोजी नागपूर जिल्हा परिषदने एक पत्र काढून जिल्ह्यातील शिक्षकांना निवड श्रेणी लागू करण्यासाठी शिक्षकांची माहिती सादर करण्याचे आदेश सर्व गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आले होते. परंतू शिक्षण विभागाच्या दप्तर दिरंगाईमुळे सलग २४ वर्ष सेवा झालेल्या पात्र शिक्षकांना अद्याप निवडश्रेणी आदेश पारित होऊ शकले नाही. यासंदर्भात तातडीने कार्यवाही करून जिल्ह्यातील पात्र शिक्षकांना निवड श्रेणी व वरिष्ठ श्रेणी लागू करण्याची मागणी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा अध्यक्ष धनराज बोडे, सरचिटणीस वीरेंद्र वाघमारे, रामू गोतमारे, शिवानंद सहारकर,आनंद गिरडकर,गजेंद्र कोल्हे,दिलीप जिभकाटे, संजय चामट, प्रकाश बांबल, लोकेश सुर्यवंशी, अशोक डोंगरे, आशा झिल्पे ,सिंधू टीपरे,उमेश आष्टणकर,अरविंद लोही, महेंद्र साव आदिनी केली आहे.


## जाहिरनामा/ सायटेशन नोटीस

कोर्ट विद्यवान सह दिवाणी न्यायाधिश क, स्तर, कामठी यांचे न्यायालय, कामठी, जि. नागपूर

एम.जे.सी. नं.४८/२०२५ पे.ता.: २२/०७/२०२५

प्रोसेस नं. ७५५/२०२५ (२३/०६/२०२५)

Applicants : 1. Shankar S/o Ganesh Kanojiya, Aged 22 Years, Occu. Student, R/o. Near Runa Bakery, Kolsatal kamptee tah. Kamptee Dist. Nagpur. Maharashtra-441002. 2. Monish S/o Ganesh Kanojiya, Aged 25 Years, Occu. Service, R/o. Near Runa Bakery, Kolsatal kamptee tah. Kamptee Dist. Nagpur. Maharashtra-441002. 3. Ku.Vaishnavi D/o Ganesh Kanojiya, Aged 26 Years, Occu. Nil R/o. Near Runa Bakery, Kolsatal kamptee tah. Kamptee Dist. Nagpur. Maharashtra-441002. 4. Shobha Wd/o Ganesh Kanojiya, Aged 49 Years, Occu. Housewife, R/o. Near Runa Bakery, Kolsatal kamptee tah. Kamptee Dist. Nagpur. Maharashtra-441002. 5. Ramesh S/o Pancham Kanojiya, Aged 63 Years, Occu. Nil R/o. Near Gramphanchayat, Dattatray Nagar, Ranola, Kamptee Nagpur. Maharashtra-441002.

---- V/S ----

Non applicant :- NIL

मयत: – Late Ashok S/o Pacham Kanojiya, मयत दि २३/०४/२०२०, ठिकान कोलसरातल कामठी तह, कामठी. Late Ganesh S/o Pacham Kanojiya, मयत दि.१०/१२/२०२२. ठिकाण गर्वगेट मेडीकल कॉलेज हॉस्पीटल

सदरहु अर्जदाराने वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Ashok S/o Pacham Kanojiya, मयत दि. २३/०४/२०२०, Late Ganesh S/o Pacham Kanojiya, मयत दि.१०/१२/२०२२ यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांनी दि.२२/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती ककळवाव्या आणि हया लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहू मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत या उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराना Late Ashok S/o Pacham Kanojiya, Late Ganesh S/o Pacham Kanojiya, यांचे वारसान प्रमाणपत्र मजुर करण्यात येईल याची नोद घ्यावी.

आज दिनाक / / २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिव्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## जाहिरनामा

कोर्ट विद्यमान २रे सह दिवाणी न्यायाधिश क, स्तर, कामठी यांचे न्यायालय, कामठी, जि. नागपुर

एम.जे.सी. नं. ३९/२०२५ पे. ता. : २१/०६/२०२५

प्रोसेस नं. ६६८/२०२५ (दि. १३/०६/२०२५)

Applicants :- 1) Rajesh Rameshwar Pali Age about 50
2) Vijay Rameshwar Pali Age 47 yrs
All R/o Suresh Nagar Khanan, P. S. Khanan Tah Parshioni, Dist. Nagpur.

--- V/S ---

Non applicant :- Nil

सदरहु अर्जदारांनी Late. Rameshwar Sahadeo Pali यांचा मृत्यु दिनांक ११.०८.२०२३ रोजी झाली असुन यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख मानिनय कोर्ट विद्यमान २ रे सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांनी दि. २२/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत या उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारांना Late. Rameshwar Sahadeo Pali यांचा वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिला.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

# शाळा प्रवेशोत्सव आणि नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

## विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २३ :



द्रुगधामना येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शाळा प्रवेशोत्सव आणि नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत सोहळा सरपंच मंगला रागीट यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, शिक्षणाधिकारी निखिल भुयारी उपायुक्त कमलकिशोर फुटाणे,आयएएस अधिकारी कुश मोखानी, आयएएस अधिकारी साई किरण, तहसीलदार नागपूर ( ग्रामीण ) टेळे, गटविकास अधिकारी सचिन सूर्यवंशी, शिक्षणाधिकारी पवन खंदारे, गटशिक्षणाधिकारी आरती साळुंके, शिक्षण विस्तार अधिकारी आगरकर व कोकडे, केंद्रप्रमुख श्यामसुंदर शेंबेकर, उपसरपंच बंडूभाऊ गजभिये, ग्राम पंचायत अधिकारी शिल्पाताई काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने सजवलेल्या बैलगाडीवरून विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढून झाली. या वेळी मुलींचे लेझिम पथक व तालावर टाळकरी महिला मंडळ भजन म्हणत सहभाग घेत होते. पाहुण्यांचे स्वागत नाचत-गात करण्यात आले. सर्वप्रथम क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रिजवाना शेख यांनी केले. संचालन शिक्षिका मंजुषा काकडे यांनी आभार जेष्ठ शिक्षिका मालती बोरकर, शिक्षक रूपेश चौरे यांनी मानले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अर्जुन इटकर, माजी पं.स.सभापती रेखाताई वरठी, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्यात इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. तसेच मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट व मोज्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते आरोग्य शिबिराचे उद्घाटन आणि अंगणवाडी तसेच परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शिक्षकवर्ग, ग्रामपंचायत व गावकऱ्यांनी सहकार्य केले.

# "३६५" पुस्तकाचे प्रकाशन



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २३ :

साहित्यविश्वात एक नवा सोनेरी अध्याय जोडला गेला, जेव्हा बहुप्रतिक्षित "३६५ डिग्री" या पुस्तकाचा भव्य प्रकाशन सोहळा नागपूर येथील चिटणवीस सेंटरच्या मेमोसा हॉलमध्ये पार पडला. हा कार्यक्रम ग्लोबल जर्नलिस्ट अॅण्ड रायटर्स असोसिएशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या पुस्तकाचे लेखक संजय अग्रवाल हे एक विचारवंत, चिंतक आणि भारतीय राजस्व सेवाचे वरिष्ठ अधिकारी आहेत. पुस्तकाचे प्रकाशन अरायझिंग मीडिया अॅण्ड एंटरटेनमेंट नेटवर्क यांनी केले आहे. ही कृति केवळ दैनंदिन जीवनातील अनुभवांना लेखकीय दृष्टीकोनातून मांडते असे नाही, तर ती वाचकाला आत्मपरीक्षण आणि प्रेरणेच्या दिशेनेही घेऊन जाते.

या भव्य प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ चार्टर्ड अकाउंटंट आणि विचारवंत हेमंत लोढा होते. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ लेखक राजेंद्र चांदोरकर, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक डॉ. विनोद आसूदानी, ज्येष्ठ सीए व बुद्धिवंत डॉ. तेजिंदर सिंग रावल आणि शालिनी अग्रवाल मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन वसंत पारधी यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रवीण डबली यांनी केले.

विमोचन प्रसंगी सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतात लेखक संजय अग्रवाल यांच्या कार्याचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यांनी पुस्तकाच्या शीर्षक '३६५' विषयी आपल्या-आपल्या पद्धतीने अत्यंत रोचक भाष्य केले. त्यांच्या म्हणण्यानुसार '३६५°' हे केवळ वर्षातील ३६५ दिवसांचे प्रतीक नाही, तर ते संपूर्णतेचे प्रतीक असलेल्या ३६०° च्या पलीकडे जाऊन, नव्या दिशेचा शोध घेण्याची प्रेरणा देते. लेखकाच्या सून अपूर्वा अग्रवाल यांनीही या पुस्तकाची तुलना आधुनिक गीतेशी केली.

लेखक संजय अग्रवाल यांनी सांगितले, "३६५ डिग्री हे एक असे प्रयत्न आहे ज्यात दररोजचे अनुभव, संघर्ष, यश आणि आत्मपरीक्षणाचे ३६५ रंग टिपण्याचा प्रयत्न केला आहे. हे पुस्तक वाचकाला स्वतःच्या आत डोकावण्यास आणि सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारण्यास प्रेरणा देते." या कार्यक्रमाला नागपूर तसेच इतर शहरांतील लेखक, बुद्धिजीवी आणि वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. विजयकुमार शर्मा, जगदीश गुप्ता, डॉ. बी.के. शर्मा छंगाणी, अजय अग्रवाल, नवीन अग्रवाल, ज्ञानेश्वर ठाकरे, सूरज तेलंग, आर.के. गणेरिवाला, टी.एस. भाल, शरद खंडेलवाल, आशीष तायल, डॉ. प्रवीण वराडकर, डॉ. योगेंद्र अग्रवाल, उषा अग्रवाल, बीनामॅथ्यू, मिली विक्रमशी, ललित विक्रमशी, डॉ. विजय द्विवेदी, विनय राजगिरे, डॉ. ऋषी अग्रवाल, भुवनेश जोशी, नवनीत सकारिया, सौरभ सिंह इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संपर्क व संवाद समूहाच्या सर्व सदस्यांनी उत्साहाने योगदान दिले. त्यामध्ये रविकांत साने, अनंग कावळे, रोहित कोठारी, वंश पारधी, वंशज तायल, अथर्व राजगिरे आणि आकाश कुरहेकर यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे.

कार्यक्रमाच्या समारोपाला आयोजकांनी सर्व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. हा कार्यक्रम केवळ एक पुस्तकप्रकाशन नव्हते, तर एक सर्जनशील विचारयात्रेची सुरुवात ठरली.

## तोतया पोलिसांनी निवृत्त पोलिसाला लुटले

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २३ :

तोतया पोलिसांनी एका सेवानिवृत्त पोलिसालाच लुटपाटची भीती दाखवून लुटले. ही आश्चर्यजनक घटना मानेवाडा रोडवर रविवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी अजनी पोलिसांनी दशरथ धोंडबाजी बरघट (75) रा. न्यू कैलाशनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. दशरथ हे पोलिस खात्यात कार्यरत होते. सहायक उपनिरीक्षक पदावरून ते सेवानिवृत्त झाले आहेत. नेहमीप्रमाणे रविवारी सकाळी ते मॉनिंग वॉकसाठी घरून निघाले होते. सकाळी 8 वाजताच्या सुमारास घरी परत जात असताना वेणू कॉर्नर नावाच्या रेस्टॉरेंटजवळ ते थांबले होते. या दरम्यान दोन आरोपी त्यांच्याजवळ आले. त्यांनी पोलिस कर्मचारी असल्याची बतावणी करीत परिसरात चोरी आणि लुटपाटची घटना घडल्याची माहिती दिली.

दशरथ यांनी त्यांची दोन तोळ्यांची चेन आणि एक तोळ्याची अंगठी काढलीच होती की, आरोपींनी दोन्ही वस्तू हिसकावून घेतल्या आणि फरार झाले.

# खा. श्यामकुमार बर्वे यांनी घेतला खरीप पूर्व नियोजन आढावा

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. २३ :



पारशिवनी तालुक्यातील खरीप हंगाम पूर्व नियोजनाविषयी शनिवारी कृषी विभागाचे क्षेत्रीय मुख्यालय निलज शिवारात खा.श्री श्याम कुमार बर्वे यांनी आढावा घेतला. कृषी विभागाने जागरूक राहून शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारची बियाणे खरेदी तसेच खताची टंचाई निर्माण होऊ नये आणि शेतकरी हितासाठी दक्ष राहण्याबाबत खा. श्याम कुमार बर्वे यांनी सुचित केले.

यावेळी तालुका कृषी अधिकारी पारशिवनी राकेश वसु यांनी खरीप मोहिमेविषयी माहिती देताना सध्या कृषी केंद्रावर कृषी विभागाची बारीक नजर असून कुठेही शेतकरी बांधवांची फसवणूक होऊ नये या दृष्टीकोनातून बियाण्यांचे सॅम्पल, तसेच दुकानातील स्टॉक रजिस्टर, इत्यादी तपासून, खताचा देखील तुटवडा भासू नये याबाबत सुद्धा काळजी घेतल्याचे चर्चेत नमूद केले, खरीप मोहिम अंतर्गत कृषी विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या बीज प्रक्रिया, मृदा नमुने, व प्रात्यक्षिकाद्वारे विविध तंत्रज्ञानाबाबत प्रचार प्रसिद्धीसाठी अधिनस्त कार्यरत मंडळ कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, यांना सजग राहण्याबाबत सुचित केले आहे.

क्षेत्रीय भेटी दरम्यान यावेळी उप कृषी अधिकारी, एसपी कुबडे, प्रकल्प समन्वयक आत्मा प्रमोद सोमकुवर, स्थानिक सहाय्यक कृषी अधिकारी विवेकानंद शिंदे यांनी यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांना कृषी विभागाच्या विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी अॅग्री स्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडी काढण्याच्या आवाहन केले, तसेच यावेळी खा. श्याम कुमारजी बर्वे यांनी शेतकरी बांधवांना खरीप हंगामाच्या शुभेच्छा दिल्या. उपस्थित मान्यवरांचे व अधिकाऱ्यांचे, शेतकरी बांधवांचे आभार माजी सरपंच हेमंत नागपुरे, यांनी मानले.

## ५.१३ लाखांच्या मालावर डल्ला

**नागपूर :** कुटुंब पहिल्या माळ्यावर झोपले असल्याची संधी साधत अज्ञात आरोपीने घरफोडी करून रोकड आणि दागिन्यांसह एकूण 5 लाख 13 हजार रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला. ही घटना हिंगणा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी सुनील ओमप्रकाश द्वावेदी (41) रा. संदेश सिटी, जामठाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

शुक्रवारी रात्री 11.30 वाजताच्या सुमारास सुनील घराच्या तळ माळ्याचे दार बंद करून पहिल्या माळ्यावर झोपायला गेले होते. मध्यरात्रीनंतर अज्ञात आरोपीने घराच्या मागच्या बाजूला असलेल्या स्वयंपाक खोलीच्या दाराचा कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. तळ माळ्यावर असलेल्या बेडरूमच्या कपाटातून रोख 1.25 लाख, घड्याळ आणि सोन्याचे दागिने असा एकूण 5.13 लाख रुपये किंमतीचा माल चोरून नेला. सकाळी 6.30 वाजताच्या सुमारास द्विवेदी कुटुंबाची झोप उघडली असता चोरी झाल्याचे समजले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. हिंगणा पोलिस घटनास्थळी पोहोचले. अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## एकाच दिवशी ५ दुकानांचे कुलूप तोडले

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २३ :

इतवारीच्या भारत माता चौक परिसरात शनिवारी रात्री चोरांनी धुडगूस घातला. एकानंतरएक 4 दुकानांचे कुलूप तोडले. एका दुकानातून मोठी रक्कम चोरांच्या हाती लागली, तर इतर चार दुकानांमधून किरकोळ रक्कम हाती लागली. मात्र या घटनांनी परिसरातील व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. व्यापाऱ्यांनी परिसरात पोलिसांची गस्त होत नसल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी भजनलाल बिकोमल छाबरिया (47) रा. जरीपटकाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. भजनलाल यांचे भारतमाता चौकाजवळ बाजीराव गल्लीत सतनाम टेक्सटाईल नावाने दुकान आहे. त्यांच्या शेजारीच अनिल हरीलाल कृपलानी यांची शिवभोले टेक्सटाईल, सुरेश अर्जुनदास सेवलानी यांचे निशा साडी फॉल सेंटर, हितेश हरीश ज्ञानचंदानी यांचे जॉय कलेक्शन आणि चंद्रभान विजय विरानी यांची गुरू हरकिशन टेक्सटाईल नावाने दुकान आहे. रात्री 10 वाजताच्या सुमारास सर्व व्यापारी आप-आपली दुकान बंद करून घरी गेले होते. मध्यरात्रीला अज्ञात आरोपींनी छाबरिया यांच्या सतनाम टेक्सटाईलच्या शटर मध्यभागातून उचकवून आत प्रवेश केला. दुकानाच्या गल्ल्यात ठेवलेली 1.40 लाखांची रोकड चोरी केली.

निधन

## प्रमिला मेश्राम



■ महासागर प्रतिनिधी,
कामठी, दि. २३ :

अविनाश हायस्कुलचे संचालक सदानंद मेश्राम त्याचप्रमाणे भारतीय जनता पक्षाचे नेते पुष्पराज मेश्राम यांच्या मातोश्री प्रमिलाताई यादवराव जी मेश्राम यांचे आज सकाळी ११,३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा त्यांचे रहाते घरी मोदी पडाव येथुन सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास नविन मोक्ष धाम आजनि रोड येथे नेण्यात आली. त्यांचे अंत्ययात्रेत बराच जन समुदाय होता.

# व्यवस्थित माहीती घेऊन कोर्सेसची निवड करा : डॉ. गणेश अखाडे

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. २३ :



१०-१२ वी नंतर योग्य माहिती घेऊनच कोर्सेस व शाखेची निवड करा, जेणेकरून तुम्ही योग्य शिक्षण घेऊन रोजगार मिळवू शकता असे प्रतिपादन रायसोनी पॉलिटेक्निक कॉलेजचे डीन डॉ. गणेश अखाडे यांनी केले. डिंगडोह एमआयडीसी परिसरातील १० आणि १२ वीच्या परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा संभाजी सेवाभावी संस्था व रायसोनी कॉलेज च्या वतीने सत्कार समारंभ कॉलेज च्या सभागृहात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला करियर काउंसीलर रोहन टांकसाळे, रायसोनी पॉलिटेक्निकचे डॉ. गणेश आखाडे,माजी जिल्हा परिषद सदस्य अंबादास उके, संभाजी सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सुरेश काळबांडे, मेडिकल असोसिएशनचे बबन पडोळे,माजी सरपंच इंद्रायणी काळबांडे, माजी उपसरपंच किशोर पाटील,सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब वाघमारे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते कला, क्रीडा, व्यवसाय, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर १० आणि १२ वी च्या परीक्षेत गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व करियर मार्गदर्शन पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. २०० विद्यार्थी व पालक या कार्यक्रमाला उपस्थित होते. संचालन कल्यानी काळबांडे यांनी केले. आयोजनाकरिता राकेश उमाळे, राजेश उपाध्याय, वैशाली नारखेडे, मनिषा पाटील, राणे यांनी परिश्रम घेतले.

# वाडी पीएम श्री जि. प. उच्च प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २३ :




येथील पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात पंचायत समितीच्या ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मंगला गजभिये यांच्या हस्ते प्रभात फेरीने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वाटप करण्यात आले. तसेच पहिले पाऊल उपक्रमांतर्गत नवागत विद्यार्थ्यांच्या पायांचे ठसे घेण्यात आले. आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतीक्षा फाटे, शिक्षिका ललिता गोंडचर, योगिता गुप्ता,शिक्षक रुपेश भोयर, साहेबराव मोहरे यांनी सहकार्य केले. यावेळी पालक प्रतिनिधी व व्यवस्थापन समितीचे सदस्य काजल वाघमारे, रूपा सिंग, प्रतिभा फाये, वैशाली गायकवाड, ममता सहारे, सनी सहारे, सतीश बडोले, नीतू सोनवणे, सोनाली गवारे, आयुब बेग उपस्थित होते.

# रस्त्यावर अतिक्रमण करून गावकऱ्यांचा अडविला रस्ता

## परसोडी राऊत येथील प्रकरण

■ महासागर प्रतिनिधी,
काटोल, दि. २३ :



नरखेड तालुक्यातील परसोडी राऊत येथे १९९० मध्ये शासनाद्वारे एका शेतकऱ्याची जमीन अधिग्रहण करून शासनाने त्याठिकाणी प्लॉट पाडले. सध्या येथील सर्वच नवीन प्लॉटवर नागरिकांनी घराचे पक्के बांधकाम केलेले आहे. सध्या गावकरी येथे वास्तव्याला आहे. या प्लॉट पैकी प्लॉट क्रमांक ०१ ते ०९ या ओळींमध्ये अर्ध्यापर्यंतच रस्त्याचे बांधकाम झालेले असुन. येथील नागरिकांना मुख्य रस्तापर्यंत येण्या जाण्यास व वहिवाटीस अडचण निर्माण करण्यात आली आहे गावातील किशोर तेजराव राऊत आणि राजेंद्र तेजराव राऊत या दोन भावांनी मुख्य रस्त्यावर अतिक्रमण करून प्लॉटधारक क्रमांक एक ते नऊ अशा लोकांचा रस्ता अडविला आहे. त्यामुळे येथे पक्का रस्ता होण्यास अडथळा निर्माण केलेला आहे.

किशोर राऊत आणि राजेंद्र राऊत हे दोन्ही भाऊ गुंडगिरी करून हा रस्ता होण्यापासून अडवीत आहे. आणि ही जागा आमचीच आहे असा तोरा गावकऱ्यांना दाखवत आहे. गेल्या ३५ वर्षांपासून परसोडी (राऊत) येथील गावकरी आपल्या मूलभूत अधिकारापासून वंचित आहे. पावसाळ्यात या लोकांना रस्त्यावरील चिखलामुळे आपल्या घरापर्यंत पोहोचता येत नाही. अनेक लोकांच्या गाड्या घसरून अपघात होतात. तरी ग्रामपंचायंत प्रशासन गप्प बसलेले आहे. ग्रामपंचायतीची या गुंड भावांच्या कृत्याला एकप्रकारे मूक संमतीच आहे. त्यामुळे गेल्या ३५ वर्षांपासून परसोडी (राऊत) येथील ग्रामस्थ रस्त्याअभावी नरक यातना भोगत आहे.

०६ जून रोजी सर्व गावकऱ्यांनी आमदार चरणसिंग ठाकूर साहेब यांना याबाबतचे निवेदन दिले. तसेच उपविभागीय अधिकारी पियुष चिवंडे काटोल आणि तहसीलदार नरखेड यांनाही निवेदन दिलेले आहे. परंतु राजकीय दबावामुळे अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तरी परसोडी गावकऱ्यांची रस्त्याची समस्या सोडवली नसल्यास सर्व गावकरी नरखेड येथील तहसील कार्यालयात उपोषणाला बसतील असा संकल्प परसोडी (राऊत) येथील सर्व ग्रामस्थांनी केलेला आहे.

# कन्हान परिसरात जागतिक योग दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. २३ :



कन्हान परिसरात ठिकठिकाणी विविध संघटने द्वारे जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला. चेतनात्मक ध्यान योग केंद्र कन्हान व्दारे कालरा सेलिब्रेशन लॉन कन्हान येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस थाटात साजरा करण्यात आला . दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा शनिवार (दि.२१) जून ला चेतनात्मक ध्यान योग केंद्र कन्हान व्दारे कॉलरा सेलिब्रेशन लॉन कन्हान येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस कार्यक्रम प्रमुख अतिथी श्रीकृष्ण जामो दकर, एन. एस. मालविये, योग गुरू मधुकरजी धोपाडे हयाचे पुष्पगुच्छाने स्वागत करून थाटात साजरा करण्यात आला. यावेळी वरिष्ठ योग गुरू मधुकरजी धोपाडे हयांनी सर्वांना मार्गदर्शन केले.

मधुकर धोपाडे गुरूजी हे गेल्या २३ वर्षांपासुन कॉलरा सेलिब्रेशन लॉन येथे निशुल्क योग प्रशिक्षण देत आहे . कार्यक्रमाचे संचालन संस्थेच्या अध्यक्षा आशा खंडेलवाल हयांनी केले . कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता छाया नाईक, सविता मोहनकर, अनुराधा कालरा, सुनिता ठाकरे, तेजस्विनी बेलसरे, प्रमिला दुबे, कलावती डांगे, सीमा शेळके, जयश्री मेश्राम , सुगंधाबाई काहळकर , रंजना इंगोले, मनिषा धुडस, मिलिंद मेश्राम, दिलीप ठाकरे, संतोष यादव, सुप्रित बावणे, सुरेश दुबे, पुंडलिक नागपुरे आदीनी सहकार्य केले.

कन्हान शहरातील तारसा रोड येथील कृष्णराव लॉन येथे सुख-शांती- समाधान संस्था शाखा कन्हान व्दारे भव्य आंतरराष्ट्रीय योग दिन थाटात साजरा करण्यात आला . योग दिनाच्या कार्यक्रमाचा कन्हान शहरातील बहुसंख्य नागरिकांनी उपस्थित राहुन लाभ घेतला. शनिवार (दि.२१) जुन रोजी आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्य कृष्णराव लॉन येथे सुख, शांती, समाधान संस्था शाखा कन्हान व्दारे कार्यक्रमाचे आयोजन करून पहाटे सकाळी ५.३० वाजता प्रमुख अतिथी संजय गोयल, रामदासजी पोपळकर, शैलेंद्र गेडाम (पंतजली योग पिट), घारपिंडे बाबा आदींच्या हस्ते दीप प्रज्वलित करून प्राथन, संधी संचालन व स्वागत गित गायत्री मंत्राने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. योगा नुत्य योगासन आणि अनुभवाचा सराव सुंदर पध्दतीने करण्यात आला. नियमित पहाटे सकाळी ५.३० ते सकाळी ७ वाजे पर्यंत योगा अभ्यास केल्याने बीपी, सुगर, गुडघे दुखी, गॅस, पोटदुखी, तणाव, चिडचिडपन आणि आणि इतर आजार सुध्दा बरे होऊन आरोग्य चांगले झाल्याचे नियमित योग करणाऱ्या नागरिकांनी आपले अनुभव व्यकत केले.

यावेळी मान्यवरांनी उपस्थित महिला पुरूष नागरिकांना योग अभ्यास लाभा विषयी मार्गदर्शन केले. सुख-शांती- समाधान संस्थेचे अध्यक्ष सचिन माथुरकर सर यांनी मार्गदर्शन करून आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या हस्ते नियमित योग अभ्यास करणाऱ्यांना योग पुस्तक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच कार्यक्रमास उपस्थित २५० नागरिकांना योग चार्ट वाटप करून आंतरराष्ट्रीय योग दिन थाटात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता मिलींद पोपळकर, ओमप्रकाश (महेश) काकडे, जितेंद्र चौधरी, शेखर ठवकर, शांताराम जळते सर, संदीप माहुलकर, राजा संभोजी, पंकज रामटेके, लताताई जळते मॅडम, मुक्ताताई ठाकरे, संगिताताई नाटकर , आशााई भोमले, रिनाताई चौबे, मालतीताई पोपळकर, मिनाताई रामटेके, मिनाताइ कुंभलकर, प्रमिलाताई वहीकर आदी सह नियमित योग करण्याऱ्या महिला , पुरूषांनी सहकार्य केले.

भारतीय जनता पार्टी कांद्री शहर द्वारे योग शिक्षक किशोर गाडगे यांच्या उपस्थितीत योग दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला . शरीर व मन बळकट करण्यासाठी, उत्तम आरोग्य राखण्यासाठी, तणावमुक्त जीवन जगण्यासाठी आणि जीवनशैली सुधारण्यासाठी योग हा प्रभावी मार्ग असल्याचे मत पाहुण्यांनी व्यक्त केले. अभिजीत चांदूरकर प्रशिक्षण केंद्र यांचा सह गोंडेगाव चे विद्याथीर्ही कार्यक्रमात सहभागी झाले होते.

या प्रसंगी भाजपा नागपूर ग्रामीण जिल्ह्याचे मंत्री अतुल हजारे, शिवा चकोले गुरुदेव चकोले, संजय चोपकर, देवेंद्र सेंगर, अरुणा हजारे, वंदना गाडे, रोहित चकोले, गुरुदेव चकोले , अमिष रुंगे, रोहित चकोले, सुरेंद्र चटप, पराग पोटभरे, आरती चकोले, दिनेश चकोले, चंद्रकांत बावने, वामन देशमुख, चंद्रभान प्रजापती, दिलीप नायक, सुनिल चिंचुळकर, गणेश हूड, शिववान प्रजापती , भुपेंद्र पवार, श्री हजारें, वशिष्ठ यादव , दिनेश खाडे प्रामुख्याने उपस्थित होते.

कन्हान परिसरातील फोरलेन वर योग गुरु शिक्षक वीरेंद्र चौहान यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला. यावेळी नितु तिवारी , वैशाली थोरात , शोभा तांडेकर, प्रीती तांडेकर, प्रतिभा इंगोले, मंगला मेश्राम, महक गोंडवाना, अलका कविता, अस्तुर्णी केला, उषा गोडवाना, पिंकी सह आदि महिलांनी योग दिनात उत्साहाने सहभाग घेतला. योग गुरु विरेंद्र चौहान आणि राजेश यांनी निरोगी राहण्याचे फायदे, जीवनशैलीत स्वतःला कसे निरोगी ठेवावे आणि निरोगी कसे राहावे याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमात योग गुरुजींचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार आणि सन्मान करण्यात आला. समाजसेविका नीतू तिवारी यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

कन्हान प्राथमिक आरोग्य केंन्द्र येथे जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला . योग शिक्षक लताताई दुधवडे यांचा द्वारे योग प्रशिक्षण सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना देण्यात आले. कोणत्या योग प्रकारामुळे शरीराला कोणता फायदा होतो.

# सुट्टीनंतर मनपाच्या शाळांमध्ये पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचा किलबिलाट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :

उन्हाळ्याच्या सुट्यानंतर सोमवार २३ जूनपासून नागपूर महानगरपालिकेच्या सर्व शाळामध्ये पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचा किलबिलाट पहायला मिळाला. शाळेच्या पहिल्याच दिवशी प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थांवर पुष्पवर्षाव करीत चॉकलेट, पुस्तके आणि इतर वस्तूंच्या भेटीमुळे विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने फुलले. मा. आमदार कृष्णा खोपडे यांनी पारडी मराठी उच्च माध्यमिक शाळेत,आमदार विकास ठाकरे यांनी प्रियदर्शनी उच्च प्राथमिक शाळा आणि सुरेंद्रगड हिंदी शाळेत आणि मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी डिप्टी सिग्नल येथील पीएम श्री संजयनगर हिंदी उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या प्रवेशोत्सव कार्यक्रमात भाग घेत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.विविध मान्यवरांच्या हस्ते हस्ते मनपाच्या विद्यार्थांना शालेय साहित्याचेही वाटप करण्यात आले.

नागपूर महानगरपालिकेतर्फे शाळेचा पहिला दिवस विद्यार्थी, शिक्षक, पालक या सर्वांसाठी अविस्मरणीय ठरावा याकरिता प्रवेशोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली. विद्यार्थ्यांना शाळेत येण्याची हुरहूर लागावी, शिक्षणाविषयी गोडी निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित व्हावा यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या ८६ प्राथमिक व २८ माध्यमिक अशा एकूण ११४ शाळांमध्ये शाळेचा पहिला दिवस प्रवेशोत्सव म्हणून साजरा करण्यात आला. मनपाच्या या ११४ शाळांमध्ये १४ हजार ६३७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.



'प्रवेशोत्सवाचा' मुख्य कार्यक्रम कळमना डिप्टी सिग्नल येथील पीएम श्री संजयनगर हिंदी उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेत आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., शिक्षणाधिकारी साधना सयाम, सहायक आयुक्त विजय थूल, हरीश राऊत, सहायक शिक्षणाधिकारी संजय दीघोरे, मुख्याध्यापक गिता दांडेकर, मनपाचे माजी स्थायी समिती अध्यक्ष प्रदीप पोहाणे, माजी नगरसेवक चेतना टांक,सरिता कावरे, पालक समिती सदस्य अजित कौसल यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी. यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक आणि शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

यावेळी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करीत गुणवत्तापूर्ण शिक्षणाकडे मनपाचा भर असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की, महानगरपालिकेने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणोत्सव आणि क्रीडा स्पर्धा असे विविध उपक्रम सुरू केले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होत आहे. हा विकास होत असताना विद्यार्थ्यांनी खेळासह अभ्यासावरही भर दिला पाहिजे. तसेच शाळेनेही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाबरोबर गुणवत्ता वाढीसाठी अधिक प्रयत्न करावे असेही ते म्हणाले. पीएम श्री संजयनगर शाळा खेळात आणि दहावीच्या निकालासह अनेक बाबतीत समोर आहे, इतर शाळांसमोर पीएम श्री संजयनगर शाळेने एक मोठे आदर्श निर्माण केले आहे. शाळेच्या विकासात माजी नगरसेवकांनीही हातभार लावला असून, यापूढेही त्यांचे असेच सहकार्य असावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मनपा शाळेत डीजिटल बोर्डच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न मनपातर्फे करण्यात आले आहे. तसेच शिक्षकांना डीजीटल बोर्ड हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. आवश्यक पायाभूत सुविधासाठी मनपातर्फे सवोतोपरी मदत करण्यात येईल असे आश्वासनही डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले. यावेळी त्यांनी शाळेचे सर्व वर्गखोल्या, स्मार्ट बोर्डचे निरीक्षण केले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी खेळासह अभ्यासावरही भर द्यावा, या पीएम श्री संजयनगर शाळेतील विद्यार्थी दहावीच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेले आहे. यापुढे विद्यार्थ्यांनी पुढे परीक्षेत अधिक चांगले यश मिळविण्यासाठी प्रयत्न करावे असे सांगत त्यांनी शाळेच्या पहिल्या दिवशी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

पाहिल्या दिवशी नियमित प्रार्थनेने शाळेची सुरुवात झाली. त्यानंतर शिक्षकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबाचे पुष्प भेट देण्यात आले. याशिवाय शाळेच्या पहिल्या दिवशी नर्सरीपासून ते इयत्तआठवीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक आणि शालेय साहित्य देण्यात आले. प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती गिता दांडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन शाळेच्या शिक्षिका मधु पराड यांनी केले.

आमदार कृष्णा खोपडे यांनी पारडी मराठी उच्च प्राथमिक शाळेला प्रवेशोत्सव दिनानिमित्त भेट दिली. यावेळी आमदार कृष्णा खोपडे हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले तसेच त्यांच्या हस्ते बालवाडी ते इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका रत्ना कालभुत, शाळा निरीक्षक अंजुम आरा, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य रेखा घोडाकाडे उपस्थित होते. दरम्यान लकडगंज झोनेच सहायक आयुक्त विजय थूल यांनी सुद्धा शाळेला भेट दिली.

मनपा अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या हस्ते गांधीबाग झोन अंतर्गत गोपालराव रामजी मोटघरे मनपा इंग्रजी माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना पुस्तके व शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. त्याचबरोबर मनपा उपायुक्त मिलिंद मेश्राम यांनी एमएके आझाद उर्दू शाळेत, हनुमाननगर झोनचे सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर यांनी लाल बहादूर शास्त्री शाळेत,लकडगंज झोनचे सहायक आयुक्त विजय थूल यांनी पारडी उच्च प्राथमिक शाळेत तर नेहरूनगर झोनचे सहायक आयुक्त सोनम देशमुख यांनी ताजबाद उर्दू माध्यमिक शाळेत, लक्ष्मीनगर झोनेचे सहायक आयुक्त सतिश चौधरी यांनी जयताळा प्राथमिक शाळेला भेट दिली. मनपा अधिकाऱ्यांमार्फत मनपाच्या सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक आणि शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

### सेल्फी पॉइंट ठरले आकर्षक

मनपा शाळेत विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सेल्फी पॉइंट सर्वांसाठी आकर्षक ठरले. विद्यार्थ्यांनीही आपल्या पालकांसोबत मोठया उत्साहात सेल्फी काढली. शैक्षणिक आयुष्यातील हा पहिला दिवस अविस्मरणीय करण्यासाठी आठवण म्हणून हा क्षण कॅमेऱ्यांत टिपून घेण्याचा आनंद मुलानी व पालकांनी घेतला. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी.यांनी सुद्धा पीएम श्री संजयनगर हिंदी माध्यमिक शाळेत सेल्फी काढली.

### आमदार विकास ठाकरे यांनी प्रियदर्शनी उच्च प्राथमिक शाळेला दिली भेट

आमदार विकास ठाकरे यांनी प्रियदर्शनी उच्च प्राथमिक शाळा, फुटाळा आणि सुरेंद्रगड हिंदी शाळामध्ये प्रवेशोत्सवा दिनानिमित्त भेट दिली. यावेळी विकास ठाकरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक आणि शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. प्रियदर्शनी शाळेतील कार्यक्रमात विकास ठाकरे म्हणाले की, विद्यार्थ्यांचा शालेय विकास आणि प्रगती हवी असेल तर विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी शिक्षक, प्रशासन यांच्या सह पालकांनीही जागरूकतेने हातभार लावला तर निश्चितच हे बालक भविष्यात याच शाळेतून गुणवत्ता यादीत चमकल्याशिवाय राहणार नाही. कार्यक्रमात शाळा निरीक्षक विजय सोनी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नंदिनी आत्राम, शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. वसुधा वैद्य, सहा. शिक्षक व मनपा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष राजेश गवरे, सहा. शिक्षक युवराज शेंडे, सुनिल चावरे, रंजना हटवार , आरती मोहरीर, प्रतिभा घायवट, प्रिया पाटील तसेच घनश्याम उरकुडे, रंजना हटवार यांच्यासह इतर सदस्यगण व मोठ्या संख्येने पालक व नागरिक उपस्थित होते.

## ३.७० लाखांच्या मालावर हातसाफ

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २३ :

कुटुंब बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत 3 लाख 70 हजार रुपये किंमतीच्या मालावर हातसाफ केला. ही घटना यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी सुनील हरीशचंद्र गुप्ता (65) रा. विश्वभारती लेआऊट, मांजराच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

सुनील मुळचे उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथील रहिवाशी आहेत. गत 10 जून रोजी सुनील घराला कुलूप लावून कुटुंबासह प्रयागराज येथे गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप आणि कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटात ठेवलेले रोख 5 हजार, सोन्याचे दागिने आणि लॅपटॉप असा एकूण 3.70 लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला.

शनिवारी रात्री गुप्त कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## ड्रग्ज विक्रीत पती-पत्नी गजाआड

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २३ :

ऑपरेशन थंडर अंतर्गत शहरभरात पोलिस विभागाकडून अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मोठ्या प्रमाणात कारवाई होत असतानाही नव-नवे ड्रग्ज पेडलर पुढे येत आहेत. शनिवारी मध्यरात्री हुडकेश्वर पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर ड्रग्ज विक्रीत सक्रीय पती-पत्नीला सापळा रचून अटक केली. फिरोज खान रफीक खान (30) आणि नाजिया परवीन फिरोज खान (26) रा. बेलदारनगर, टेलीफोन चौक अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी आरोपींकडून एमडीसह एकूण 6.46 लाखांचा माल जप्त केला आहे.

शनिवारी रात्री 1.10 वाजताच्या सुमारास हुडकेश्वर पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान माहिती मिळाली की, पवनपूत्रनगर परिसरात पांढरी कार क्र. एमएच-40/ए-7261 मध्ये असलेले काही लोक अंमली पदार्थांची विक्री करीत आहेत. माहितीच्या आधारावर पोलिसांनी वाहनाचा शोध सुरू केला. बहादुरा फाट्याजवळील संजूबा शाळेसमोर पोलिसांनी वरील क्रमांकाची कार अडवली. कारमध्ये फिरोज आणि नाजिया बसलेले होते. त्यांना कारमधून उतरवत झडती घेण्यात आली, मात्र काहीही मिळाले नाही. मात्र माहिती खात्रीशीर होती. पोलिसांनी कारची झडती घेतली असता पुढच्या सीटवर नाजियाची पर्स ठेवलेली आढळली.

पर्स उघडून पाहिले असता त्यात 3 झिपलॉक पिशव्यांमध्ये अंमली पदार्थ मिळाले. पोलिसांनी कारमध्येच ठेवलेली दुसरी गुलाबी रंगाची पर्स तपासली असता त्यात 4 प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये पांढऱ्या रंगाचे पदार्थ मिळाले. दोन्ही पर्समधून पोलिसांनी 12.01 ग्रॅम मेफेड्रान ड्रग्ज जप्त केले. आरोपींजवळ कारमध्येच ईलेक्ट्रॉनिक वजन काटाही ठेवलेला होता. पोलिसांनी कार आणि ड्रग्जसह एकूण 6.46 लाखांचा माल जप्त केला.

दोघांविरुद्धही हुडकेश्वर पोलिस ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. ही कारवाई वपोनि ज्ञानेश्वर भेदोडकर, पोनि नागेश चातरकर, सपोनि भलावी, पोहवा गोपाल देशमुख, संदीप पाटील, संतोष सोनटक्के, दिनेश गाडेकर, अश्विनी, सारंग काटे आणि मंगेश मडावी यांनी केली. आरोपींची बॅकवर्ड आणि फॉरवर्ड लिंक तपासली जात आहे. दोघेही शहरातीलच ड्रग्ज पेडलरकडून माल खरेदी करीत असल्याची माहिती मिळाली आहे.

## पोलिसांनी वाचवले ११ गोवंशांचे प्राण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

पाचपावली पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर धाड टाकून कत्तलीसाठी आणलेल्या 11 गोवंशांचे प्राण वाचवले. या प्रकरणात पोलिसांनी शहबाज कुरेशी (रा. टेकानाका) नावाच्या आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

रविवारी सकाळी 7.30 वाजताच्या सुमारास पाचपावली पोलिसांना टेकानाकाच्या फारूखनगर परिसरात पांढऱ्या रंगाच्या वाहनातून गोवंशांना कत्तलीसाठी आणले असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी परिसरात धाड टाकली. आहिले हदीस मशिदीजवळ उभे एमएच-36/एए-3470 क्रमांकाचे वाहन तपासले असता त्यात 11 गोवंश मिळाले. मात्र वाहन चालक आणि मालक दोघेही गायब होते. आसपास चौकशी केली असता शहबाज कुरेशी याने गोवंश आणले असल्याची माहिती मिळाली. गोवंशांना निर्दयतेने चारा-पाण्याविना वाहनात कोंबलेले होते. पोलिसांनी सर्व गोवंशांची सुटका करून गोरक्षण सभेत त्यांची रवानगी केली. शहबाजविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## युक्ती आसाटी ठरल्या सुपर मॉम

### सोनरी पहाटच्या सुपर मॉम क्राउन व किड्स फॅशन आयकॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :



सोनेरी पहाटच्या संचालिका रेखा भोंगाडे यांच्या संकल्पनेतून सुपर मॉम क्राउन सीझन ५ व किड्स फॅशन आयकॉन या स्पर्धांचे आयोजन मंत्रा सेलिब्रेशन हॉल, बेसा रोड येथे करण्यात आले. यात युक्ती आसाटी यांनी सुपर मॉमचा किताब पटकावला. कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय शिक्षण संस्था, गोंदियाचे सचिव अमृत इंगळे, चित्रपट दिग्दर्शक विकास पांडे, शशांक पांडे आणि सामाजिक कार्यकर्त्या ऋतू सिंग चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

सुपर मॉम क्राउन सीझन ५ मध्ये ३० स्पर्धकांनी तर किड्स फॅशन आयकॉन स्पर्धेत ३३ बालगोपाळांनी सहभाग घेतला. डॉ. रश्मी तिरपुडे, प्रार्थना मेश्राम, मीना बिसेन, अनुरिता ढोलकिया व शीतल बावणे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

सुपर मॉम क्राउन सीझन ५ मध्ये साक्षी चौहान, हर्षाणी पराते, सपना बनोदे, शुभांगी शंभरकर यांनीदेखील बाजी मारली. तर किड्स फॅशन आयकॉन मध्ये ओवी मोकडे व दिवेश ढोणे विजयी ठरले. सांची पिल्लेवान, देविका सहारे, जहान खुजे, रियांश गोतमारे यांनी इतर पुरस्कार पटकावले. डॉ. ऋतू चौधरी आणि अवनी तिवारी यांनी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून भूमिका पार पाडली. शो स्टॉपर म्हणून जयश्री पाजाई, कनक पोहेकर, श्वेता पटेल, स्मिरल गायकवाड व आर्या व्यास यांनी सहभाग घेतला. तर शो ओपनर म्हणून अंकिता सुरकार, शिवांश सुरकार आणि श्रियान्वी मेश्राम यांनी कार्यक्रमाची सुरुवात आकर्षक पद्धतीने केली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कल्पना पराते, अंकिता सुरकार, शिल्पा मेश्राम, रीमा उईके, ऋतू चौधरी, शीतल नागराळे, स्मिता कौर, सपना गायकवाड, मनीष पाडोळे, अनिकेत भोंगडे व मोनालिसा संकेत यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नरेन्द्रनगर प्रभागात रस्त्यावर खड्डे आणि पथदिवे बंद

### * खड्डे बुजविण्यासाठी रस्त्यावर टाकलेली गिट्टी * नाल्याची सफाई करण्यात न आल्याने पाणी असे साचले

■ किरण बेलूरकर
प्रभाग क्र. ३५ (नरेन्द्रनगर)





प्रभाग क्र. 35 (नरेन्द्रनगर) परिसरातील अनेक वस्त्यांमध्ये रस्त्यावर खड्डे आणि रस्त्यावरील पथदिवे बंद असल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावरील खड्डे कधी कुणाचा जीव घेतील याचा नेम नाही. संबधित विभागाकडे तक्रार करूनही कुणीही लक्ष देत नसल्याचे त्या परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे.

नरेन्द्रनगर परिसर हा उच्चभ्रू लोकांचा परिसर आहे. मात्र, या परिसरातील रस्त्यांची दयनिय अवस्था आहे. जागोजागी रस्त्यावर खड्डे पडले आहेत. या खड्ड्यातून वाट काढताना वाहनचालकांना कमालीची कसरत करावी लागते. खड्डे वाचविण्याच्या प्रयत्नात कधी कधी तर दोन वाहने समोरासमोर येतात. कधी कुणाचा अपघात होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी देखील होते. शताब्दी चौक, फुलमतीनगर रस्त्यावरील खड्ड्यांची भयावह स्थिती आहे. खड्डे बुजविण्यासाठी काही ठिकाणी रस्त्यावर गिट्टी टाकण्यात आली. काही दिवसांपूर्वी पाऊस आल्याने गिट्टी देखील वर आली आहे. त्यातून मार्ग काढत वाहनचालकांना वाटचाल करावी लागते. एखादा वाहनचालक या गिट्टीवरून घसरून कधी पडेल याचा नेम नाही. रस्ता दुरूस्तीचे काम संथगतीने सुरू आहे. कंत्राटदार काहीच लक्ष देत नाही. रस्त्याच्या कडेला सिमेंटचे गट्टू लावले आहेत. परंतु, काम नित्कृष्ट दर्जाचे झाल्याने अनेक ठिकाणी गट्टू फुटले आहेत तर, काही ठिकाणी गट्टू बाहेर निघाले आहेत. त्यामुळे पादचाऱ्यांना बराच त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे आपली समस्या कुणाकडे मांडावी असा प्रश्न या परिसरातील लोकांना पडला आहे.

खड्ड्यांसोबत रस्त्यावरील पथदिवे देखील बंद आहेत. त्यामुळे रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य आहे. सप्तगिरीनगर, शनी मंदिर, शताब्दी चौक, बेलतरोडी रोड आणि लोहार समाज भवन रोडवरील पथदिवे बंद आहेत. त्यामुळे गुन्हेगारांचे फावते. कधी कुणाची वाटमारी होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे लोकांना आपला जीव मुठीत घेऊन चालावे लागते. या परिसरातील नाल्यांची सफाई न झाल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. नाल्यांची सफाई न झाल्याने मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यास नाल्यातील पाणी बाहेर येऊन लोकांच्या घरात घुसण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाला सुरूवात होण्यापूर्वी नाल्यांची सफाई करणे आवश्यक आहे अशीही मागणी या परिसरातील लोकांनी केली आहे.

## क्लिनिकल रिसर्च सार्वजनिक आरोग्यासाठी महत्वाचे

### करिअर मार्गदर्शन सत्राचा ४०० विद्यार्थ्यांनी घेतला लाभ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :




क्लिनिकल रिसर्चमधील करिअर हा केवळ एक व्यवसाय नाही तर मानवतेची सेवा आहे असे सांगून सार्वजनिक आरोग्य सुधारण्यात त्याची महत्वाची भूमिका असल्याचे मत तज्ञांनी व्यक्त केले. नागपूरच्या आयएमए हॉलमध्ये नुकत्याच आयोजित 'कॉलेज २ कॉर्पोरेट' या करिअर मार्गदर्शन सेमिनारमध्ये सुरक्षित आणि अधिक प्रभावी औषधे आणि उपचारांच्या विकासात क्लिनिकल रिसर्च कश्या प्रकारे महत्त्वाची भूमिका बजावते आणि या क्षेत्रात उपलब्ध करीअरच्या संधी यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

कॅनव्हास क्लिनिकल रिसर्च सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या सीईओ विजया भक्ते यांनी सत्राची सुरुवात केली. त्यांनी साइट मॅनेजमेंट ऑर्गनायझेशन्स (एसएमओ) ची संकल्पना आणि क्लिनिकल चाचण्यांमध्ये त्याची भूमिका मांडली. "सीआर इंडस्ट्री ट्रेंड्स फॉर बिगिनर्स" या विषयावरील पॅनेल चर्चेत शैक्षणिक आणि उद्योगातील अनेक तज्ञांनिभाग घेतला. नागपूरच्या एम्स येथील औषधनिर्माणशास्त्राचे प्राध्यापक आणि परीक्षांचे डीन डॉ. गणेश दाखले यांनी क्लिनिकल संशोधनाच्या विकसित होत असलेल्या नवनवीन पद्धतीबद्दल भाष्य केले. त्यांनी विकेंद्रित क्लिनिकल चाचण्या, कृत्रिम बुद्धिमत्ता, वास्तविक-जगातील पुरावे आणि रुग्ण सहभाग यासारख्या प्रमुख ट्रेंडवर प्रकाश टाकला.

आयक्यूव्हीआयएच्या असोसिएट डायरेक्टर आणि एचबीएच्या डायरेक्टर डॉ. अनुपमा हरिहरन यांनी मुलाखत तंत्रे आणि प्रभावी संवाद कौशल्यांवर मार्गदर्शन केले. सन फार्माच्या डीजीएम रेणुका निओगी यांनी इंडियन सोसायटी फॉर क्लिनिकल रिसर्चची ओळख करून दिली आणि सीआर उद्योगातील विस्तृत क्षेत्रांवर चर्चा केली. आयकॉनमधील प्रोजेक्ट लीड आणि जोखीम-आधारित देखरेखीतील तज्ञ डॉ. संतोष टेंभरे यांनी त्यांचा व्यावसायिक प्रवास उलगडला. दोन दशकांहून अधिक अनुभव असलेले ग्लोबल क्लिनिकल रिसर्च लीडर रवी गवारे यांनी त्यांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या संघर्षांचे वर्णन केले. नागपूर विद्यापीठाचे प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी भूषण महाजन आणि नागपूर विद्यापीठाचे फामार्कोग्नोसीचे प्राध्यापक डॉ. प्रकाश इटनकर यांनीही मौल्यवान करिअर विषयक मार्गदर्शन केले. नागपूर विद्यापीठाचे निशिकांत राऊत, इनक्यूबिन फाउंडेशनच्या सीईओ प्रियंका राजवत आणि मार्गदर्शक आणि वक्ते डॉ. तेजेंद्र सिंह रावल यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

या चर्चासत्रात बी.फार्म, एम.फार्म, बी.एससी., एम.एससी., एमबीबीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बीडीएस आणि नर्सिंगसह विविध शैक्षणिक पार्श्वभूमीतील सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सीईओ विजया भक्ते यांच्या आभार प्रदर्शनाने सत्राचा समारोप झाला.

## महासागर प्रभाग मित्र

### बोधी मित्र फाऊंडेशनचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :



इंदोरा येथील उत्कर्ष बुद्ध विहार येथे महिला मंडळाच्या वतीने मित्र फाऊंडेशनचा नववा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी भंते नागानंद यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना भंते नागानंद म्हणाले की. धम्मदेसनेच्या माध्यमातून धम्माचे आचरन केल्यास मनुष्य जीवन मंगलमय होते.

सामाजिक, सांस्कृतिक आणि चित्रपटात काम करताना मिळलेला चांगल्या मार्गाचे अनुभव प्रमुख पाहुणे रवि पाटील यांनी कथन केले. कार्यक्रमाचे संचालन कल्पना नारनवरे यांनी तर, स्वाती मोडक यांनी आभार मानले. पाहुण्यांचे स्वागत शालिनी पानतावणे, शीला मेश्राम, वैशाली देशभ्रातर, अर्चना देशभ्रातर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देवानंद पानतावणे. प्रवीण वहाणे, देशराज मेश्राम, मनोहर उके, संजय मेश्राम, प्रशांत खोब्रागडे, अरविंद देशभ्रातर, विकास बारमाटे, यादव गणवीर, शरद वासनिक, सुरेश मेश्राम, गोवर्धन भेले, गवळी, महिला समितीच्या स्नेहल देशभ्रतार, सुधा मेश्राम, सुनयना देशभ्रातर, प्रमिला मोरे, कविता मेश्राम, वंदना लांडगे, कमलताई खांडेकर, विश्रांती बारमाटे, शशीकला मोडक, ताराबाई पाटील, रिना मोटघरे यांनी परिश्रम घेतले.

### सेंटर पॉईट शाळेत योग दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :



वर्धमाननगर येथील सेंटर पॉईट स्कूल येथे योग दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या कांचन उके यांनी आपल्या भाषणातून योग दिनाचे महत्व पटवून दिले. स्वस्थ राहण्यासाठी प्रत्येकांनी योग करणे आवश्यक आहे. त्यामुळे शरीर, मन स्वस्थ राहते. रश्मी बैस यांनी प्राणायाम, सुक्ष्म व्यायाम, तृप्ती खापर्डे, पल्लवी खंडागळे यांनी आसने करून दाखविली. स्वप्निल समर्थ यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी दंडासन, वज्रासन, बालासन, ताडासन, वृक्षासन, सूर्य नमस्कार, प्राणायाम, अनुलोम विलोम, भ्रामरी आदी योगा आसने सादर केली. कार्यक्रमाचे संचालन निशांत श्रीवास्तव यांनी तर, रोशन चौधरी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला उपप्राचार्या दीपा चक्रवर्ती, जयंती चक्रवर्ती प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी वीरेंद्र बघेल, धीरज यादव, मनोज रक्षक, कुशल बाळबुधे आणि प्रीतम रंगारी परिश्रम घेतले.